सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ७४ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि कार्य करण्यासाठी आपले शरीर सुदृढ, बुद्धी कुशाग्र, मन खंबीर आणि पवित्र संकल्प करण्यास सक्षम असे होणे आवश्यक आहे. आपल्या व्यक्तिगत जीवनातील सवयी, व्यवहार व संपर्कात असलेल्या व्यक्तीला संघानुकूल करणारी बोलण्या-वागण्याची कला हस्तगत असणे आपल्याला आवश्यक आहे. अन्यथा संघाचा उत्तम कार्यकर्ता म्हणून काम करणे आपल्याला शक्य होणार नाही.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## महत्त्वाचे

### नवीन आयकर नियमांचा मसुदा जारी

**नवी दिल्ली :** आयकर विभागाने इनकम टॅक्स रूल्स, २०२६ चा नवीन मसुदा जारी केला आहे. हे नवीन नियम पुढील आर्थिक वर्षापासून म्हणजेच १ एप्रिल २०२६ पासून लागू होतील. सरकारचा उद्देश कर भरण्याची प्रक्रिया सोपी करणे आणि सामान्य करदात्यांसाठी नियम सुलभ करणे हा आहे. नवीन प्रस्तावित मसुद्यात नियम आणि फॉर्मच्या संख्येतही कपात करण्यात आली आहे. आतापर्यंत लागू असलेल्या इनकम टॅक्स रूल्स, १९६२ मध्ये एकूण ५११ नियम आणि ३९९ फॉर्म होते. नवीन मसुद्यात त्यांची संख्या कमी करून आता फक्त ३३३ नियम आणि १९० फॉर्म करण्यात आले आहेत. विभागाने ज्या तरतुदींची आता गरज नव्हती त्या काढून टाकल्या आहेत आणि अनेक समान नियमांना एकत्र जोडले आहे. यामुळे कर प्रणालीची गुंतागुंत कमी होईल.

### विमानात अजितदादांसोबत 'पीए' का नव्हता?

मुंबई : २८ जानेवारी रोजी झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. या घटनेला १० दिवस उलटले तरी संशयाचे धुके अद्याप कायम आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार बजरंग सोनवणे यांनी या अपघातावर पुन्हा एकदा मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. 'नेहमी सावलीसारखे सोबत असणारे अजित पवारांचे पीए त्या दिवशी विमानात का नव्हते?' असा सवाल करत सोनवणेंनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे. बजरंग सोनवणे यांनी आता तांत्रिक आणि प्रशासकीय बाजूवर बोट ठेवले आहे. ते म्हणाले, 'मी कोणताही आरोप करत नाही, फक्त संशय व्यक्त करत आहे. अजितदादांचा पीए नेहमी त्यांच्या सोबत असतो. मग ज्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडली, त्याच दिवशी पीए का नव्हते? विमानात फक्त सुरक्षा रक्षकच का होते? हे सर्व तर्क-वितर्क सामान्य माणसाच्या मनात येत आहेत.'



शेगावीचा राणा, योगिराज श्री संत गजानन महाराज यांचा प्रकटदिन रविवारी संतनगरी शेगावात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रींच्या दर्शनासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती. गण गण गणात बोतेचा गजर करीत भाविक पालखी सोहळ्याला उपस्थित होते. ३२

(सविस्तर वृत्त पान २ वर)

# दहशतवादाशी तडजोड नाही

## ● पंतप्रधान मोदींनी मलेशियातून पाकला ठणकावले ● अनेक करारांवर स्वाक्षरी

**क्वालालम्पूर, ८ फेब्रुवारी**

दहशतवादाबाबत भारताचे कोणतेही दुहेरी निकष नाहीत किंवा कोणतीही तडजोड नाही. दहशतवादाला पाठिंबा देणारे आणि आर्थिक पुरवठा करणाऱ्या देशांसोबत कोणतीही सहानुभूती बाळगणार नाही. भारत कोणत्याही परिस्थितीत सीमापार घुसखोरी आणि दहशतवादी कृत्य सहन करणार नसल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी मलेशियातून ठणकावले.

मलेशिया दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मोदी यांनी मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेत



विविध क्षेत्रात द्विपक्षीय करारावर सहमती झाल्यानंतर स्वाक्षरी करण्यात आली. यानंतर संयुक्त पत्रपरिषदेत बोलताना मोदी म्हणाले, व्यापार, गुंतवणूक, आरोग्य, अन्न सुरक्षा, संरक्षण, सुरक्षा, सेमीकंडक्टर्स, डिजिटल तंत्रज्ञान, आर्थिक तंत्रज्ञान, संस्कृती, पर्यटन आणि माहितीच्या देवाणघेवाणीसंदर्भात आम्ही द्विपक्षीय करार केले.

भारत आणि मलेशियामधील धोरणात्मक विश्वास हा आर्थिक परिवर्तनाचा मार्ग आहे. शांततेच्या उद्देशाने केलेल्या सर्व प्रयत्नांना भारताचा नेहमीच पाठिंबा आहे. भारताला आज जगात विकासासाठी विश्वासार्ह भागीदार म्हणून पाहिले जाते. याचा प्रत्यय ब्रिटन, अमेरिका, युरोपीय महासंघासह अनेक देशांबरोबर केलेल्या व्यापार करारांतून येतो. (वृत्तसंस्था)

### दोन्ही देशांमधील सहकार्याला बळकटी

**भारत-मलेशिया भागीदारी ऐतिहासिक आहे आणि दोन्ही देशांमधील सहकार्य सातत्याने वाढत आहे. अलिकडच्या वर्षांत द्विपक्षीय संबंधांनी मिळवलेली गती आणि खोली प्रेरणादायी आहे. शेती, उत्पादन, स्वच्छ ऊर्जा, सेमीकंडक्टर, कौशल्य विकासात दोन्ही देश महत्त्वाचे भागीदार आहे. मलेशियाच्या सहकार्यामुळे भारत-आसियान संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.**

# अखंड भारताचा संकल्प मजबूत करा

## आता खूप पुढे गेलो, देशविभाजनाची भीती नाही : सरसंघचालक

**मुंबई, ८ फेब्रुवारी**

इथे राहून ५०० वर्षे सत्ता गाजविणारे सुल्तान, बादशहा आणि २०० वर्षे राज्य करणारे इंग्रज या देशाचे तुकडे करू शकले नसताना आता देशविरोधी शक्ती काय करू शकणार? असा प्रश्न करीत देशाच्या विभाजनाची भीती न बाळगता २०४७ पर्यंत अखंड भारताचा संकल्प मजबूत करावा, असे उद्‌गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी काढले.





संघाच्या स्थापनेच्या १०० वर्षांनिमित्त मुंबईत आयोजित 'नवे क्षितिज' या विशेष कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते. उपस्थितांकडून मांडण्यात आलेल्या एकूण १४३ प्रश्नांचे १४ स्वतंत्र श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. संघनीती, हिंदुत्व, राष्ट्रीय परिदृष्य, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, परराष्ट्र धोरण, राष्ट्रीय सुरक्षा, संस्कृती, कला, क्रीडा व भाषा तसेच जीवनशैली, पर्यावरण आदी विविध विषयांवरील प्रश्नांना सरसंघचालकांनी सुस्पष्ट आणि समर्पक उत्तरे दिली.

डॉ. भागवत यांनी आपल्या भाषणात समाज, राष्ट्रीय एकात्मता, आरक्षण, लोकसंख्या संतुलन, भ्रष्टाचार, तंत्रज्ञान, शेती आणि अर्थव्यवस्था या विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

हिंदू आणि शीख संबंधांवर बोलताना त्यांनी दोन्ही समाजांमध्ये रक्तसंबंध तसेच रोटी-बेटीचे नाते असल्याचे सांगितले. श्री गुरू ग्रंथसाहिबमध्ये देशातील संतांची वाणी असल्याने हिंदू-शीख वेगळे असल्याचा विचार चुकीचा असून, आपण सर्व एकच आहोत, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

आरक्षणाच्या मुद्यावर बोलताना त्यांनी संविधानानुसार असलेल्या सर्व आरक्षणांना संघाचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. जातीय भेदभाव पूर्णपणे नष्ट व्हायला हवा, असे सांगत, ज्यांनी हजारो वर्षे विषमता सहन केली, त्यांच्यासाठी काही काळ सहन करणे हा स्वस्त सौदा असल्याचे मत व्यक्त केले.

### बांगलादेशातील हिंदूंनी संघटित व्हावे

**बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांवर भाष्य करताना सरसंघचालकांनी तेथील सव्वाकोटी हिंदूंना संघटित होण्याचे आवाहन केले. हिंदू समाज संघटित झाल्यास अत्याचारांना आपोआपच आळा बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

### युवक व संघकार्य

**संघ स्वयंसेवकांचे सरासरी वय २८ वर्षे आहे. युवक देशप्रेमी असून, त्यांना तर्कशुद्ध पद्धतीने समजावल्यास ते विचार स्वीकारतात. प्रयोगाची संधी देऊन त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, असे सरसंघचालकांनी नमूद केले.**

### संघाचा सरसंघचालक हिंदूच होणार

**संघाचा सरसंघचालक कोणत्याही जातीचा असू शकतो. ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य किंवा शूद्र नव्हे, तर हिंदू हाच संघाचा सरसंघचालक असेल. भविष्यात अनुसूचित जाती-जमातीतील स्वयंसेवकही सरसंघचालक होऊ शकतात, असे मोहनजी भागवत यांनी स्पष्ट केले.**

# एसटी बसला आता राजमाता जिजाऊंचे नाव

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई, ८ फेब्रुवारी**

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३२ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसेसना हिंदवी स्वराज्याच्या जननी 'राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरा, इतिहास आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत असून त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागील प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ. त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी आहेत. त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नव्या बसेसना 'राजमाता जिजाऊ' असे नाव देण्यात आले आहे.

एसटी महामंडळाने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नामकरणांतून महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचा सन्मान केला असून, त्याच परंपरेत आता आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. (तभा वृत्तसेवा)

# जि. प., पंचायत समिती निवडणुकीचे आज निकाल

**मुंबई, ८ फेब्रुवारी**

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतील मतमोजणी सोमवारी ९ रोजी होणार असून सर्व निकालही सायंकाळपर्यंत हाती येणार आहेत.

सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ गटांसाठी व पंचायत समितीच्या १,४६२ गणांसाठी असे एकुण ७,४३८ उमेदवार रिंगणात आहेत. पुणे, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूरसह विविध जिल्ह्यांत झालेल्या या मतदानात ग्रामीण मतदारांनी प्रचंड उत्साह दाखवला. रत्नागिरीतील चिपळूणमध्ये ईव्हीएम बंद पडण्याच्या घटना वगळता उर्वरित राज्यात प्रक्रिया शांततेत पार पडली.

### सोलापूरमध्ये ईव्हीएम सापडली ढाब्यावर

सोलापूर : सोलापूरमध्ये ईव्हीएम मशीनच ढाब्यावर सापडल्याचे समोर आले. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका केली आहे. हे खरोखरच धक्कादायक असल्याचे दानवे यांनी म्हटले. ते म्हणाले, ईव्हीएम मशीन ढाब्यावर सापडले आता याला कारणे काय देणार? ईव्हीएम वारंवार शंका उपस्थित होत आहे. (वृत्तसंस्था)

# आता येणार 'ग्लाइडवेजची स्वयंचलित कार'

## वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एक नवीन वाहतूक संकल्पना



**नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

भारतासारख्या विशाल देशात वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाच्या समस्यांचा सातत्याने सामना करावा लागतो. तसेच काही भागांत रस्तेही अरूंद आहेत. या समस्यांवर मात करणे शक्य होणार आहे. अमेरिकेतील ग्लाइडवेज कंपनीने एक स्वयंचलित कार विकसित केली असून ती अरूंद रस्त्यांवरून चालण्यास उपयुक्त ठरणार आहे.

दुबईतील वर्ल्ड गव्हर्नमेंट समिटमध्ये एका विशेष मुलाखतीत, ग्लाइडवेजचे संस्थापक आणि सह-सीईओ मार्क सीगर यांनी स्पष्ट केले की, भारत हे एक प्रमुख केंद्र आहे. ग्लाइड कार्सचे उत्पादन सुझुकी करते, ज्यात मारुती सुझुकी एक प्रमुख भागीदार आहे. ग्लाइडवेज गेल्या दीड वर्षापासून भारतासाठी बाजारपेठ प्रवेश धोरणावर शांतपणे काम करत आहे आणि लवकरच घोषणा अपेक्षित आहेत. दिल्लीसारखी प्रदूषणग्रस्त शहरे याचे सुरुवातीचे लाभार्थी ठरू शकतात.

ग्लाइड कार सार्वजनिक वाहतुकीपेक्षा प्रीमियम टॅक्सीसारखी वाटते. प्रत्येक वाहन वातानुकूलित आहे आणि वाय-फाय, संगीत आणि एक शांत, वैयक्तिक केबिनची सुविधा देते. तथापि, सर्वात मोठा फरक प्रवासाच्या कार्यपद्धतीत आहे. एकदा प्रवाशाने आपले गंतव्यस्थान निवडल्यानंतर, वाहन न थांबता प्रवास करते, मधे कोणताही थांबा नाही किंवा इतरांची वाट पाहण्याची गरज नाही. (वृत्तसंस्था)

### दोन मीटर रस्त्यांवरुनही धावणार

सीगर म्हणाले, आम्ही सर्वप्रथम वाहतूक कोंडीची समस्या सोडवत आहोत. विद्यमान रस्त्यांवर बस, टॅक्सी किंवा इलेक्ट्रिक कार आणल्याने वाहतूक कोंडीची समस्या सुटत नाही. शहरांना गतिशीलतेच्या एका नवीन स्तराची गरज आहे. ग्लाइड प्रणाली अरुंद, समर्पित मार्गिकांवर चालते, ज्यांची रुंदी साधारणपणे सायकल लेनएवढी, म्हणजे फक्त दोन मीटर असते. या मार्गिका जमिनीच्या पातळीवर, उन्नत किंवा भूमिगत असू शकतात, ज्यामुळे ही प्रणाली चौक आणि वाहतूक कोंडीची ठिकाणे पूर्णपणे टाळू शकते.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### ब्रिटनमध्ये डॉक्टरला २४ वर्षे तुरुंगवास

**लंडन :** ब्रिटनमध्ये बालकांच्या लैंगिक शोषणाच्या एका गंभीर प्रकरणात ७६ वर्षीय निवृत्त पशुवैद्यकीय डॉक्टर जॉन रुबेनला २३ वर्षे १० महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आरोपीने समर कॅम्पमध्ये मुलांना दिल्या जाणाऱ्या कँडीमध्ये अंमली पदार्थ मिसळून त्यांचे लैंगिक शोषण केले. हे प्रकरण गेल्या वर्षी जुलै महिन्यातील आहे, जेव्हा इंग्लंडमधील एका समर कॅम्पशी संबंधित ८ ते ११ वयोगटातील ८ मुलांना आणि एका प्रौढ व्यक्तीला रुग्णालयात दाखल करावे लागले होते. तपासानंतर पोलिसांनी रुबेनला अटक केली होती. जॉन रुबेनने नोव्हेंबरमध्ये न्यायालयात १७ प्रकरणांमध्ये आपला गुन्हा कबूल केला होता. यात १३ वर्षांखालील दोन मुलांवर लैंगिक अत्याचार आणि आठ मुलांवर क्रूरता केल्याच्या आरोपांचा समावेश आहे. ■

### 'श्वान-मुक्त गाव'च्या नावाखाली हत्या

**हैदराबाद :** तेलंगणातील गावांमध्ये आता एक विचित्र शांतता आहे. ही परिस्थिती केवळ एकाच गावाची नाही. राज्यातील सहा जिल्ह्यांमधील १२ हून अधिक गावांमध्ये या वर्षाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत १६०० हून अधिक श्वान मारल्याचे आरोप समोर आले आहेत. सुरुवातीला ही संख्या कमी होती. हळूहळू हा आकडा वाढत गेला. गावांमध्ये श्वानांच्या चावण्याच्या घटना वाढल्याने, डिसेंबरमध्ये झालेल्या सरपंच निवडणुकीत हा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित झाला. अनेक लोकप्रतिनिधींनी 'श्वान मुक्त गाव' बनवण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर गावातून कुत्रे गायब होऊ लागले. गावाबाहेर सामूहिक कबरी सापडल्या, तेव्हा संशय वाढला. तपासात हे स्पष्ट झाले की हे सर्व सुनियोजित पद्धतीने केले गेले होते. आरोप आहे की आंध्रप्रदेशातून डॉग कॅचर्सना बोलावण्यात आले आणि प्रति श्वानामागे ५०० रुपये दराने विषारी इंजेक्शन देण्यात आले.

### मॉल, रुग्णालयाबाहेर अंदाधुंद गोळीबार

**यमुनानगर :** हरयाणातील यमुनानगर येथे एका खाजगी रुग्णालयात आणि एका शॉपिंग मॉलबाहेर गोळीबाराची घटना घडली. चकमकीनंतर तीन तरुणांना अटक करण्यात आली. या गोळीबारात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या गोळीबाराचा हेतू दहशत पसरविणे हाच असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तथापि, यात खंडणीचा मुद्दाही चौकशीत समाविष्ट करण्यात आला आहे. पोलिस सध्या सीसीटीव्ही तपासत आहेत. ताब्यात घेतलेल्या तरुणांचीही कसून चौकशी केली जात आहे.

### ६४ वर्षीय वृद्धेवर सामूहिक अत्याचार

**बालोदाबाजार :** छत्तीसगडमधील बालोदाबाजार जिल्ह्यात एका ६४ वर्षीय वृद्धेवर सामूहिक अत्याचार झाला. पीडित महिला बऱ्याच काळापासून आजारी आहे. अंथरुणाला खिळलेली असून स्वतःहून उठून बसूही शकत नाही. ती निराधार आहे आणि भाड्याच्या घरात एकटीच राहते. घरमालकाने एका साथीदारासह हा घृणित प्रकार केला. तिची एक नातेवाईक महिला भेटायला आली तेव्हा हा प्रकार उघडकीस आला. तिने एका आरोपीला मद्यधुंद अवस्थेत वृद्धेवर अत्याचार करताना पाहिले. हा प्रकार पाहून ती हादरली. तिला पाहून आरोपी घाबरला आणि पळून जाऊ लागला. घरमालकानेही पळ काढला.

### खोट्या रीलमध्ये खराखुरा मृत्यू!

**कानपूर :** सोशल मीडियावर व्हायरल होण्याचे आणि प्रसिद्धीचे वेड अनेकदा घातक ठरू शकते. कानपूरमध्ये असाच एक प्रकार उघडकीस आला. इन्स्टाग्राम रील तयार करण्यासाठी एक महिला गळफास घेण्याचे नाटक करत होती आणि एका छोट्याश्या चुकीमुळे तिला जीव गमवावा लागला. या २७ वर्षीय महिलेचे नाव मोहिनी आहे. कुटुंबीयांनी सांगितले की, तिला समाज माध्यमांवर रील्स बनवण्याचा छंदच जडला होता. ती मोबाईलवर फाशीचे दृश्य चित्रीत करत होती. त्यासाठी तिने छताच्या हूकला दोरी बांधली, स्टूलवर उभी राहिली आणि गळ्यात दोरी टाकली. रील बनवताना तिचा तोल गेला आणि ती घसरली. ■



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५५,७०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,५८,००० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३३.३ | १५.९ |
| अमरावती | ३३.२ | १६.२ |
| सोलापूर | ३४.० | १७.० |
| बुलडाणा | ३२.० | १६.६ |
| चंद्रपूर | ३२.४ | १६.२ |
| गडचिरोली | ३१.६ | १५.६ |
| गोंदिया | २९.० | १२.८ |
| नागपूर | ३०.६ | १३.० |
| वर्धा | ३२.८ | १४.४ |
| वाशीम | ३१.२ | १४.६ |
| यवतमाळ | ३१.८ | १६.८ |

# भाविकांनी फुलली संतनगरी

## श्री संत गजानन महाराजांचा प्रकटदिन साजरा

◆ **शेगाव, ८ फेब्रुवारी**

भक्तांची माउली संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रकटदिनानिमित्त लाखो भक्तांनी संत गजाननाच्या समाधीचे दर्शन घेतले. गेल्या दोन महिन्या'पासून श्रींच्या प्रकटदिनानिमित्त महाराष्ट्रातून शेकडो दिंड्यांसह हजारो भाविकांनी पायदळ वारी करून शेगाव व परिसर गण गण गणात बोतेच्या गजराने दुमदुमून टाकला होता. आज श्रींच्या प्रकटदिनानिमित्त संत नगरीमध्ये लाखो भाविकांनी हजेरी लावून श्रींच्या समाधीचे दर्शन घेतले.

श्रींचा १४८ वा प्रकटदिन ८ फेब्रुवारी माघ कृ. सप्तमी रोजी संस्थानतर्फे साजरा करण्यात आला. यानिमित्त महिनाभरापासून पायदळ वारी करणाऱ्या दिंड्यांनी हजेरी लावली. उत्सवात सकाळी ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सायं. ५.३० ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रगटदिनानिमित्त श्रींच्या मंदिरावर करण्यात आलेली विद्युत रोषणाई व दर्शनासाठी झालेली भक्तांची गर्दी (छाया. : नंदू कुळकर्णी, शेगाव)

यात राम बुवा डोंगरे, जाटनांदुर, मनोज बुवा कुलकर्णी, पिंप्राळा, अनिरुद्ध बुवा क्षीरसागर, सावरगाव, बळीराम बुबा दौंड, शिवर, संभाजी बुवा मेहुणकर, धाराशिव, मयुर बुवा बोडखे, श्रीक्षेत्र देहु, श्रीहरी बुवा वैष्णव, जालना, यांनी कीर्तनसेवा अर्पण केली. तर, भरत बुबा पाटील, म्हैसवाडी यांचे आज सकाळी १० ते १२ वा. शेगावी श्रींच्या प्राकट्यानिमित्य कीर्तन झाले.उत्सवानिमित्त आयोजित महारुद्रस्वाहाकाराची आज सकाळी १० वा. यागाची पूर्णाहुती व अवभृत स्नान झाले. दुपारी श्रींची पालखी नगरपरिक्रमेसाठी निघाली. ९ रोजी रवींद्र बुवा हरणे, श्रीक्षेत्र मुक्ताईनगर यांचे सकाळी ७ वा. काल्याच्या कीर्तन व दहीहंडीने उत्सवाची सांगता होईल. ◀(तभा वृत्तसेवा)

### मुस्लिमांच्या स्थलांतरामुळे

# अमेरिकेच्या अस्तित्वाला धोका

## खासदार ब्रॅंडन गिल यांचा आरोप, डॅलस भाग पाकिस्तानसारखा वाटतो

◆ **वॉशिंग्टन, ८ फेब्रुवारी**

मुस्लिमांच्या स्थलांतरामुळे अमेरिकेच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे, प्रथा, परंपरा आणि संस्कृतीला नष्ट करण्याचा डाव रचला जात आहे. टेक्सासमधील डॅलस भागात जिकडेतिकडे मशिदीच दिसतात. या परिसरात गेल्यावर आपण पाकिस्तानात असल्याचा अनुभव येतो, अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे खासदार व राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे निकटवर्तीय ब्रॅंडन गिल यांनी संताप व्यक्त केला.

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत गिल म्हणाले, मी नुकतेच डलास भागात गेलो असतो, तिथे जिकडेतिकडे मशिदी दिसून आल्या. मला तेथे पाकिस्तानात असल्यासारखेच वाटले. अमेरिकेत मुस्लिम नागरिकांचे वाढते स्थलांतर देशासाठी धोका आहे आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी मोठी समस्या आहे. मुस्लिम देशातून आलेले नागरिक जमिनी बळकावून मशिदी बांधत आहेत. मोठ्या प्रमाणात होणारे इस्लामिक स्थलांतर अमेरिकेसाठी विनाशाचे कारण बनू शकते. यावर वचक आणणे काळाची गरज आहे. ट्रम्प यांनी इस्लामी देशातून होणारे स्थलांतर रोखण्यासाठी कठोर पावले उचलायला हवेत. यावर वेळीच उपाययोजना न केल्यास अमेरिकेला गंभीर परिणाम भोगावे लागू शकते. गिल टेक्सासच्या २६ व्या कॉंग्रेसनल जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतात. २०२४ मध्ये निवडून आल्यापासून, ते त्यांच्या तीव्र स्थलांतर विरोधी भूमिकेसाठी आणि शरियामुक्त मोहीम राबविण्यासाठी ओळखले जातात. त्यांनी अलीकडेच सोमालियातील स्थलांतरितांवर २५ वर्षांपर्यंत बंदी घालण्याचे विधेयक मांडले होते. ◀(वृत्तसंस्था)




### लोकसंख्याशास्त्र बदलणे धोकादायक

अमेरिकेच्या विविध भागात मशिदी बांधल्या जात आहेत. अनेक मशिदी पिढ्यानपिढ्या अमेरिकेत राहणाऱ्या नागरिकांच्या घरांजवळ उभारल्यात जात आहेत. गिल म्हणाले, मुस्लिम समुदायाची संख्या देशात वेगाने वाढत असून, यामुळे लोकसंख्याशास्त्र बदलाचा धोका निर्माण झाला आहे. लोक मला सांगतात की जेव्हा ते त्यांच्या स्थानिक मॉलमध्ये जातात तेव्हा ते आजूबाजूला पाहतात आणि असे वाटते की ते टेक्सासमध्ये नव्हे, तर पाकिस्तानमध्ये असल्याचा अनुभव करतात. ■

### समाज माध्यमांवर संताप

गिल यांनी पाकिस्तानवरील केलेल्या टिप्पणीवर समाज माध्यम वापरकर्त्यांकडून तीव्र संताप व्यक्त केला. अनेकांनी लिहिले की गिल केवळ त्यांच्या भारतीय-अमेरिकन पत्नीला खूश करण्यासाठी पाकिस्तानचा उल्लेख करत आहेत. एका वापरकर्त्याने उपहासात्मकपणे लिहिले की, गिल यांना नवी दिल्लीत राहण्याची इतकी सवय झाली, की पाकिस्तानचा द्वेष करणे त्यांचा स्वभाव बनला आहे. ■

# गलवान संघर्षानंतर चीनची अणुचाचणी

### अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

◆ **वॉशिंग्टन, ८ फेब्रुवारी**



१५ जून २०२० रोजी गलवान खोऱ्यात भारताशी झालेल्या संघर्षानंतर सात दिवसांनी, चीनने २२ जून रोजी गुप्त अणुचाचणी घेतली. भूकंपाची तीव्रता कमी करण्यासाठी चीनने डीकपलिंग तंत्रज्ञानाचा वापर केला, जेणेकरून जागतिक देखरेख संस्था ते शोधू शकणार नाहीत. ही चाचणी भारताच्या सीमेलगत असलेल्या शिनजियांग प्रदेशातील लोप नूर भागात करण्यात आल्याची माहिती अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली. गुप्तचर संस्थेच्या अहवालातून ही माहिती उघड झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे अवर सचिव थॉमस डीनानो यांनी जिनिव्हा येथील संयुक्त राष्ट्राच्या निःशस्त्रीकरण परिषदेत यासंदर्भातील अहवाल सादर केला. त्यात म्हटले की, चीनने डीकपलिंग तंत्रज्ञानाचा वापर करून शिनजियांग प्रदेशातील लोप नूर भागात गुप्त अणुचाचणी घेतली. भूकंपाच्या लाटा दाबण्यासाठी डीकपलिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला, जेणेकरून जागतिक देखरेख संस्था ते शोधू शकणार नाहीत. चीनने अणू करारासाठी घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन केले. लडाखमधील गलवान येथे भारत आणि चीनमध्ये झालेल्या हिंसक संघर्षानंतर सात दिवसांनी अणूचाचणी घेण्यात आली. जगाचे लक्ष विचलित करण्यासाठी चीनने जाणीवपूर्व गलवान खोऱ्यात संघर्षाची परिस्थिती निर्माण केली आणि या काळात त्यांनी अणूचाचणीची तयारी केली. संघर्षाच्या सात दिवसांतच त्यांनी चाचणी पूर्ण केली.



#### चीनने आरोप फेटाळला


चीनचे राजदूत शेन जियान यांनी आरोप फेटाळत म्हटले की, अमेरिकेच्या आरोपाला कुठलाही आधार नाही, अफवा पसरवू जगाची दिशाभूल केली जात आहे. शस्त्रास्त्रांच्या शर्यतीसाठी अमेरिका स्वतः जबाबदार आहे. चीनने अणूचाचणी केलेली नाही, याचे पुरावे संयुक्त राष्ट्राच्या निःशस्त्रीकरण परिषदेसमोर लवकरच सादर करू. ■

#### जगाचे लक्ष विचलित करण्यासाठी वेळ निवडली

चीनने व्यापक अणूचाचणी बंदी करारावर स्वाक्षरी केली आहे परंतु अमेरिकेने ती मंजूर केलेली नाही. गलवान संघर्षादरम्यान जगाचे लक्ष विचलित होण्याचा फायदा घेत त्यांनी चाचणीची प्रक्रिया पूर्ण केली. चीन मोठ्या प्रमाणात अणुचाचण्या करत असल्याची गोपनीय माहिती आमच्याकडे आहे. चीनची कृती जागतिक शांततेसाठी धोका असल्याचे डीनानो यांनी म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### रशियाच्या विद्यापीठात भारतीय विद्यार्थ्यांवर हल्ला

**मॉस्को :** रशियाच्या बाशकोर्तोस्तान प्रांतातील उफा येथील स्टेट मेडिकल विद्यापीठाच्या वसतिगृहात भारतीय विद्यार्थ्यांवर चाकू हल्ला झाला, यात चार विद्यार्थी आणि दोन सुरक्षा कर्मचारी जखमी असल्याची माहिती मॉस्कोमधील भारतीय दूतावासाने दिली. रशियाच्या गृह मंत्रालयाने सांगितले की, प्राथमिक माहितीनुसार, चाकू घेऊन एका १५ वर्षीय मुलाने वैद्यकीय विद्यापीठाच्या वसतिगृहात प्रवेश केला आणि तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला केला, ज्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले. हल्ल्याखोराला पकडताना दोन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. या प्रकरणात एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले. ■



कर्नाटकातील विजयपुरा जिल्ह्यात रविवारी एका शेतात खाजगी प्रशिक्षणार्थी विमान तांत्रिक बिघाडाने कोसळले. जमिनीवर कोसळण्यापूर्वीच दोन्ही वैमानिकांनी इजेक्ट केले. त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. रेड बर्ड एव्हिएशनचे खाजगी प्रशिक्षणार्थी विमान आहे. हे विमान कलबुर्गीहून बेळगावीकडे जात होते.

# चौपाईचा अर्थ सांगत फेटाळली याचिका

◆ **लखनौ, ८ फेब्रुवारी**

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने १६ व्या शतकातील भारतीय कवी गोस्वामी तुलसीदास यांच्या अवधी भाषेतील महाकाव्य श्री रामचरितमानसमधील एका चौपाईचा अर्थ एका वकिलासाठी स्पष्ट करत याचिका फेटाळली. न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या खंडपीठाने, श्लोकाचा खरा संदर्भ न समजून घेता त्यावर अवलंबून राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या वकिलास खडेबोलही सुनावले.

लाईव्ह लॉच्या रिपोर्टनुसार, अवनींद्र कुमार गुप्ता यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेत राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशाला आव्हान दिले होते. या आदेशात, अर्जदाराने इच्छित माहिती मिळाल्याचे विधान नोंदवल्यानंतर त्याचे अपील फेटाळण्यात आले होते. याबाबत रिट याचिका गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये दाखल करण्यात आली होती; तथापि, सुमारे दोन वर्षे आणि १० महिन्यांच्या विलंबाचे स्पष्टीकरण याचिकेत देण्यात आले नव्हते. जेव्हा खंडपीठाने त्याच्या वकिलाला विचारले की, याचिकेत विलंबाचे स्पष्टीकरण दिलेले नसताना ती का स्वीकारली जावी, असा सवालही खंडपीठाने केला.

वकिलाने सांगितले की, कलम २२६ अंतर्गत कार्यवाहीला मुदत कायद्याचे (लिमिटेशन ॲक्ट) नियम लागू होत नाहीत.विशेष म्हणजे, त्याच्या वकिलाने जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या भाषणाचा संदर्भ दिला आणि पुढे श्री रामचरितमानसमधील खालील चौपाई उधृत केली:

**समरथ कहुँ नहिं दोषु गोसाईं।**
**रबि पावक सुरसरि की नाईं॥**

तथापि, जेव्हा न्यायमूर्ती विद्यार्थी यांनी त्याला त्या चौपाईवर आधारित आपले म्हणणे सविस्तरपणे मांडण्यास आणि ती कोणी, कोणाला आणि कोणत्या संदर्भात म्हटली आहे हे स्पष्ट करण्यास सांगितले, तेव्हा वकिलाने सांगितले की त्याला त्याबद्दल माहिती नाही. ◀(वृत्तसंस्था)




### सदानंदन मास्टर यांच्या भाषणाची मोदी प्रशंसा करतात तेव्हा...

**राष्ट्रपतींच्या** अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर राज्यसभेत भाषण करतांना भाजपाचे केरळचे खासदार सदानंदन मास्टर यांनी खळबळ उडवून दिली. केरळमध्ये डाव्या पक्षांचा हिंसाचार हा नेहमीच चिंतेचा विषय असतो. सदानंदन यांनी डाव्यांच्या हिंसाचाराचे एक उदाहरण पुराव्यासह सभागृहात मांडले, तेव्हा संपूर्ण सभागृह सुन्न झाले. आज या सभागृहात सर्व पक्ष लोकशाहीच्या गोष्टी करत आहेत, पण लोकशाहीच्या नावाने गळा काढणाऱ्या डाव्या पक्षाच्या गुंडांनी कन्नूर येथे ३१ वर्षांपूर्वी माझ्यावर हल्ला चढवला; माझे दोन्ही पाय कापून काढले. या हल्ल्यातून मी कसाबसा बचावलो, बहिणीचे लग्न ठरवून घरी परत येण्यासाठी बसमधून उतरत माझ्यावर हा प्राणघातक हल्ला झाला तेव्हा कन्नूर येथे मी रा. स्व. संघाचा सहकार्यवाह पदावर होते. मी संघाचा कार्यकर्ता असल्यामुळे डाव्या पक्षांच्या गुंडांनी माझ्यावर जीवघेणा हल्ला केला, असे सदानंदन मास्टर यांनी सांगितले. सदानंदन यांनी नंतर कृत्रिम पाय बसवले. डाव्यांच्या गुंडागर्दीचा धडधडीत पुरावा म्हणून सदानंदन यानी आपले दोन्ही कृत्रिम पाय काढून सभागृहातील मेजावर ठेवले, हीच तुमची लोकशाही आहे का? अशीच लोकशाही तुम्हाला अपेक्षित आहे? या सदानंदन मास्टर यांच्या प्रश्नाने संपूर्ण सभागृह शहारले. सभागृहात उपस्थित डाव्या पक्षांच्या सदस्यांचे चेहरे पडले, त्यांना वर मान करुन पाहणे कठीण झाले. माकपचे जॉन ब्रिटास यांनी सदानंदन यांच्या या कृतीवर आक्षेप घेण्याचा प्रयत्न केला, हरकतीचा मुद्दा उपस्थित करत ब्रिटास म्हणाले की, सभागृहात अशा गोष्टी आणणे नियमाला धरुन नाही. ब्रिटास यांचा आक्षेपावर सदानंदन म्हणाले की, तुम्ही लोकशाही आणि सहिष्णूतेच्या गोष्टी करता, पण तुमचे राजकारण हिंसेवर आधारित आहे. ब्रिटास यांचा हरकतीचा मुद्दा फेटाळून लावतांना सभापती सी.पी. राधाकृष्णन म्हणाले की, सभागृहात घोषणांचे पोस्टर्स आणणेही नियमात बसत नाही. डाव्या पक्षांच्या गुंडांनी केलेल्या हल्ल्यामुळे भाषणासाठी मला उभे राहात येत नाही, याचे मला दुःख होत आहे, असे सदानंदन म्हणाले. राज्यसभेत या चर्चेच्या उत्तराच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सदानंदन यांच्या हिंमतीची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

●● ●●

### मुख्यमंत्री ममता बॅनर्जी वकील होतात तेव्हा...

**पश्चिम बंगालच्या** मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी मागील आठवड्यात राजधानी दिल्लीत आल्या होत्या. चर्चेत राहणे, खळबळ उडवणे आणि प्रसिध्दी माध्यमांचा झोत आपल्यावर ठेवणे हे ममतांना बरोबर जमते. राज्यातील मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या मुद्यावर (एसआयआर) त्यांच्या नेतृत्वात तृणमूल काँग्रेसचे शिष्टमंडळ मुख्य निवडणूक आयुक्तांना भेटले. विशेष म्हणजे निवडणूक आयुक्ताच्या कार्यालयात गेलेले तृणमूल काँग्रेसचे शिष्टमंडळ जाणिवपूर्वक काळे कपडे परिधान करुन गेले होत. ममता बॅनर्जी यानी आपल्या अंगावर काळी शाल घेतली होती.

एसआयआरच्या मुद्यावरुन ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेच्या सुनावणीसाठी ममता बॅनर्जी काळा कोट घालून सर्वोच्च न्यायालयात हजर झाल्या, त्यांनी आपल्या याचिकेवर स्वतः युक्तिवाद केला. आतापर्यंत अनेक मुख्यमंत्री सर्वोच्च न्यायालयात आरोपी, साक्षीदार वा याचिकाकर्ते म्हणून उपस्थित राहिले असतील. पण मुख्यमंत्री पदावर असतांना न्यायालयात युक्तिवाद करणाऱ्या ममता या देशातील पहिल्याच वकील म्हणाव्या लागतील. एमएनंतर कोलकाताच्या एका विधि महाविद्यालयातून ममता बॅनर्जीनी एलएलबीची पदवी घेतली आहे. वकील म्हणून ममतांनी २००३ मध्ये न्यायालयात शेवटचा युक्तिवाद केला होता.

राजकारणात आल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी वकिली बंद केली. ममता बॅनर्जी यांना महागडे वकील लावणे अशक्य नव्हते. पण त्यांनी आपल्या याचिकेवर स्वतःच युक्तिवाद करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची परवानगी मागितली आणि न्यायालयानेही त्यांना तशीच परवानगी दिली. तृणमूल काँग्रेसच्या हॅण्डलवर ममता बॅनर्जी यांचा उल्लेख जनतेचा वकील असा करण्यात आला. ममता बॅनर्जी सर्वोच्च न्यायालयात येत असतांना त्यांच्यासोबत अनेक ज्येष्ठ वकीलही होते.

### १ मोतीलाल नेहरू मार्ग नितीन नवीन यांचा नवीन पत्ता

**भाजपाचे** नवीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांना राजधानी दिल्लीत १ मोतीलाल नेहरू मार्ग हा टाईप ८ श्रेणीतील बंगला देण्यात आला आहे. या बंगल्याच्या नूतनीकरणाचे काम सुरु असून लवकरच ते या बंगल्यात राहण्यास येणार आहे. १ मोतीलाल नेहरू मार्ग हा बंगला झामुमोचे नेते माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांच्याकडे होतो. याआधी नवीन यांना ९ सुनहरी बाग येथील बंगला सूचवण्यात आला होता, पण हा बंगला त्यांना पसंत पडला नाही. त्यामुळे त्यांना आता १ मोतीलाल नेहरू मार्ग हा बंगला देण्यात आला.

टाईप ८ बंगला केंद्रीय मंत्री आणि सरकारमधील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना दिला जातो. या बंगल्यात ५ ते ६ बेडरुम, ड्राईंग रुम, स्टडी रुम, किचन आणि भोजनकक्ष असते. मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांना अध्यक्षांना राजधानी दिल्लीत सरकारी बंगला देण्याची तरतूद आहे. या नियमाच्या आधारेच कोणत्याही घटनात्मक पदावर नसतांना दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना दिल्लीत शासकीय बंगला मिळाला आहे.

●● ●●

### संविधान सदनात मिळाले नितीन नवीन यांना दालन

**जुन्या** संसदभवनात म्हणजे संविधान सदनात भाजपाचे नवीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांना कार्यालय मिळाले आहे. जुन्या संसद भवनाच्या तळमजल्यावर भाजपा सांसदीय कार्यालयाच्या बाजूला ४ क्रमांकाचे दालन नवीन यांना देण्यात आले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर रालोआचे नेते म्हणून हे दालन अटलबिहारी वाजपेयी यांना देण्यात आले होते. मात्र प्रकृतीच्या कारणामुळे वाजपेयी या दालनात कधी आले नाही. २००९ मध्ये लालकृष्ण अडवाणी यांना हे दालन मिळाले. २०१४ पर्यंत अडवाणी या दालनात नियमित बसत तसेच भाजपा आणि रालोआच्या खासदारांना भेटत. २०१८ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झाले, त्यानंतरही बराचकाळ त्यांच्या नावाची पाटी या दालनावर होती. २०२१ मध्ये वाजपेयी आणि अडवाणी यांच्या नावाची पाटी हटवण्यात आली आणि हे दालन भाजपाचे तेव्हाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना देण्यात आले. आता नितीन नवीन यांच्याकडे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जबाबदारी आल्यानंतर हे दालन त्यांना देण्यात आले, त्यांच्या नावाची पाटीही या दालनावर लावण्यात आली.

● **दिल्लीवाला**

# तुरीला मिळाला नऊ हजारांचा भाव

## पांढरकवड्याचे रजनीकांत बोरेले यांनी लावली बोली



### देशात दराचा उच्चांक

**पांढरकवडा, ८ फेब्रुवारी**



प्रख्यात व्हिसलब्लोअर रजनीकांत बोरेले यांचा पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्य खरेदी आणि अडत व्यवसाय आहे. आज संपूर्ण देशात तुरीला सर्वाधिक म्हणजेच ९ हजार रुपये प्रती क्विंटल भाव देणारे म्हणून त्यांनी आपली ओळख प्राप्त केली आहे.

हा व्यवसाय करताना शेतकऱ्यांच्या धान्याला जास्तीतजास्त भाव कसा देता येईल, हाच बोरेले यांचा प्रयत्न असतो. देशात कुठल्याच मंडी किवा प्लांटमध्ये तुरीला ८६०० पेक्षा जास्त भाव नसताना २८ जानेवारीला दुपारी १ वाजता रजनीकांत बोरेले यांनी धान्याचा लिलावाची बोली सुरू केली आणि ती ९००० रुपयांपर्यंत नेऊन ठेवली.

त्यावेळी आणि नंतरही तूर ८८००, ८७५०, ८६००, ८५०० अशा प्रकारेच लिलावात खरेदी केली जात आहे, हे विशेष. महत्त्वाचे म्हणजे, बोरेले यांच्याशिवाय देशातील कोणत्याही खाजगी किवा कृषी उत्पन्न बाजार समितीत अथवा तुरीच्या दाल मिलमध्येदेखील ९००० रुपये भाव कोणीही देत नाही. ◀(तभा वृत्तसेवा)

### शेतकऱ्यांना लुटणारी 'मामूल' पद्धतही नाही

रजनीकांत बोरेले यांच्या नावावर शेतकरी धान्य विक्रीसाठी पांढरकवडा बाजार समितीत घेऊन येतात. त्यांच्याकडे 'मामूल' ही परंपरासुद्धा नाही. मामूल देणे म्हणजे शेतकऱ्यांना लुटून देणे होय. त्यांच्या लिलावाच्या बोलीची शेतकऱ्यांना नेहमीच प्रतीक्षा असते. त्यामुळे पांढरकवडा बाजार समितीत शेतकऱ्यांना धान्य विक्रीला आणायचे असल्यास पहिली पसंती रजनीकांत बोरेले यांची अडत किंवा खरेदी राहते. ते तुरीला मोठा भाव देत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाची लाट आहे. ■




पंतप्रधान नरेंद्र मोदी मलेशियाच्या दौऱ्यावर आहेत. राजधानी क्वालालम्पूर येथे मोदींचे स्वागत करताना मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम

# चिनाब नदीवरील जलविद्युत प्रकल्पाला मोदी सरकारचा हिरवा कंदील

**पाकिस्तानला मोठा धक्का**

◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबत असलेला सिंधू पाणी करार अनिश्चित काळासाठी स्थगित केला. त्यानंतर आता भारत सरकारने आता जम्मू-कश्मीरमध्ये पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्रासंबंधी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारी क्षेत्रातील कंपनी एनएचपीसीने चिनाब नदीवरील सावलकोट जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीसाठी अधिकृतपणे टेंडर प्रक्रिया सुरू केली आहे.

रामबन जिल्ह्यात प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पासाठी सुमारे ५,१२९ कोटींचा खर्च अपेक्षित असून, संपूर्ण कामकाज एका एकत्रित पॅकेजअंतर्गत राबवले जाणार आहे. टेंडर दस्तावेजांनुसार, या पॅकेजमध्ये डायव्हर्जन टनेल, ॲडिट्स, डीटी, कोफर डॅम, तसेच मांडिया नाला डीटी, त्यासंबंधित रस्ते बांधकाम, राइट बँक स्पायरल टनेल, ॲक्सेस टनेल आणि धरणाशी संबंधित सर्व पूरक कामांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)




### निविदा प्रक्रिया व कालमर्यादा

एनएचपीसीने दिलेल्या माहितीनुसार, बोली प्रक्रिया १२ मार्चपासून २० मार्चपर्यंत चालेल, तर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सुमारे नऊ वर्षे लागतील. सावलकोट जलविद्युत प्रकल्पातून १,८५६ मेगावॅट वीज निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर जम्मू-कश्मीरच्या वाढत्या ऊर्जा गरजा भागवण्यास मदत होणार असून, राष्ट्रीय वीज ग्रिडही अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

### रणनीतिक आणि आर्थिक महत्त्व

पाकिस्तानातील शेतीचा मोठा भाग सिंधू नदीच्या पाण्यावर चालतो. अशा परिस्थितीत, भारताने सिंधूचे पाणी अडवल्यामुळे पाकिस्तानला मोठा फटका बसत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाकिस्तानसोबत वाढलेल्या तणावादरम्यान हा प्रकल्प भारताच्या रणनीतिक आणि आर्थिक सामर्थ्याचे प्रतीक मानला जात आहे. चिनाब नदीवरील हा उपक्रम देशातील जलसंपत्तीचा अधिक परिणामकारक वापर करण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# राफेलची निर्मिती भारतात होणार

## चीन-पाकिस्तानची चिंता वाढली

◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

भारत आपल्या हवाई दलाला बळकट करण्यासाठी सतत काम करत आहे. अत्याधुनिक राफेल विमाने आधीच हवाई दलाच्या ताफ्यात आहेत. ११४ राफेल विमाने खरेदी करण्याची प्रक्रिया आता वेगवान करण्यात आली आहे. यातील ६० टक्के विमानांची निर्मिती भारतातच केली जाणार आहे.

वृत्तानुसार, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत दौऱ्यापूर्वी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण अधिग्रहण परिषदेची बैठक होणार आहे. या बैठकीत ३.२५ लाख कोटी रुपयांच्या ११४ राफेल विमानांच्या खरेदीला मान्यता मिळू शकते. ऑपरेशन सिंदूरपासून, भारत आपल्या संरक्षण क्षेत्राला वेगाने बळकटी देत आहे हे लक्षात घ्यावे. १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान भारतात एक एआय शिखर परिषद होणार आहे, ज्यामध्ये इमॅन्युएल मॅक्रॉन देखील सहभागी होतील.

या प्रस्तावित प्रकल्पात १८ विमाने खरेदी केली जातील. ६० टक्के विमाने भारतात तयार केली जातील. या ११४ विमानांपैकी ८० टक्के विमाने भारतात तयार केली जाऊ शकतात. अहवालांनुसार, या प्रकल्पात ८८ सिंगल-सीटर आणि २६ ट्विन-सीटर विमाने खरेदी केली जाऊ शकतात. यापैकी बहुतेक विमाने भारतात तयार केली जातील. दहा भारतीय खाजगी क्षेत्रातील कंपन्या संयुक्तपणे विमानांची निर्मिती करतील. या प्रकल्पाला गेल्या महिन्यात संरक्षण अधिग्रहण मंडळाने मान्यता दिली होती. आता पुढील स्तरावर या प्रकल्पाला मंजुरी मिळणे आवश्यक आहे. त्यानंतर, औपचारिक तांत्रिक आणि व्यावसायिक वाटाघाटी सुरू होतील. मॅक्रॉन यांच्या भारत भेटीदरम्यान या प्रकल्पाला अंतिम स्वरूप दिले जाऊ शकते. (वृत्तसंस्था)



### संरक्षण क्षेत्रासाठी तरतुदीत वाढ

**या आर्थिक वर्षात संरक्षण मंत्रालयासाठी ७.८५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी गेल्या वर्षीपेक्षा १५ टक्के जास्त आहे. ऑपरेशन सिंदूर नंतरचे हे पहिले बजेट कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी संरक्षण तयारी जलद गतीने वाढवण्यावर आणि सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण करण्यावर जोरदार भर देते. संरक्षण बजेटसाठी वाटप केलेली रक्कम एकूण जीडीपीच्या १.९९ टक्के आहे.**

## मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, ८ फेब्रुवारी**

मणिपूरच्या वेगवेगळ्या भागात राबविण्यात आलेल्या शोधमोहीमेत सुरक्षा दलाने प्रतिबंधित संघटनेच्या चार बंडखोरांना अटक केली. सर्व आरोपींवर व्यावसायिक, वाहनचालकांकडून खंडणी उकळण्याच आरोप आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यातून दोन बंडखोरांना अटक करण्यात आली. याशिवाय काकचिंग लमखाई आणि कांचीपूर भागातून दोघांना अटक करण्यात आली. भारत-म्यानमार सीमेजवळील तेंगनौपाल जिल्ह्यातील यांगौबंग भागातून एक मोर्टार आणि दोन आयईडी जप्त करण्यात आले. बॉम्बशोधक पथकाने बॉम्ब निकामी केले. अटक केलेले आरोपी खंडणी आणि गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी होते. (वृत्तसंस्था)

# व्यापार करार आराखड्यात भारतीय शेतकऱ्यांना संरक्षण



◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

भारत आणि अमेरिकेने अंतरिम व्यापार करारासाठी एक चौकट जाहीर केली असून, त्याअंतर्गत अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील प्रतिपूर्ती (रेसिप्रोकल) आयात शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. संयुक्त निवेदनानुसार, भारताच्या कृषी बाजाराला पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. भारताने संवेदनशील मानल्या जाणाऱ्या कृषी व दुग्धजन्य उत्पादनांवर कोणतीही आयात शुल्क सवलत दिलेली नाही.

केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, हा करार शेतकऱ्यांच्या हितांचे संरक्षण आणि ग्रामीण उपजीविकेचे संवर्धन करण्याबाबत भारताची ठाम बांधिलकी दर्शवतो. मका, गहू, तांदूळ, सोयाबीन, कुक्कुटपालन, दूध, चीज, इथेनॉल (इंधन), तंबाखू, काही भाज्या आणि मांस यांसह संवेदनशील कृषी व दुग्धजन्य उत्पादनांना पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. या अंतरिम करारामुळे व्यापक व्यापारी लाभ मिळत असले, तरी मुख्य अन्नधान्ये आणि शेतीशी संबंधित उत्पादनांना दिलेले संरक्षण हे स्पष्ट संकेत देतात की, भारत आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कणाकणाला तडजोडीच्या वाटेवर नेणार नाही. हा करार वस्त्रोद्योग, पादत्राणे, औषधे ते विमानांचे सुटे भाग अशा विविध भारतीय उत्पादनांवरील अमेरिकेचे परस्पर शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करून भारतीय निर्यातीसाठी अमेरिकेचा मोठा बाजार खुला करतो. (वृत्तसंस्था)

### करारात संरक्षण असलेली प्रमुख कृषी उत्पादने

#### मुख्य धान्ये (अन्नधान्ये)

खालील मूलभूत अन्नस्रोतांवर कोणतीही शुल्क कपात किंवा कोटा लागू होणार नाही. अमरंथ (राजगिरा), नाचणी (रागी), गहू, कोदो मिलेट, बार्नयार्ड मिलेट, मका, तांदूळ, बार्ली (जव), ज्वारी (सोरघम), बकव्हीट (कुटू), बाजरी, कांगणी (फॉक्सटेल मिलेट), ओटस्, न पॉलिश केलेली धान्ये, मैदा, तसेच गहू, मका, तांदूळ, बाजरी आदींचे पीठ.



#### दुग्धजन्य उत्पादने

लाखो लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांना रोजगार देणारा दुग्ध व्यवसाय पूर्णपणे संरक्षित ठेवण्यात आला आहे. दूध (द्रव, पावडर, केसिन), चीज (मोझरेला, ब्लू-व्हेन्ड, किसलेले/पावडर स्वरूपातील), क्रीम, बटर ऑईल, लोणी व तूप, दही, ताक, व्हे (दुधातील प्रथिने) उत्पादने




#### भाज्या व कडधान्ये

लहान शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात पिकवल्या जाणाऱ्या प्रमुख भाज्या व कडधान्यांवरही शुल्क सवलत दिलेली नाही. गोठवलेल्या भाज्या, बटाटे, वाटाणे, शेंगा, इतर कडधान्ये व भाज्या (सोललेल्या/न सोललेल्या), मिश्र गोठवलेल्या भाज्या, तात्पुरत्या जतन केलेल्या भाज्या, काकडी व घेरकिन्स, मशरूम (अगारिकस प्रकार), मिश्र जतन केलेल्या भाज्या



#### काही अमेरिकी उत्पादनांना प्रवेश

संवेदनशील उत्पादनांच्या आयातीपासून अंतर राखण्यात आले असले, तरी या अंतरिम करारामुळे भारतीय बाजारात काही अमेरिकन औद्योगिक व कृषी उत्पादने प्रवेश करू शकतील. यामध्ये डिस्टिलर्स ड्रायड ग्रेन्स, जनावरांच्या खाद्यासाठी लाल ज्वारी, सुकामेवा (ट्री नटस्), ताजी व प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल, वाईन आणि मद्य यांचा समावेश आहे. हे शुल्क बदल व्यापारातील तणाव कमी करणे आणि बाजारपेठेत प्रवेश सुलभतेच्या बांधिलकीचा भाग आहेत.



## चित्रपट वार्ता

### ‘तस्करी...’चा जगात बोलबाला

**मुंबई** : सध्या जगभरात एका भारतीय सीरिजबद्दल जोरदार चर्चा सुरू आहे. ही सीरिज डिजिटल प्लॅटफॉर्मवर अव्वल ठरली असून आयएमडीवरही ७.३ रेटिंग मिळाले आहे. या सीरिजचे नाव ‘तस्करी : द स्मगलर्स वेब’ आहे. सध्या या सीरिजने जगभरात धुमाकूळ घातला आहे. प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्याच आठवड्यात या सीरिजने जगातील पहिल्या दहा सीरिजच्या यादीत स्थान पक्के करत इतिहास रचला. शिवाय, पहिल्याच आठवड्यात ‘तस्करी’ने पाच कोटी व्ह्यूजचा टप्पा ओलांडला. नीरज पांडे दिग्दर्शित या सीरिजमध्ये शरद केळकर, अनुराग सिन्हा, झोया अफरोज, अमृता खानविलकर, अनुजा साठे आणि नंदिश संधू यांच्यासोबत इमरान हाश्मी मुख्य भूमिकेत आहे.




### प्रार्थना म्हणते, मूल नकोच!

**मुंबई** : मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरेने २०१७ मध्ये दिग्दर्शक, निर्माता अभिषेक जावकरसोबत लग्न केले. दोघांचे आयुष्य अगदी छान सुरू आहे. त्याच्या कथा ती समाज माध्यमांवर टाकतच असते. प्रार्थना आणि अभिषेकने मूल न होऊ देण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतला आहे. यामागील कारण तिने नुकतेच एका मुलाखतीत सांगितले. तिने म्हटले की, मी लहान असताना माझ्या शेजारी एका काकांकडे ज्युली नावाची मादी श्वान होती. मीसुद्धा तिच्याशी खूप खेळायचे. पण, जेव्हा ती गेली तेव्हा ते काका-काकू खूप रडले. आम्हालाही खूप वाईट वाटले. पण, ते दोघं त्यांची मुलगी गेल्यासारखे रडत होते. मला तेव्हा वाटले की, प्राणी असताना एवढे दु:ख का करायचे? पण, तेव्हा हे कळलं नाही. आता माझ्याकडे बरेच पाळीव श्वान आहेत. ते इतके निरपेक्ष आणि प्रेमळ आहेत की त्यांच्या प्रेमाने आम्ही तृप्त आहोत. त्यांच्या आपल्याकडून काहीच अपेक्षा नसतात. याउलट, आपले अपत्य असले की त्याला कितीतरी अपेक्षा असतात. हा विचार करूनच आम्ही मूल होऊ न देण्याचा निर्णय घेतला.



### अखेर कृतिकाचा जोडीदार ठरला

**मुंबई** : मनोरंजन जगतातील प्रसिद्ध अभिनेत्री कृतिका कामरा आणि क्रिकेट विश्वातील प्रसिद्ध चेहरा गौरव कपूर येत्या मार्च महिन्यात लग्न करणार आहेत. हा विवाह सोहळा मुंबईतच पार पडणार असून मोजक्या मित्रमंडळींसह नातेवाईकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. डिसेंबर २०२५ मध्ये दोघांनी समाज माध्यमांवर एका पोस्टद्वारे आपल्या प्रेमाची कबुली दिली. कृतिकाचे नाव यापूर्वी करण कुंद्रा आणि जॅकी भगनानी यांच्यासोबत जोडले जात होते. तिचे हे पहिलेच लग्न असले तरी गौरवचे हे दुसरे लग्न आहे. यापूर्वी त्याने अभिनेत्री आणि मॉडेल किरत भट्टलसोबत लगीनगाठ बांधली होती. २०२१ मध्ये ते विभक्त झाले.



# बांगलादेशात हिंदू नेत्याचा कारागृहात मृत्यू

◆ **ढाका, ८ फेब्रुवारी**

बांगलादेशातील तुरुंगांमध्ये बंद असलेल्या कैद्यांशी होणाऱ्या वर्तनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अवामी लीगचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि खासदार रमेश चंद्र सेन (८६) यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. ते सुमारे १८ महिन्यांपासून तुरुंगात होते आणि दीर्घकाळापासून आजारी होते.

कुटुंबाचा आरोप आहे की गंभीर आरोग्य समस्या असूनही त्यांना पुरेसे उपचार मिळाले नाहीत आणि आरोग्याच्या कारणास्तव जामिनाची मागणी वारंवार फेटाळली जात होती. अधिकाऱ्यांनी मृत्यूचे कारण आजारपण सांगितले आहे.

कुटुंबातील एका सदस्याने सांगितले की, रमेश चंद्र सेन यांची तब्येत तुरुंगात असताना सतत बिघडत गेली. त्यांना योग्य उपचारही मिळाले नाहीत आणि सन्मानही मिळाला नाही. त्यांचे मूलभूत मानवाधिकारही हिरावून घेण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

# अजितदादांच्या अस्थी रामेश्वरम्‌च्या अग्नी तीर्थ सागरात विसर्जित

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून अखेरचा निरोप

◆ **रामेश्वरम्, ८ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थी रामेश्वरम येथील अग्नि तीर्थ सागरात विसर्जित केल्या. यासोबतच त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अजित पवार यांच्या पार्थिवावर बारामती येथील विद्या प्रतिष्ठान मैदानावर पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले होते. तिथे त्यांच्या मुलांनी चितेला मुखाग्नी दिला होता. अंत्यसंस्काराला अनेक मोठे नेते उपस्थित होते.

यापूर्वी अजित पवार यांच्या अस्थींचे हरिद्वार येथील व्हीआयपी घाटावर विसर्जन करण्यात आले. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा अस्थी कलश घेऊन हरिद्वारला पोहोचले होते आणि त्यांनीच वैदिक विधी-विधानानुसार विसर्जन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते, तर पवार कुटुंबातील कोणताही सदस्य कार्यक्रमात सहभागी झाला नाही.

अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर एका चार्टर्ड विमानांच्या अपघातात निधन झाले होते. या अपघातात त्यांच्यासोबत दोन पायलट, एक महिला क्रू मेंबर आणि एक सुरक्षा कर्मचारी अशा एकूण ५ लोकांचा जीव गेला होता. विमान लँडिंग करताना धावपट्टीच्या आधी कोसळले होते आणि त्याला आग लागली होती. (वृत्तसंस्था)



पवार कुटुंबीयांकडून ‘दादां’ना भावपूर्ण निरोप : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थी कलश यात्रेचा रविवारी प्रयागराज येथे समारोप झाला. १२ राज्यांतून मार्गक्रमण करत त्यांचा अस्थिकलश रविवारी चार्टर्ड विमानाने संगमावर आणला. जय पवार आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत दादांच्या अस्थींचे संगमात विसर्जन करण्यात आले. यावेळी सुनेत्रा पवारांसह सर्व कुटुंबीय आणि कार्यकर्ते भावूक झाले होते

## टेम्पोचा अपघात, पाच ठार, सहा जखमी

◆ **लखीमपूर खेरी. ८ फेब्रुवारी**

उत्तर प्रदेशच्या लखीमपूर खेरी येथील धौरहरा पोलिस ठाणे परिसरात शनिवारी रात्री उशिरा प्रवाशांनी भरलेला टेम्पो बसंतपूर कल्व्हर्ट भागात रस्त्याच्या कडेला उलटला. या अपघातात तीन मुलांसह पाच जणांचा मृत्यू झाला, तर सहा जखमी आहे. उपचारादरम्यान चालकाचाही मृत्यू झाला.

लखीमपूर खेरी येथील नागरिक टेम्पोने धौरहरा येथील धार्मिक कार्यक्रमात गेले होते, तेथून परत येत असताना शनिवारी रात्री १२:४५ वाजता सुमारास बसंतपूर कल्व्हर्टजवळ असलेल्या उंचगाव भागातील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो रस्त्याच्या कडेला उलटला. घटनेची माहिती मिळताच पोलिस अपघातस्थळी पोहोचले. (वृत्तसंस्था)

# देशातील ३१ शहरे झाली स्मार्ट



## महाराष्ट्रात फक्त पुणे, सोलापूरचा समावेश

**दहा वर्षांतील आकडेवारी**

◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

देशातील १०० शहरांना स्मार्ट सिटीमध्ये रूपांतरित करण्यासाठी २०१६मध्ये पाच वर्षांसाठी एक प्रकल्प सुरू करण्यात आला होता. मात्र, दहा वर्षे उलटून गेली आणि प्रकल्पाची मुदत तीन वेळा वाढवूनही केवळ ३१ शहरेच स्मार्ट बनू शकली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर या दोन शहरांचा समावेश आहे. तर, आणखी २६ शहरांना स्मार्ट होण्यासाठी काही काळ लागणार आहे.

माहितीचा अधिकार अंतर्गत दाखल केलेल्या अर्जाच्या उत्तरात केंद्रीय गृहनिर्माण मंत्रालयाने सांगितले की, स्मार्ट सिटीचे ४३ शहरांमधील प्रकल्प जवळपास पूर्ण झाले आहेत, तर २६ शहरांमध्ये हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी अजून वेळ लागणार आहे. डिसेंबर २०२५पर्यंतच्या आकडेवारीनुसार, या प्रकल्पांतर्गत सुमारे दहा वर्षात ५९,३८५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. (वृत्तसंस्था)

### अंतिम टप्प्यात असलेली शहरे अन् प्रकल्प संख्या

(१) औरंगाबाद (२ प्रकल्प), कल्याण-डोंबिवली (३), नाशिक (२), पिंपरी-चिंचवड (१), ठाणे (२), विशाखापट्टणम (२), गुवाहाटी (१), भागलपूर (१), पणजी (४), अहमदाबाद (१), गांधीनगर (२), सिमला (३), जम्मू (४), बंगळुरू (१), दावणगेरे (१), हुबळी-धारवाड (२), कोच्ची (२), कावारट्टी (४), तिरुवअनंतपूरम (३), ग्वाल्हेर (४), सागर (२), उज्जैन (३), इम्फाळ (४), शिलाँग (३). स्मार्ट सिटी मोहिमेसाठी २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधील शहरे निवडली होती.

### स्मार्ट सिटी ठरलेली ३१ शहरांची नावे अन् पूर्ण झालेले प्रकल्प

आगरतळा (७७ प्रकल्प), आग्रा (६२), अटल नगर (५२), बरेली (८८), भोपाळ (८२), चंडीगड (२७), कोईबतूर (७२), दाहोद (३६), इरोड (५५), इंदूर (२३१), जबलपूर (१३०), झाशी (७८), कोहिमा (४०), मदुराई (१६), मुरादाबाद (४१), पाटणा (३४), पुणे (५५), राजकोट (७१), रांची (२६), सालेम (११४), शिवमोग्गा (११२), सोलापूर (४९), सूरत (८७), तुतिकोरिन (७५), तिरुचिरापल्ली (८३), तिरुनेलवेली (८१), त्रिप्पूर (२८), तुमकुरू (२१७), उदयपूर (१४३), वडोदरा (५२), वाराणसी (११७). या ३१ स्मार्ट शहरांमध्ये सर्वाधिक खर्च ज्या शहरांवर झाला आहे, त्यामध्ये इंदूर, त्रिप्पुर, सूरत, वाराणसी, भोपाळ आणि राजकोट यांचा समावेश आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# अखेर कोंडी फुटली...

सध्या डोनाल्ड ट्रम्प यांचे वागणे म्हणजे धनाढ्य घरातील उनाड मुलासारखे आहे. ज्याप्रमाणे साऱ्या वस्तीला, गावाला अशा उनाड मुलाचा त्रास मुकाट्याने सहन करावा लागत असतो, तीच परिस्थिती सध्या जगाची ट्रम्प यांच्या बाबतीत झाली आहे. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अवघे जग घायकुतीला आले आहे. एवढेच नव्हे तर, खुद्द अमेरिकेतही प्रचंड खदखद आहे. कित्येकवेळा लक्षावधी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरले आणि ट्रम्प प्रशासनाचा निषेध केला. पण, 'अमेरिका फर्स्ट' चा नारा देत आपलेच घोडे पुढे दामटणाऱ्या ट्रम्प यांना कुणाचेही सोयरसूतक राहिलेले नाही. त्यांच्यासाठी आता नैतिक-अनैतिक यांच्यातील फरक उरलेलाच नाही. ट्रम्प यांच्या व्यापारविषयक धोरणांमुळे जगातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली. अनेक देशांवर जबर व्यापार शुल्क लादल्याने अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाले. जे युरोपीयन देश जागतिक राजकारणात अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावून चालत आले आहेत, त्यांनाही ट्रम्प यांनी सोडले नाही. भारतालाही त्याचा चांगलाच फटका बसला. ५० टक्के व्यापार शुल्क आकारल्याने उद्योजकांची वाट कठीण झाली. समुद्री उत्पादने, कापड उद्योग, मोती व दागिने आणि चामडे उद्योगांना तोटा सहन करावा लागला. कारण, या उद्योगातील उत्पादनांची अमेरिकेत मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. अमेरिकेने आकारलेल्या जशास तसे (रेसिप्रोकल टॅरिफ) शुल्काचा विपरित परिणाम होऊन नोकर कपातीची वेळ अनेक लघुउद्योगांवर आली. पण, भारत सरकारने हे प्रकरण संयमाने हाताळत अमेरिकेमुळे होणारी व्यापार तुट भरून काढण्यासाठी तिसऱ्या जगातील देशांकडे आपला मोर्चा वळविला. चीनप्रमाणे भारताने अमेरिकेसोबत व्यापार शुल्क युद्धात न पडता 'वेट अण्ड वॉच'ची भूमिका घेतली. याच दरम्यान ब्रिटन, न्यूझीलंड, ओमान या देशांबरोबर आणि युरोपीयन युनियनसोबत मुक्त व्यापार करार करीत भारताने अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. भारताने घाईगडबडीत निर्णय न घेता आफ्रिका, युरोप आणि लॅटिन अमेरिकेतील देशांकडे आपला मोर्चा वळविला. भारत बधत नसल्याचे आणि कुठलीही प्रतिक्रिया देत नसल्याचे पाहून ट्रम्प प्रशासन अस्वस्थ झाले. जवळपास सहा महिने ५० टक्के व्यापार शुल्काचा भार सहन करीत भारताने ट्रम्प यांना चर्चेच्या टेबलावर येण्यास भाग पाडले. सध्याचे जग हे एकमेकांशी जुळलेले आहे. प्रत्येक देश इतर देशांवर कशासाठी तरी अवलंबून असतो. अमेरिका स्वतःला कितीही बलाढ्य आणि शक्तिशाली समजत असला तरी त्यालाही चीन, रशियासोबत व्यापार करावाच लागतो. डोकलाम, गलवानच्या घटना होऊनही भारत-चीन यांना जवळ यावेच लागले. कारण, कोणताही देश कायमस्वरूपी एकटा राहू शकत नाही. दीर्घ द्वेष बाळगू शकत नाही. सध्याच्या बहुध्रुवीय जगात शत्रुत्व हे कधीच कायम जपायचे नसते. जगाच्या विकासासाठी संवाद व शांततेची नितांत गरज असते. भारताला डिवचण्यासाठी ट्रम्प गेली सहा महिने विविध प्रकारची विधाने करीत आले. प्रसंगी पाकिस्तानलाही कुरवाळले, आर्थिक मदतही केली, पण भारताने त्यावर कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. दुसरीकडे भारत-अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी चर्चा करीतच होते. अखेर ऑगस्ट २०२५ पासून सुरू असलेली व्यापार कोंडी फुटली आणि दोन्ही देश मुक्त व्यापार करारावर सहमत झाले. ५० टक्के असलेले व्यापार शुल्क १८ टक्क्यांवर आले. आता या करारावर देशभरात चर्चा रंगली आहे. मोदी सरकार ट्रम्प यांच्यासमोर झुकल्याचा आरोप विरोधकांनी सुरू केला आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर गदारोळही झाला. करारातील मुद्यांवर दोन्ही बाजूंनी काहीशी संदिग्धता असला, तरी प्रथमता व्यापार कोंडी फोडणे आवश्यक आहे. कारण, देशाच्या प्रमुखाचे काम हे जनतेला त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे असते.

अमेरिका हा कोडगा, स्वार्थी आणि मतलबी देश आहे. तेवढाच पळपुटा आणि घाबरटही आहे. इतिहासात डोकावले असता या देशाने कधीही स्वबळावर एकही युद्ध जिंकले नाही. रशिया अथवा चीनसोबत कधीही तो थेट भिडला नाही. उलट, व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानातून पाठ दाखवून पळून जाण्याची नामुष्की अमेरिकेवर आली. स्वतःला शक्तिशाली समजणारी अमेरिका केवळ अफगाणिस्तान, इराक, सीरिया, व्हेनेझुएला यासारख्या गरीब आणि दुर्बल देशांविरोधात दंड थोपटत असते. भारताविरोधातही कुरापती करीत असते. तरीही तो देश एक महाशक्ती आहे हे नाकारता येत नाही. व्यापार शुल्काच्या माध्यमातून दोन्ही देशांमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेला तणाव निवळण्यास सुरुवात झाली हे चांगलेच झाले. अर्थात्, भारताने संयमी भूमिका घेत राजकीय परिपक्वतेचे दर्शन घडविल्याने हे शक्य झाले. काहीही असले तरी, अमेरिका आजही जगातील आर्थिक आणि लष्करी महाशक्ती आहे, हे मान्य करावे लागेल. दोन दिवसांपूर्वी शनिवारी व्यापार आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी दिल्लीत पत्रपरिषद घेऊन व्यापार करारातील मुद्यांची माहिती दिली. व्यापार शुल्क ५० वरून १८ टक्के खाली आणल्याने नाही म्हटले तरी भारताला बराच दिलासा मिळणार आहे. आज भारतीय अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डालर्स तर अमेरिकेची तब्बल ३० ट्रिलियन डालर्स एवढी महाकाय आहे. या करारामुळे भारतीय उत्पादकांना अमेरिकेची विशाल बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. भारताची १४० कोटींची विशाल लोकसंख्या ही आज आपली जमेची बाजू ठरत आहे आणि एवढ्या विशाल ग्राहकांच्या बाजारपेठेवर अमेरिकेची नजर असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे दोन्ही देशातील व्यापाऱ्याना परस्पर फायदा करून देणारा हा व्यापार करार आहे. तथापि, भारताने अमेरिकेला रान मोकळे करून दिले, असे मुळीच नाही. खुद्द व्यापार मंत्री गोयल यांनी कृषी आणि दुग्ध क्षेत्रात अमेरिकेला शिरकाव करू दिला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. ग्रामीण भारत हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशावर कितीही संकटे आली तरी आपला शेतकरी आणि छोटा व्यापारी वर्ग संकटकाळात भारतीयांचे पोट भरीत असतो. या करारात मका शेती, कुक्कुटपालन, भाजीपाला, इथेनॉल उत्पादन, तंबाखू क्षेत्रांना संरक्षण देण्यात आले आहे. सोबतच धान्य उत्पादन बाजारातही अमेरिकेचा प्रवेश होणार नाही. ज्वारी, गहू, बाजरी, तांदुळ, मका, राजगीरा, नाचणी या धान्यांना करारात पूर्णपणे संरक्षण देण्यात आले आहे. म्हणजेच कृषी क्षेत्र खुले केल्याचे जे आरोप विरोधक करीत आहेत, त्यात तथ्य नाही. व्यापार करताना आपले नुकसान व्हावे, असे कुणालाही वाटत नसते. काही क्षेत्रांत भारतीय उत्पादनांवर अमेरिका १८ टक्के व्यापार शुल्क आकारणार आहे. त्यात वस्त्रोद्योग, प्लॅस्टिक, रबर, गृहसजावटीच्या वस्तू, हस्तोद्योगाची उत्पादने आणि निवडक यंत्रांचा समावेश आहे. या व्यापार करारामुळे निर्यातीत वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. अशा व्यापारात दोन्ही देशांचा काही फायदा तर काही नुकसान असतेच. पण, व्यापाराची कोंडी फुटली, हे महत्त्वाचे आहे. येत्या पाच वर्षांमध्ये भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डालर्सची उत्पादने आयात करणार आहे. यात ऊर्जा उत्पादने, विमाने, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकम कोलचा समावेश आहे. ऑटो सेक्टरसाठी या करारामुळे दिलासा मिळणार आहे. कारण, भारत दरवर्षी अमेरिकेला ६.५ अब्ज अरब डालर्सचे ऑटो कंपोनंटस् निर्यात करीत असतो. सुखावणारी बाब म्हणजे, भारतीय शेतकरी आणि मासेमारांसाठी अमेरिकेची विशाल बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. भारताला विमानांच्या सुट्या भागांवर कलम २३२ अंतर्गत सवलत मिळेल. विशेष म्हणजे, करारातील कलमे अंतिम नाहीत.

एका देशाने करारातील शुल्कात बदल केल्यास दुसऱ्या देशालाही शुल्कात बदल करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे दोन्ही देशांना व्यापार विकासाची समान संधी मिळणार आहे. शेवटी कोंडी फुटणे आवश्यक असते. ते झाले हे छानच. भारताकडे वाट पाहण्याचा संयम आणि चर्चेला भाग पाडण्यासाठी आवश्यक ती ताकद आहे हेही जगाला दिसले हे अधिक छान झाले!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# तणाव निवळला!

वर्षभरापासून भारत-अमेरिका संबंधात आलेला तणाव अखेर निवळत असल्याचे संकेत आहेत. दोन्ही देशांत व्यापार कराराचा मसुदा तयार झाल्यानंतर हा तणाव कमी होण्याची प्रक्रिया सुरू झाली. भारत आता रशियाकडून कमी तेल आयात करील व त्याबदल्यात अमेरिकेकडून जादा ऊर्जा संसाधनांची आयात केली जाईल असे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केल्यानंतर तणाव कमी झाल्याचे चित्र तयार होत आहे. मात्र हा दावा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केला आहे. भारत सरकारने याबाबत काहीही म्हटलेले नाही. किंबहुना रशियातून तेल आयात केले जाईल असेच संकेत सरकारमधून दिले जात आहेत.

**शीतयुद्धाची स्थिती** : भारत-अमेरिका यांच्यात मागील काही महिन्यांपासून एक प्रकारच्या शीतयुद्धाची स्थिती तयार झाली होती. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प दररोज भारताविरोधात नवनव्या निर्णयांची घोषणा करीत होते. भारताकडून आयात होणाऱ्या वस्तूंवर त्यांनी भरमसाट आयात शुल्क लावले होते. याचा विपरीत परिणाम भारतीय उद्योजकांवर होत होता. दुसरीकडे मात्र याने चीनची चंगळ होत होती. याकाळात भारत-चीन व्यापार सातत्याने वाढत होता. या सर्व बाबी भारताच्या हिताच्या नव्हत्या. मात्र, आता हा तणाव कमी होत असल्याचे दोन्ही देशांनी जाहीर केले आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती व भारताचे पंतप्रधान यांनी समाज माध्यमांवर याची घोषणा केली आहे. या करारानुसार भारतातून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या निर्यातीवरील शुल्क २५ टक्क्यांवरून घटवून १८ टक्के करण्यात आले आहे. मात्र याबदल्यात भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी न करण्याचे आश्वासन दिले असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. भारत आता अमेरिकेकडून कच्चे तेल आयात करणार आहे, असेही ट्रम्प यांनी घोषित केले आहे.

**मुद्दा तेलाचा** : भारत रशियाकडून आयात करीत असलेले कच्चे तेल हा दोन्ही देशांत सुरू झालेल्या शीतयुद्धाचा मुख्य मुद्दा ठरला होता. भारताने ही आयात थांबवावी अशी मागणी ट्रम्प करीत होते तर भारत त्यास फारसा प्रतिसाद देत नव्हता. मात्र, मागील काही महिन्यात अमेरिकेने आर्थिक व्यवहार करणाऱ्या काही संस्थांवर कडक आर्थिक निर्बंध लावल्यानंतर रशियन तेलाची आयात करणाऱ्या भारतीय कंपन्यांना रशियन कंपन्यांशी व्यवहार करणे जवळपास अशक्य झाले होते. यानंतर मग रिलायन्सने एक प्रसिद्धिपत्रक जारी करीत, आमच्याकडे रशियन तेलाची आयात होत नसल्याचे व नजीकच्या काळात ती होण्याची शक्यताही नसल्याचे घोषित केले होते. भारताने रशियाकडून तेल आयातीत घट केल्याचा हा पहिला मोठा संकेत होता. याने राष्ट्रपती ट्रम्प सुखावले होते. आता दोन्ही देशांनी एकप्रकारे त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. भारत रशियाकडून कमी तेल आयात करील तर याउलट अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर तेलाची आयात केली जाईल असे दिसते. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या तेलाच्या विहिरी बळकावल्या आहेत. त्यातून तेल बाहेर काढण्यासाठी अमेरिकन कंपन्या त्या देशाकडे रवाना झाल्या आहेत. आता या तेलाचे काय करावयाचे असा प्रश्न अमेरिकेसमोर होताच. हे तेल आता भारतात येणार आहे.

**तेल हा तर बहाणा** : भारत-अमेरिका संबंधात रशियाकडून आयात केले जाणारे तेल हा एक बहाणा असल्याचे मानले जाते. दोन्ही देशांत कटुता येण्याची खरी कारणे वेगळीच आहेत. मे महिन्यात भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या संघर्षात आपण मध्यस्थी केली. तो संघर्ष मिटविला. पण, भारत सरकार ते मान्य करावयास तयार नाही. उलट याचा इन्कार करून आपल्याला अपमानित करीत आहे, असे राष्ट्रपती ट्रम्प यांना वाटत होते. ट्रम्प यांनी अद्याप आपल्या मध्यस्थीचा दावा सोडलेला नाही. दुसरीकडे पाकिस्तानने मात्र आपल्याला योग्य तो सन्मान दिला अशी त्यांची भावना आहे.

२०२४ च्या २० जानेवारी रोजी ट्रम्प यांचा दुसरा कार्यकाळ सुरू झाला. तेव्हापासूनच दोन्ही देशांच्या संबंधात कटुता येणे सुरू झाले. काही जाणकारांच्या मते ट्रम्प राष्ट्रपती नसताना त्यांच्याबाबत भारताकडून घडलेल्या काही घटना त्यांना फार टोचल्या. त्यात ऑपरेशन सिंदूरची भर पडली. मग, त्यात रशियाकडून आयात केल्या जाणाऱ्या तेलाने जणू तेल ओतले. याने भारत-अमेरिका संबंधात आग भडकली. मात्र, आता या आगीवर पाणी टाकून ती शांत करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मधल्या काळात ट्रम्प प्रशासनाने घेतलेले काही भारतविरोधी निर्णय मागे घेतले जातील असे समजते.

ट्रम्प प्रशासनाने भारतीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत घेतलेले काही निर्णयही लवकरच मागे घेतले जातील असे संकेत आहेत. भारताने रशियाकडून आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलात कपात केल्याने ट्रम्प सुखावले आहेत. त्यांच्या दुखावलेल्या अहंकारावर या निर्णयाने एकप्रकारे मलमपट्टी झाली आहे.

**पाकला धक्का** : भारत-अमेरिका संबंध पूर्ववत् होण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला असल्याचे समजते. अमेरिकेने पाकिस्तानला अतिशय भेदक मारक क्षमता असलेली काही प्रक्षेपणास्त्रे विकण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिका त्यावर फेरविचार तर करणार नाही हा प्रश्न पाकिस्तानी नेतृत्वाला भेडसावीत आहे. मात्र, मुस्लिम जगतात सक्रिय राहण्यासाठी अमेरिकेला आपली गरज आहे याची पाकिस्तानला जाणीव आहे. शिवाय अमेरिकेशी मधुर संबंध असणारे कतार, कुवैत व सौदी अरेबियासारखे देश आपल्या मदतीसाठी धावून येतील याची पाकिस्तानला खात्री आहे. आणि पाकिस्तानचे हे आकलन एकदमच चुकीचे आहे असे मानता येणार नाही. अमेरिका पाकिस्तानला एकदम 'तलाक' देणार नाही. तो फक्त भारताशी आपले संबंध सुधारण्याचा प्रयत्न करील असे काही निरीक्षकांचे मत आहे.

**चीनचे मौन** : चीनने मधल्या काळात एक निवेदन जारी करीत अमेरिका हा भारत-चीन सहकार्यात खोडा घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप लावला होता. तो या साऱ्या घटनाक्रमाकडे शांतपणे पाहत आहे. भारत-अमेरिका संबंध पूर्ववत् झाल्यास ते चीनला आवडणारे नाही. अमेरिका किती प्रमाणात भारताशी आपले संबंध सुधारेल याकडे चीनचे लक्ष राहणार आहे.

**रशियाचेही मौन** : भारताने आपल्याकडून तेल आयातील केलेली घट रशियाला रुचलेली नाही. मात्र, एक परिपक्व देश म्हणून रशियाने यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. भारताने आपल्या या भूमिकेची रशियाला कल्पना दिली असावी असा अंदाज वर्तविला जात आहे. भारताला तेल विकून त्याबदल्यात मिळणारा पैसा युक्रेन युद्धात वापरला जात होता. त्यामुळे याचा परिणाम युक्रेन युद्धावर कितपत होईल याची चर्चा केली जात आहे. येणाऱ्या काळात चीन-रशिया आणखी किती जवळ येतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

भारत रशियाकडून तेलाची आयात घटविणार की पूर्णपणे बंद करणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र या करारात आणखी काही बाबी स्पष्ट झालेल्या नाहीत. त्यासाठी काही काळ जावा लागेल असे सरकारी गोटातून सांगितले जाते. मधल्या काळात भारत आणि रशियात आणखी काही महत्त्वाचे करार झाले आहेत. ट्रम्प त्याबाबत काय भूमिका घेतात याकडेही आंतरराष्ट्रीय जगताचे व भारताचे लक्ष राहणार आहे. जगाचे सत्तासंतुलन स्थिर राहण्यासाठी जगातील दोन मोठ्या लोकशाही देशांमध्ये सलोखा व सहकार्य असावे हे दोन्ही देशांच्या हिताचे होते. दोन्ही देशांनी तो मार्ग निवडला आहे ही निश्चितच एक समाधानाची बाब मानली जाईल.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# संक्रमण काळ आणि ऋतुधर्म

सध्या संक्रमणाचा काळ सुरू आहे. वाऱ्याची दिशा बदलल्याने वातावरणात उष्मा जाणवू लागला आहे. वसंत ऋतूचे आकर्षण तसे सर्वांनाच असते. परंतु, तत्पूर्वी पानगळ येऊन गेल्याने झाडे उघडी बोडकी होऊन जातात. सध्या आमराई बहरून आल्याने वातावरणात मंद मंद सुगंध दरवळत आहे. मकर संक्रांतीपासून संक्रमणाला सुरुवात होते आणि दिवसाचा प्रहर तिळ-तिळ वाढू लागतो. हिवाळ्याच्या काळात रात्री मोठ्या आणि दिवस लहान असतात. परंतु, मकर संक्रातीपासून दिवस हळूहळू वाढू लागतो आणि उन्हाळ्यात ही वाढ आपल्या अंतिम चरणावर पोहोचते. महाशिवरात्रीपासून कोरडे वारे वाहू लागतात आणि मग तापमानात वाढ झाल्याने रात्री सौम्य गारवा जाणवतो, तर दिवसा कडक उन्हाचा अनुभव येतो. पळस पांगारा फुलल्यानंतर होळी व धूळवड साजरी करून या सोहळ्याची विधीवत सांगता होते आणि कडक उन्हाळा सुरू होतो.

सूर्याने धनू राशीतून मकर राशीत प्रवेश केल्याने संक्रमण सुरू झाले आहे. सूर्याभोवती प्रदक्षिणा घालताना पृथ्वीच्या अक्षाचा कल सारखा राहत असला, तरी यामुळे एक गोलार्ध सूर्यासमोर ६ महिने आणि दुसरा ६ महिने सूर्याच्या मागे राहतो. परिणामी, पृथ्वीवरील सूर्यकिरणांचा कोन बदलतो आणि सूर्य ६ महिने उत्तरेकडे आणि ६ महिने दक्षिणेकडे फिरल्याचा आभास देतो. यालाच भौगोलिक भाषेत उत्तरायण आणि दक्षिणायन म्हणतात.

उत्तर गोलार्धात १४-१५ जानेवारीपासून सूर्यास्ताची वेळ हळूहळू पुढे सरकते. त्यानंतर २१ मार्च ही तारीख येते. यावेळी दिवस आणि रात्र अगदी समान असते. या स्थितीला शास्त्रीय भाषेत इक्विनॉक्स असे म्हणतात. सामान्यतः भारतातील बहुतांश सण चंद्राच्या भ्रमणावर विसंबून असतात. त्यामुळेच या सणांच्या तारखा दरवर्षी बदलतात. परिणामी, होळी आणि दिवाळीसारखे सण दरवर्षी वेगवेगळ्या तारखांना येतात. परंतु, मकर संक्रांत हा एकमेव सण आहे जो सूर्याच्या चक्रावर अवलंबून असतो. इंग्रजी दिनदर्शिकादेखील सूर्याच्या याच गतीवर काम करते. त्यामुळेच मकर संक्रांत दरवर्षी १४ किंवा १५ जानेवारीला येते.

भारतात पानगळ प्रामुख्याने शिशिर ऋतूत म्हणजेच हिवाळ्याच्या शेवटी आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला सुरू होते. याच काळात जमिनीतील ओलावा कमी झाल्याने झाडाझुडपांना वाळवी लागते. परंतु, यंदा जानेवारी महिन्यातच झाडांना वाळवी लागल्याने ऋतुधर्मात बदल झाल्याचे स्पष्ट जाणवत आहे. सुकलेल्या मातीचे आच्छादन तयार करून वाळवी झाडात शिरते. यामुळे झाड कमकुवत व मलूल होते अथवा मरून पडते. यंदा वाळवीसाठी पोषक वातावरण लवकरच तयार झाल्याने ही निसर्गाच्या दृष्टीने एकप्रकारे धोक्याची घंटा आहे. यंदा पाऊस अधिक पडूनही जमिनीतील ओलावा झपट्याने कमी होत चालला आहे. रानातील पाणवठे सुकत आहे. अर्थातच जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी झालेली आहे. याच कारणामुळे वन्यप्राणी उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच शेतशिवारांमध्ये दाखल झाल्याच्या बातम्या वाचायला मिळतात.

सध्या पानगळ सुरू झालेली आहे. काही मोठ्या झाडांची पाने गळून खाली पडत आहे. पाण्याचे बाष्पीभवन रोखण्यासाठी आणि कोरड्या हवामानात तग धरण्यासाठी विधात्याने वनराईला बहाल केलेले हे सर्वांत मोठे वरदान होय. अद्याप पानगळ भरात आलेली नाही. मात्र, रानावनात आम्रवृक्ष बहरून आल्याने संपूर्ण वातावरण भारावून गेले आहे. गल्लोगल्ली व खेड्यापाड्यांसह शहरांमधील वातावरणातही आम्रफुलांचा दरवळ उठला आहे. पानगळ जेव्हा आपल्या अंतिम चरणावर पोहोचते तेव्हा मोठमोठ्या वृक्षांच्या खाली पाचोळ्याचे ढीग लागतात. वनराई उघडी बोडकी झाल्याने संपूर्ण रान पारदर्शक झाल्याचा भास होतो. अशातच पळसाच्या अंगाखांद्यावर अग्निफुले डोकावू लागतात आणि मग संपूर्ण रान लालजर्द फुलांनी डवरून येते. रस्त्यांच्या दुतर्फा फुललेला पळस मनाला भुरळ घातल्यावाचून राहात नाही.

होळी सण जवळ आला आहे. हिंदूंच्या इतर सणांसह होळी सणामागेही वैज्ञानिक कारण आहे. हिवाळा संपून उन्हाळा सुरू होताना हवेतील आर्द्रता बदलते. त्यामुळे वातावरणात रोगराई पसरते. या रोगराईवर मात करण्यासाठी होळी पेटविली जाते. या सणामागे धार्मिक मान्यता असल्या तरी वैज्ञानिक कारण मूळ आहे. गोवरी पेटविल्याने वातावरणातील जंतुसंसर्ग नष्ट होतो, हे सिद्ध झाले आहे. त्यामुळेच पूर्वी होळीला शेणापासून तयार केलेल्या चाकोल्यांच्या माळा अर्पण केल्या जायच्या. अलिकडे मात्र शेणाचा वापरच कमी झाला आहे. एकूणच प्राचीन धर्मवेत्त्यांनी सण-उत्सव साजरे करण्यामागे जे मापदंड घालून दिले आहे; त्याचा वापर आधुनिक काळातही होणे जीवसृष्टीच्या कल्याणासाठी नितांत गरजेचे आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा


**अमोल पुसदकर**

# समर्थ रामदास स्वामींचा पत्रसंदेश

ज्या वेळेस भारतामध्ये टपाल खाते अस्तित्वात नव्हते, त्याही वेळेस पत्रव्यवहार अस्तित्वात होता. रामायण, महाभारत काळामध्ये सुद्धा पत्रव्यवहार चालायचा. त्यामध्ये राजकीय पत्रे, कौटुंबिक पत्रे अशी वेगवेगळ्या पद्धतीची पत्रे असायची. समर्थ रामदासांच्या काळातही मोठ्या प्रमाणावर पत्रव्यवहार चालायचा. स्वतः समर्थ रामदास स्वामींनी छत्रपती शिवाजी महाराजांना काही पत्रे पाठविली होती, तसेच संभाजी महाराजांना सुद्धा पाठविली होती. काही पत्रे त्यांनी त्यांच्या शिष्यांना पाठविलेली आहेत, तर काही पत्रे त्यांनी त्यांच्या भावाला, भावाच्या मुलाला सुद्धा पाठवलेली आहेत. त्यांनी ही पत्रे ज्यांना पाठविली, त्या मागची त्यांची भूमिका आणि ज्यांना ती पाठविली गेलेली होती, त्यांची भूमिका, या दोन्ही भूमिकेतून जर आपण पत्रांना वाचले, तर आपल्याला त्यातून खूप मोठा अर्थ, नवे ज्ञान प्राप्त होऊ शकते.

काही दिवसांपूर्वी एका श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनावर पुस्तक लिहिण्याचा संकल्प काही लोकांनी केला. त्यांनी त्यांच्या सामाजिक जीवनाच्या चाळीस वर्षांच्या कालावधीमध्ये कमीत कमी ४००० पत्रे लिहिली असतील. परंतु ज्या वेळेला वेगवेगळ्या लोकांना शोधून ती जमविण्याचा प्रयत्न केला त्यावेळेला त्यातील फक्त तीन-चार पत्रे हाती लागली. समर्थ रामदासांनी सुद्धा शेकडो पत्रे लिहिली असतील, परंतु त्यापैकी केवळ १९ पत्रे आज उपलब्ध आहेत.

समर्थ रामदास स्वामी हे १६४५ ते १६४९ या चार वर्षांच्या कालावधीत शहाजीराजांची जहागिरी असलेल्या चाफळच्या खोऱ्यात होते. या काळामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी छोटे मोठे किल्ले जिंकून आपल्या कार्याचा शुभारंभ केलेला होता. त्यांनी जनतेमध्ये आपले राज्य म्हणजे स्वराज्य असावे, अशा पद्धतीची भावना जागृत करायला सुरुवात केलेली होती. त्यांच्या या आवाहनाला जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत होता. जनता मोगलाईला कंटाळलेली होती. ती आदिलशाही असो, निजामशाही असो की शहाजान असो, या सर्वच हिंदुविरोधी होत्या, अत्याचारी होत्या. परंतु असे असताना सुद्धा मोठ मोठे पराक्रमी हिंदू सरदार हे बादशहाची चाकरी करण्यात धन्यता मानत होते. अशा परिस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांसारखा एक तरुण बादशाही विरोधात शस्त्र उगारतो, स्वराज्याची संकल्पना मांडतो, ही गोष्ट समर्थ रामदास स्वामींना फारच भावलेली होती. त्यामुळे त्यांनी १६४९ मध्ये शिवाजी महाराजांना जे पत्र पाठविले आहे, त्यामध्ये त्यांनी शिवाजी राजांचे वय, यश, स्वराज्य सर्वच लहान असूनही त्यांचा मुक्तकंठाने गौरव केलेला दिसून येतो. ते म्हणतात,



**निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू ।**
**अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।**

शिवरायांच्या कार्याचा नुकताच शुभारंभ झालेला होता. शहाजीराजांनी सुद्धा अशाच पद्धतीचा एक स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न शिवरायांचा जन्म झाला त्यावेळेस करून पाहिलेला होता, परंतु तो यशस्वी होऊ शकला नव्हता. त्यानंतर ते पुन्हा आदिलशाहीकडे नोकरीकरिता गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला निश्चय हा शेवटपर्यंत अटळ राहिला पाहिजे, यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कदाचित समर्थांनी 'निश्चयाचा महामेरू' असे त्यांना संबोधले असू शकते. त्यांना 'श्रीमंत योगी' या विशेषणांनी सुद्धा समर्थांनी गौरविलेच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे कार्य आरंभिलेले होते, ते कार्य गोरगरीब जनतेसाठीच होते. त्यामुळे समर्थ म्हणतात,

**परोपकाराचीया राशी । उदंड घडती जयासी ।**
**तयाच्या गुण महत्त्वासी । तुळणा कैची।**

जे शिवराय असे सर्वसामान्य जनतेसाठी झटत आहेत, त्यांच्या गुणांची तुलना काय करावी, असे समर्थ म्हणतात. त्या काळची परिस्थिती कशी होती हे सांगताना समर्थ म्हणतात-

**तीर्थक्षेत्रे ते मोडली । ब्राह्मणे स्थान भ्रष्ट जाली ।**
**सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।**

समर्थांनी सर्वत्र भ्रमण केलेले होते. ठिकठिकाणी मुघलांच्याद्वारे चाललेले जनतेवरील अत्याचार ते पाहत होते. हिंदूंना आपल्या धर्माप्रमाणे वागण्यास मुभा राहिलेली नव्हती. गंगेमध्ये स्नान करण्याचा सुद्धा कर द्यावा लागत होता. अशा परिस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज उभे राहिले. त्यांच्याबद्दल समर्थ म्हणतात,

**देव धर्म गो ब्राह्मण । करावया संरक्षण ।**
**हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।**

देव, धर्म, गोमाता, समाजातील सज्जनशक्ती यांचे संरक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष ईश्वराने आपल्या अंत:करणात निवास केलेला असून, त्यानेच आपल्याला हे कार्य हाती घेण्याची प्रेरणा दिलेली आहे.

समर्थ रामदास स्वामी हे ईश्वर साक्षात्कारी संत होते. जर, ते म्हणत आहेत की प्रत्यक्ष ईश्वरानी शिवरायांच्या हृदयामध्ये निवास केलेला असून, त्याच्याच प्रेरणेमुळे हे कार्य सुरू आहे, यावरून आपण त्याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. छत्रपती शिवराय सुद्धा नेहमी म्हणायचे, हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे. मी जे कार्य करतो आहे, हे ईश्वरीकार्य आहे, असा भाव जर मनामध्ये निर्माण झाला, तर ते कार्य करीत असताना येणाऱ्या संकटांची अजिबात पर्वा, भीती राहत नाही. कदाचित याचमुळे छत्रपती शिवाजी महाराज हे मोठमोठ्या बादशहांशी टक्कर घेण्यासाठी उद्युक्त होऊ शकले. म्हणूनच महाराजांचा गौरव करताना समर्थ म्हणतात-

**यशवंत कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतीवंत । जाणता राजा ।**

अशा या जाणत्या राजाला समर्थ म्हणतात-

**धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळीली पाहिजे ।**

कारण समर्थांना माहिती आहे की प्रसंग मोठा बाका आहे. राजांच्या जीवावरचे संकट आहे. घरभेदी शत्रूला जाऊन मिळालेले आहे. अशा परिस्थितीत कार्य करणे हे काही सोपे काम नाही. यश मिळविणे सोपे आहे, परंतु यश टिकविणे कठीण आहे. कीर्ती मिळविणे सोपे आहे, परंतु कीर्ती टिकविणे कठीण आहे. मोठमोठे लोक ज्यामध्ये अपयशी ठरतात, त्यामध्ये राजांना यश मिळावे, यासाठीच हा उपदेश समर्थांनी केलेला आहे.

सरते शेवटी ते म्हणतात-

**तुमचे देसी वास्तव्य केले । परंतु वर्तमान नाही घेतले ।**
**ऋणानुबंधे विस्मरण जाले । काय नेणू ।**

समर्थांना राजांच्या भेटीची उत्कंठा होती. त्यामुळे ते म्हणतात की, आम्ही तुमच्या प्रदेशात राहत होतो, तरीही आपली भेट झाली नाही. यामागे आपली भेट व्हावी हा त्यांचा महाराजांना संदेश होता. त्यामुळेच पुढे ही भेट झाली. परंतु कर्त्या पुरुषाच्या मागे अनेक कामे असतात, तशी राजांच्याही मागे अनेक कामे आहेत, हे समर्थ जाणून होते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### प्रत्येक घरात हवी आजी-आजोबांची माया

कधीकाळी घराच्या अंगणात आजीची हाक आणि आजोबांचा शांत, समजूतदार आवाज एकत्र निनादायचा. त्या आवाजात माया होती, आपुलकी आणि संपूर्ण कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी ताकद होती. आज मात्र, त्या हाकांचा प्रतिध्वनी फक्त आठवणींतच उरला आहे. आजी-आजोबांचे प्रेम आणि संयुक्त कुटुंबाची संस्कृती काळाच्या ओघात हळूहळू लोप पावत आहे. ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे.

आजी म्हणजे मायेचा अखंड झरा. तिच्या हातच्या जेवणात प्रेम मिसळलेले असायचे. कपाळावरून फिरवलेला हात आणि काय रे, आज थकलास का? हे दोन शब्द आयुष्यभर पुरेल इतका आधार देऊन जायचे. आजोबा म्हणजे अनुभवांचा ग्रंथ. त्यांच्या बोलण्यातून जीवनाचे धडे मिळायचे. कोणताही उपदेश न करता, फक्त उदाहरणातून चूक झाली तर डोळ्यांत राग नाही तर, काळजी असायची. एकत्र जेवण, एकत्र सण, एकत्र दुःख आणि एकत्र आनंद यामुळे घराला खरे



'घरपण' लाभायचे. आजी-आजोबांच्या सहवासात संस्कार नकळत रुजायचे. त्यांनी नातवंडांना माणूस म्हणून घडवले. मात्र, आज बदलत्या काळात चित्र वेगळे दिसते. आज सर्वांच्या हातात मोबाईल आहे. पण, घरात एकमेकांच्या हातात हात नाहीत. संवादासाठी निर्माण झालेले साधन आज संवादच हिरावून घेत आहे. एकाच छताखाली राहूनही मनामनांमध्ये अंतर वाढत चालले आहे. मोबाईलच्या स्क्रीनवर हसू आहे. पण, समोर बसलेल्या माणसासाठी शब्द नाहीत. आजी-आजोबा समोर बसलेले असतात. पण, डोळे मात्र मोबाईलमध्ये गुंतलेले असतात. आज घर गजबजलेले असते. तरी, नात्यांमध्ये एक अनाम शांतता दाटलेली असते. 'ऑनलाईन' जगात गुंतताना 'ऑफलाईन' नाती अबोल होत चालली आहेत. एकत्र जेवणाच्या टेबलावर चमचे वाजतात. पण, संवादाचा आवाज हरवतो आहे. मोबाईलमध्ये कैद झालेले क्षण वाढत आहेत आणि आजी-आजोबांसोबतच्या आठवणी मात्र कमी होत आहेत. आज अनेक आजी-आजोबा आपले मूल आणि नातवंडांच्या वाटेकडे डोळे लावून बसलेले दिसतात. त्यांच्या थरथरत्या हातांना आधार हवा असतो. पण, तो हात मोबाईल पकडण्यात व्यस्त असतो. कधीकाळी हास्याने भरलेले घर आज शांततेत बुडालेले दिसते आणि त्या शांततेत दडलेले एकाकीपण त्यांच्या डोळ्यांतून ओघळताना दिसते. संयुक्त कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नव्हती तर, ती संस्कारांची शाळा होती. आजी-आजोबांचे प्रेम हे निखळ, अपेक्षारहित आणि आयुष्याला दिशा देणारे असते. अजूनही वेळ गेलेली नाही. एक क्षण थांबूया. मोबाईल बाजूला ठेवूया. आजी-आजोबांच्या जवळ जाऊन बसूया. त्यांच्या आठवणी ऐकूया. त्यांच्या थरथरत्या हातात आपला हात देऊया. कारण, उद्या कदाचित मोबाईलमध्ये साठवलेल्या फोटोशिवाय काहीच उरणार नाही.

**संगीता चव्हाण**/८८३०७७३२४२

### पर्यटनस्थळ कचरामुक्त होणे आवश्यक

देव जरी मज कधी भेटला... खरंच देव जर मला खरंच भेटला ना तर मी त्याला म्हणेन की देवा माझ्या भारताला कचऱ्याने जो विळखा घातलाय तो विळखा सुटेल असं काहीतरी कर. कारण मला समजतच नाही की अशी कशी मानसिकता आहे घेतला कचरा की टाक रस्त्यावर? हेच लोक भरपूर पैसे खर्च करून घराचं डेकोरेशन करतात, मग ज्या देशात आपण राहतो, ज्या रस्त्यावरून आपण चालतो त्याबाबत एवढी उदासीनता का? मी आजवर भरपूर प्रवास केलाय. नुकतेच सुप्रसिद्ध बस्तर जिल्ह्यातील चित्रकोट्या धबधबा पाहायला गेलो. अतिशय सुंदर आहे हा धबधबा. सुंदर शंकराचं मंदिर आहे, पण धबधब्यापर्यंत अगणित प्लास्टिकच्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये अन्न भरून बेमुर्वतपणे भिरकावलेल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी श्रीसप्तशृंगी देवीला जाण्याचा योग आला. एका सेल्फी पॉईंटवर थांबलो. तिथे पाण्याच्या बाटल्या हवेमुळे इतस्ततः भिरभिरत होत्या. थोड्यावेळात एक दुकानदार आला आणि त्याने दुकानात साठलेला कचरा दरीच्या काठावर टाकला. ट्रेनने प्रवास करताना स्टेशनजवळ आल्याची खूण म्हणजे कचरा दिसायला लागतो. काय उपाय असू शकेल यावर, जेणेकरून भारतातील पर्यटनस्थळे कचरामुक्त होऊन सुंदर दिसतील. मला असं वाटतं की जिथं कुठं पर्यटकांना प्रवेश दिला जातो तिथे चेकपोस्ट असावे, तिथे बघावं किती प्लास्टिक बरोबर नेताहेत. त्यानुसार शुल्क आकारावं आणि परत जाताना जेवढं नेलं होतं तेवढं आणलंय की नाही त्यानुसार पैसे परत करावे. शाळांशाळांतून मुलांना याबाबत धडे देणं आवश्यक आहे. जेणेकरून पुढे काहीतरी सुधारणा दिसू शकेल. भावी पिढी जबाबदार नागरिक म्हणून तयार होतील.

**मेधा सोहोनी**/७७२२०४३९८७



## भागवत शिंदे भारत श्री मास्टर्स स्पर्धेत देशात पाचवे

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

तेलंगणा राज्यातील करीमनगर येथे झालेल्या ज्युनिअर, मास्टर्स भारत श्री बॉडी बिल्डिंग स्पर्धेत भागवत शिंदे हे भारत श्री मास्टर्स स्पर्धेत देशात पाचवे आले. सोलापूर पोलीस दलात कार्यरत असणारे भागवत शिंदे यांनी ४० किलोवरील गटात त्यांनी महाराष्ट्रकडून प्रतिनिधित्व करताना ही कामगिरी केली. पोलिस खात्यातील आपले कर्तव्य सांभाळत मेहनत करून त्यांनी हे यश प्राप्त केले.





**सोलापूर : इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सामनावीर पुरस्कार देताना चंद्रकांत रेम्बर्सु व संजय नवले. यावेळी डॉ.अतुल लकडे, दत्तात्रय बिराजदार, दत्तात्रय नवले, उमराव मेटकरी, सोमनाथ सोनकांबळे आदी.**

# शिवाजी विद्यापीठ, सावित्रीबाई फुले विद्यापीठ भिडणार विजेतेपदासाठी

### ✔ आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

आंतर विद्यापीठा कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे हे विजेतेपदासाठी भिडतील.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठ शिक्षक व कर्मचारीवृंद यांच्यासाठी क्रिकेट स्पर्धा येथे सुरू असून सहाव्या दिवशी उपांत्य फेरीचे सामने झाले. येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सकाळच्या सामन्यात नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघाचा कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने २ गड्यांनी पराभव केला. दुपारच्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मराठवाडा विद्यापीठावर २१ धावांनी विजय मिळवत सलग तिसऱ्या वर्षी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य सामन्याचे वैशिष्ट्य म्हणजे अंतिम षटकापर्यंत सामना रंगला होता व त्यात शिवाजी विद्यापीठाने १ चेंडू व २ गडी राखून विजय मिळवला. कोल्हापूरच्या अनिल पाटील व नितीन प्रसाद यांनी सामनावीर पुरस्कार पटकाविला. सोमवारी सकाळी तिसऱ्या स्थानाचा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक विरुद्ध डॉ. असा सामना होणार आहे. सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले व विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

**संक्षिप्त धावफलक : १) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक :** १५७/७ (२०) नंदकिशोर ठाकरे ५४, पुष्कर तऱ्हाळ ५५ , पवन गोलवाल १७, अनिल पाटील ११/३, हरी मस्के ९/२, शशिकांत दाभाडे, राजेश्वर मुपडे प्रत्येकी १ बळी **पराभूत विरुद्ध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर :** १५८/८ (१९.५) विक्रम कोंढावळे ५०, विशाल हिळगे ४३, योगेश दळवी २१, विनायक शिंदे १२ धावा, पुष्कर तऱ्हाळ २१/३, योगेश राऊत ४०/३, महेंद्रनाथ चौधरी २८/२ बळी.

२) **सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे :** १५१/५ (२०) नितीन प्रसाद ७०, मनीष गायकवाड ४८, अवांतर ११ धावा, रवी पारधी ३३/३, तनवीर सय्यद २१/२ बळी **विजयी विरुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :** सर्वबाद १३० (२०) बलभीम मारकड २४, कार्तिक चव्हाण ३१, रोहित सलामपुरे २०, सचिन सुर्वे २९/३, विनोद नरके ८/२, मनीष गायकवाड बसवंत गजलवार संतोष सुगावे अक्षय वाल्मिकी प्रत्येकी १ बळी.



# आर्टिस शिलेदार संघास विजेतेपद

## इंडस्ट्रीज असोसिएशनची एसआयपीएल क्रिकेट स्पर्धा

## काकडे इलेक्ट्रिकल्स संघास उपविजेतेपद

### बक्षिसाची रक्कम ५१ हजार धर्मराज मंदिरास दान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

आर्टिस शिलेदार संघाने काकडे इलेक्ट्रिकल्स संघाचा पराभव करीत सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या एसआयपीएल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनतर्फे झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा चिंचोळी एमआयडीसी येथील श्री धर्मराज मंदिर मैदानावर असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा स्पर्धा समिती अध्यक्ष गणेश सुत्रावे, सहसचिव अभिषेक तापडिया, सहसचिव शिवशंकर आंधळकर व कार्यकारी सदस्य कमलेश शहा यांच्या हस्ते झाला. विजेत्या व उपविजेत्या संघास २५ व १५ हजार रुपये व करंडक देण्यात आले. सेमीफायनलिस्ट फायर ब्रिगेड चिंचोळी एमआयडीसी व बालाजी टायटन्स या संघाना ५ हजार पाचशे रुपये करंडक देण्यात आले. फेअर प्ले टीमचा मानकरी बंग सुपर किंग्ज ठरला. उल्लेखनीय बाब म्हणजे सर्व विजेत्या संघांनी बक्षीसाची जिंकलेली एकूण ५१ हजार रुपयांची रक्कम श्री धर्मराज मंदिरास दान स्वरूपात अर्पण केली.

या स्पर्धेसाठी लाभलेले प्रमुख प्रायोजक बालाजी अमाईन्स लिमिटेड, प्रिसिजन कॅम शाफ्ट लिमिटेड, प्रभू रॉकशेप मशिनरी तसेच सहप्रायोजक लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रा. लि., कोयना शिलाई मशीन, स्मृती ऑर्गानिक्स, कृष्णा फॅब्रिकेशन यांचे असोसिएशनतर्फे आभार व्यक्त करण्यात आले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून मनीष काळे, अनिल गायकवाड तसेच समालोचक म्हणून वीरभद्र कोळी यांनी काम पहिले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक शुद्धोधन गायकवाड, क्लार्क सुरेश हिटनळी, धर्मराज मंदिर समिती यांचे सहकार्य लाभले.

**वैयक्तिक पुरस्काराचे मानकरी (तीन, दोन हजार रुपये व करंडक) :**

मालिकावीर : गणेश भोसले (काकडे इलेक्ट्रिकल्स), गोलंदाज : विश्वजित भोसले (बालाजी टायटन्स). फलंदाज : गणेश भोसले (काकडे इलेक्ट्रिकल्स), यष्टीरक्षक : नाना चव्हाण (फायर ब्रिगेड चिंचोळी), क्षेत्ररक्षक : प्रवीण वालीकर (एलएचपियन्स).

# मंदिर प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या संघाचा सहभाग

### कोल्हापूर येथे रंगणार स्पर्धा, सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते क्रीडा साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ फेब्रुवारी -**

मंदिर प्रीमिअर लीग टेनिस बॉल (दिवस/रात्र) क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. १४ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत शास्त्री नगर मैदान, कोल्हापूर येथे करण्यात आले आहे. सदर स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वात एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला असून, यामध्ये यंदा प्रथमच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथील आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी व पुजारी यांचा संघ सहभागी होत असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या संघाचा स्वेरी कॉलेजच्या मैदानावर नियमित सराव सुरू असून, या संघातील खेळाडूंना मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते जर्सी (टी-शर्ट), बूट व इतर क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी पारंपरिक धोतर व नेहरू शर्ट परिधान करून मैदानावर उतरून बॉलिंग व फलंदाजी करत खेळाडूंना प्रोत्साहन दिले. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित खेळाडू व क्रीडाप्रेमींमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मंदिर प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेला क्रीडाप्रेमींकडून मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विविध धार्मिक व सामाजिक संस्थांचे संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. यामध्ये श्री क्षेत्र जोतिबा, श्री क्षेत्र नृसिंहवाडी, श्री क्षेत्र अंबाबाई (महालक्ष्मी), ओढ्यावरील गणपती (प. म. दे. स.), परशुराम सोशल फाऊंडेशन, श्री क्षेत्र तुळजापूर, श्री क्षेत्र पंढरपूर, श्री क्षेत्र माहूरगड, श्री क्षेत्र गहिनीनाथ (औसा), श्री क्षेत्र शिर्डी तसेच श्री महालक्ष्मी (सारसबाग, पुणे) आदी संघांचा समावेश आहे. मंदिर प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट समितीने स्पर्धेसाठी निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार एका संघामध्ये जास्तीत जास्त १४ खेळाडू असणे बंधनकारक असून, परगावातून येणाऱ्या संघांच्या खेळाडूंसाठी राहण्याची व्यवस्था स्पर्धा समितीतर्फे करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक संघाने सामना सुरू होण्यापूर्वी किमान ४० मिनिटे आधी मैदानावर उपस्थित राहणे बंधनकारक राहील, असे नियम व अटी घालण्यात आले आहेत.



**पंढरपूर : स्वेरी कॉलेजच्या मैदानावर मंदिर प्रीमिअर लीगसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंना टी-शर्ट व क्रीडा साहित्याचे वाटप करताना सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, स्वेरी कॉलेजचे सचिव डॉ. सुरज रोंगे, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार आदी.**

### विजेतेपद मिळवतील

मंदिर प्रीमिअर लीगमध्ये यंदा प्रथमच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे पुजारी, अधिकारी व कर्मचारी सहभागी होत आहेत. विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या लौकिकाप्रमाणेच आमचे खेळाडू उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून स्पर्धेत विजेतेपद मिळवतील, अशी मी पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करतो.

**- गहिनीनाथ महाराज औसेकर, सह-अध्यक्ष, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**



# जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अनुशासन गरजेचे

### पोलिस उपनिरीक्षक पवार यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनत, शिस्त व निरोगी आरोग्याचे संस्कार विद्यार्थ्यांमधे निर्माण करणे गरजेचे आहे, असे मत विजापूर पोलीस चौकीचे उपनिरीक्षक मोहन पवार यांनी सुयश गुरुकुल येथे सैनिकी प्रशिक्षणात व्यक्त केले.

या शिबिरात विद्यार्थांसाठी सैनिकी प्रशिक्षणसोबत हॉर्स रायडिंग, रायफल शुटिंग, स्कायलाईन वॉक, रोप मलखांब, आपत्ती व्यवस्थापन या ट्रेनिंगसोबतच पपेट शो, शस्त्रात्र प्रदर्शन, देशभक्तीपर कीर्तन,जादूचे प्रयोग, तज्ञांची व्याख्याने, विंग कमांडर वैष्णवी टोकेकर यांचे मार्गदर्शन, हिप्नॉटिझम, पपेट शो, आदी कार्यक्रम झाले. अध्यक्षीय समारोप संस्थापक केशव शिंदे यांनी केला. शिबिर यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका विद्याताई शिंदे, विभाग प्रमुख सिद्धेश्वर लुबाळ, सुरेश मठ, श्रद्धा लकडे, दीपा शिंदे, मार्तंड कुलकर्णी, खांडेकर, गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.


## समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर-४१३००७. फोन : २७४४२१३/१४
ई-मेल आयडी - recovery@samarthbank.com ; मो. ९८८१४६७६८४

### ताबा नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 चे सेक्शन 13(12) आणि रूल 9 अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून काटकर राहुल देवानंद व काटकर नितीन सुभाष व इतर यांना दि.23.07.2025 रोजी सेक्शन 13(2) अन्वये मागणी नोटीस बजावून त्यांना सदर नोटिसीतील नमूद केलेली बँकेला येणे असलेली दिनांक 30.06.2025 अखेरची रक्कम अधिक त्यावरील पुढील व्याज व इतर खर्च अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून नोटीसीच्या 60 दिवसांच्या आत परत करावी असे कळविण्यात आले होते. कर्जदार काटकर राहुल देवानंद आणि काटकर नितीन सुभाष तसेच जामीनदार क्र.1 काटकर देवानंद नागनाथ व जामीनदार क्र.2 काटकर उमेश वासुदेव हे सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की खाली सही करणार सदर कायद्याच्या सेक्शन 13(4) आणि रूल 9 अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा दि. 05/02/2026 रोजी प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. विशेष: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर स्थावर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर यांना दि.30.06.2025 अखेर येणे असलेली रक्कम रु. 3,09,30,864.00(अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी नऊ लाख तीस हजार आठशे चौंसष्ट फक्त)टर्म कर्ज खाते क्रमांक 00200612800001281 यांच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सेक्शन 13(8) अंतर्गत तरतुदीकडे वेधून घेतले जात आहे.

तारण मालमत्तेचा तपशील : डि. व सब डि. जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मिळकत सिटी सर्व्हे नं. 8501/2/9 यांचे क्षेत्र 990.80 चौ.मी. त्यापैकी 442 चौ.मी. पश्चिमेकडील खुली जागा यांसह चतुर्सीमा : पूर्वेस : सि. स. नं. 8501/2/9 चे बांधकाम केलेले क्षेत्र दक्षिणेस : सि. स. नं. 8501/2/10 ; पश्चिमेस : मुख्य रस्ता; उत्तरेस : छोटा रस्ता
(ही मिळकत कर्जदार राहुल देवानंद काटकर व नितीन सुभाष काटकर यांच्या मालकीची आहे)

नंदकुमार बाबुराव लोंढे
अधिकृत अधिकारी
समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर

Jhaveri



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर महानगरपालिका हद्दीतील लोकांना कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन डि।। व सब डि।। सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील रेल्वे लाईन्स येथील सि.स.नं. ८३९१/१५ यांसी सब प्लॉट नं. ३ पैकी यामधील बांधकाम झालेली इमारत विद्या विहार अपार्टमेंट या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील इमारत ए मधील तिसऱ्या मजल्यावरील (१) फ्लॅट नं. ए-१०अ यांसी क्षेत्र ३८.४४ चौ.मी. (२) फ्लॅट नं. ए-१०ब यांसी क्षेत्र ३८.४४ चौ.मी. असे एकूण ७६.८८ चौ.मी. यांसी एकत्रीत चतुःसिमा :- पुर्वेस - सि.स.नं. ८३९१/१५/२, दक्षिणेस - फ्लॅट नं. ए-११, पश्चिमेस - फ्लॅट नं.९, उत्तरेस - चिकू गोडावून येणेप्रमाणे चतुःसिमेतील फ्लॅट तसेच इमारतीतील सामाईक क्षेत्रातील वहिवाटीचा हक्क व सर्व अधिकारासह तसेच सदनिकेसाठी असणारे अविभक्त (प्रपोशनेट) हक्कासह.

वर नमुद वर्णन केलेला फ्लॅट या (१) श्रीमती वनिता संजय अहुजा (२) श्री. तनष संजय अहुजा यांचे मालकी वहिवाटीच्या असून त्यांनी त्यांचे प्रापंचिक अडीअडचणीकरिता सदरचा फ्लॅट विक्रीस काढला याची माहिती आमचे अशिलांना झालेनंतर आमचे अशिलांनी मिळकतीचे मालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन खरेदी-विक्रीच्या अनुषंगाने बोलणी करुन व्यवहार पक्का केलेला असून वर नमुद मिळकतीची इसारापावती/साठेखत अशिलांचे हक्कात मुळ मालकांनी केलेले आहे. तसेच मिळकतीचा कब्जा खरेदीखतावेळी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. तसेच मिळकतीचे मालकानी सदरचा फ्लॅट निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे. म्हणून अशिलांनी सदरचा फ्लॅट खरेदी करण्याचे निश्चीत केलेले आहे.

वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, गहाण, दान, बोजा, जप्ती, पोटगी, वहिवाट, लिज अथवा तत्सम हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ८ दिवसांच्या आतमध्ये लेखी कागदपत्रासह खालील पत्यावरती खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता.०८/०२/२०२६

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. अविराज वि. पाटील**
**बी.ए., एलएल.बी.,**
**लॉयर्स चेंबर्स, चेंबर नं. ३०,**
**जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर**
**मो.नं. ८००७३१०३२६**



## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., रजि. ऑफिस - माळीनगर, जि. सोलापूर

### गळीत हंगाम बंदची नोटीस

आपले कारखान्याचा सन २०२५-२६ चा गळीत हंगाम फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्याच्या दरम्यान अगर त्यासुमारास संपणार आहे. कंपनीचे भागधारक, करारदार ऊस उत्पादक यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सिझन २०२५-२६ चे हंगामासाठी ज्या शेतकऱ्यांनी आमच्या कंपनीशी ऊस पुरविण्याचा करार करुन दिला आहे व कंपनीकडे गाळपासाठी ऊस पिकाची नोंद केलेली आहे. त्याचप्रमाणे सरकारच्या आदेशाप्रमाणे ज्यांना ऊस कंपनीस देण्याचे आदेश आहेत. असे शेतकरी व ज्यांनी अद्याप ऊस गळीतास पाठविला नाही, त्यांनी त्वरीत कंपनीच्या शेती विभागाशी संपर्क साधून आपल्या ऊसाची आपण स्वतः तोड करुन वाहतुकीची व्यवस्था करुन आपला ऊस फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात किंवा त्यापुर्वी कंपनीकडे (कारखान्याकडे) गळीतास आणून पोहोच करावा.

वरील सर्व ऊस उत्पादकांचा सन २०२५-२६ या गळीत हंगामातील गळीताचा ऊस त्यांचे शेतात गळीत न होता राहिल्यास होणाऱ्या नुकसानीस कंपनी (कारखाना) जबाबदार राहणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी व त्यांना नुकसान मागण्याचा हक्क राहणार नाही. सबब ज्यांचा ऊस गळीतास गेला नाही त्यांनी सदर ऊस पुरवावा व होणारे नुकसान टाळावे ही विनंती. याची नोंद घ्यावी.

**स्थळ : माळीनगर**
**तारीख : ०८/०२/२०२६**

**सही /-**
**गणेश ज्ञानदेवराव इनामके**
**मॅनेजिंग डायरेक्टर**
**दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., करीता**

टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### उत्तराखंड पहिल्यांदाच रणजी करंडकाच्या उपांत्य फेरीत

**जमशेदपूर** : डावखुरा फिरकीपटू मयंक मिश्राच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर उत्तराखंडने तिसऱ्या दिवशी झारखंडवर एक डाव व ६ धावांनी विजय नोंदवून पहिल्यांदाच प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली.



सामनावीर ठरलेल्या मयंकने पहिल्या डावांत ३० धावांत ३ बळी व २२ धावांत ५ बळी टिपले. झारखंडला पहिल्या डावांत २३५ धावांत गुंडाळल्यानंतर उत्तराखंडने ३७१ धावा ठोकून पहिल्या डावात १३६ धावांची आघाडी मिळविली. त्यानंतर उत्तराखंडने झारखंडचा दुसरा डाव ४१.१ षटकांत १३० धावांत गुंडाळला.

### भाम्बरी-दक्षिणेश्वरमुळे भारताला २-१ ने आघाडी



**बंगळुरू** : युकी भाम्बरी व दक्षिणेश्वर सुरेशने पुरुष दुहेरीच्या सामन्यात डेव्हिड पेल आणि सॅण्डर अरेन्ड्स यांचा ७-६ (०), ३-६, ७-६ (१) असा पराभव करून, येथे रविवारी नेदरलॅण्डविरुद्धच्या डेव्हिस चषक पात्रता फेरीच्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. नेमक्या तीन तास चाललेल्या आणि वारंवार रंग बदलणाऱ्या या सामन्यात, भारताचा कर्णधार रोहित राजपालने महत्त्वाच्या दुहेरीच्या सामन्यासाठी एन. श्रीराम बालाजीच्या जागी दक्षिणेश्वरला संघात घेण्याचा घेतलेला निर्णय निर्णायक ठरला, कारण भारतीय जोडीने सर्वात महत्त्वाच्या क्षणी आपला संयम राखला. शनिवारी १-१ अशी बरोबरी झाल्यानंतर दोन्ही संघ सामना आपल्या ताब्यात घेण्यासाठी उत्सुक होते, त्यामुळे पहिला सेट संयम आणि निश्चयाची एक कठीण परीक्षा ठरला. भाम्बरी सर्व्हिसवर सतत दबाव होता. दक्षिणेश्वरने गेम पॉइंटवर एक सोपा बॅकहँड व्हॉली चुकवला. एकदा भारतीय जोडी बचावण्यात यशस्वी झाली, दक्षिनेश्वरने नेटजवळ कौशल्याने खेळ दाखवला आणि अखेरीस अरेन्ड्सने लांब रिटर्न मारून चूक केली, त्यामुळे तो प्रदीर्घ गेम संपला.

### राहुलचे नाबाद अर्धशतक, कर्नाटकला आघाडी

**मुंबई** : भारतीय फलंदाज के. एल. राहुलने एक शानदार अर्धशतक झळकावून रविवारी येथे रणजी करंडक उपांत्यपूर्व फेरीच्या तिसऱ्या दिवस अकेर कर्नाटकला मुंबईवर किंचित आघाडी मिळवून दिली. ३२५ धावांचा पाठलाग करताना, राहुल ९४ चेंडूंमध्ये सात चौकारांच्या मदतीने ६० धावांवर नाबाद होता आणि त्याने कर्णधार देवदत्त पडिक्कल (३९) सोबत दुसऱ्या गड्यासाठी ८४ धावांची भागीदारी करून कर्नाटकला २९ षटकांत दोन गडी बाद ११३ धावांपर्यंत पोहोचवले. विजयासाठी त्यांना आणखी २१२ धावांची गरज आहे. खेळ थांबला तेव्हा करुण नायर (९ धावांवर नाबाद) राहुलसोबत खेळपट्टीवर होता.

### घरामीच्या नाबाद द्विशतकामुळे बंगालची स्थिती मजबूत

**कल्याणी** : सुदीप कुमार घरामीने आपल्या कारकिर्दीतील पहिले द्विशतक झळकावत बंगालने आंध्र प्रदेशवरील आपली पकड अधिक घट्ट केली आणि रणजी करंडक उपांत्यपूर्व फेरीच्या तिसऱ्या दिवस अखेर पहिल्या डावात १२३ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. घरामीने आपल्या नाबाद २१६ धावांच्या खेळीत ४५१ चेंडूंचा सामना करत कमालीचा संयम दाखवला आणि आंध्रच्या २९५ धावांच्या प्रत्युत्तरात बंगालला ६ बाद ४१८ धावांपर्यंत पोहोचवले.

### मुंबईच्या खेळपट्टीचे आश्चर्य वाटले : अक्षर पटेल

**मुंबई** : मुंबईतील खेळपट्ट्या साधारणपणे सपाट असतात व त्यावर नेहमीच जास्त धावा होतात, परंतु वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेविरुद्धच्या टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यातील खेळपट्टीच्या स्वरूपामुळे आम्हाला आश्चर्य वाटले, असे भारतीय संघाचा उपकर्णधार अक्षर पटेल म्हणाला. कठीण खेळपट्टीवर फलंदाजी कोसळली असूनही, संघ एक स्पर्धात्मक धावसंख्या उभारण्यास आत्मविश्वासाने खेळत होता, असे अक्षर म्हणाला.

# इंग्लंडचा नेपाळवर रोमहर्षक विजय

**मुंबई, ८ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी वानखेडे स्टेडियमवर अखेरच्या षटकापर्यंत रंगलेल्या चित्तथरारक सलामीच्या साखळी सामन्यात इंग्लंडने नेपाळचे उधळून लावले आणि ४ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला.

नेपाळचा संघ आपल्या क्रीडा इतिहासातील सर्वात मोठा विजय मिळवण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता, मात्र इंग्लंडविरुद्ध १८५ धावांचा पाठलाग करताना त्यांना निराशाजनक पराभवाला सामोरे जावे लागले. लोकेश बामच्या अखेरच्या षटकातील आक्रमक फलंदाजीनंतर त्यांना शेवटच्या नऊ चेंडूंमध्ये १३ धावांची गरज होती, परंतु सॅम करनच्या संयमी, पाच धावांच्या शेवटच्या षटकामुळे इंग्लंडने सुटकेचा निःश्वास सोडला आणि टी-२० विश्वचषकात विजयी सुरुवात केली. इंग्लंडच्या ७ बाद १८४ धावांच्या प्रत्युत्तरात नेपाळला २० षटकांत ६ बाद १८० धावांपर्यंतच मजल मारता आली. १८ चेंडूंत नाबाद ३९ धावांची खेळी व १७ धावांच्या मोबदल्यात एक बळी टिपणारा अष्टपैलू विल जॅक्स सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.



अखेरच्या षटकांत नेपाळला रोखणारा सॅम करन

इंग्लंडने नाणेफेक जिंकून नेपाळविरुद्ध प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यांना अपेक्षेनुसार फलंदाजी करता आली नाही. सलामीवीर फिल सॉल्ट (१), जोस बटलर (२६) व टॉम बॅण्टनसारखे महत्त्वाचे खेळाडू लवकरच बाद झालेत, त्यावेळी इंग्लंडची ६.१ षटकांत ३ बाद ५७ अशी झाली होती, परंतु त्यानंतर जेकब बेथेल व कर्णधार हॅरी ब्रुकने नेपाळच्या गोलंदाजांचा संयमाने सामना करत डाव सावरला. जेकब व ब्रुकने चौथ्या गड्यासाठी ७१ धावांची भागीदारी केली. दीपेंद्र सिंग एअरीने जेकबला लोकेश बामकडून झेलबाद केले. जेकब बेथेलने ३५ चेंडूंत ४ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ५५ धावांची अर्धशतकी खेळी केली. पुढे हॅरी ब्रुकने सॅम करन (२) व विल जॅक्सच्या साथीने संघाला दीडशे धावांचा टप्पा गाठून दिला. नंदन यादवने ब्रुकला बाद केले. हॅरी ब्रुकने ३२ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली. नंतर विल जॅक्सने जोफ्रा आर्चर व लियाम डावसनच्या मदतीने इंग्लंडला २० षटकांत ७ बाद १८४ धावांचा टप्पा गाठून दिला. नेपाळच्या दीपेंद्र सिंग व नंदन यादवने प्रत्येकी २ बळी, तर शेर मल्ला व संदीप लामचिनेने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी १८५ धावांचा पाठलाग करताना नेपाळच्या किशल भुरतेल (२९) व आसिफ शेखने (७) पहिल्या गड्यासाठी ३७ धावांची भागीदारी केली. पुढे कर्णधार रोहित पौडेल (३९), दीपेंद्र सिंग एअरी (४४) व आरिफ शेखने छोट्या-छोट्या भागिदारी करत नेपाळच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. पुढे लोकेश बामने नाबाद खेळी करत नेपाळच्या विजयाच्या समीप आणले, परंतु अखेरच्या षटकांत डावखुरा वेगवान गोलंदाज सॅम करनने प्रभावी गोलंदाजी करत सामन्याचा कल इंग्लंडच्या बाजूने वळविला. नेपाळला २० षटकांत ६ बाद १८० धावांपर्यंतच मजल मारता आली. इंग्लंडकडून लियाम डावसनने २ बळी, तर लुक वूड, जोफ्रा आर्चर, विल जॅक्स व सॅम करनने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# एलावेनिल-बाबुताला मिश्र सांघिकचे सुवर्णपदक

### आशियाई नेमबाजी

**नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

रविवारी भारतीय नेमबाजांनी आशियाई रायफल/पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत आपले वर्चस्व कायम ठेवले. ऑलिम्पिकपटू एलावेनिल वेलारिवन आणि अर्जुन बाबुताने अजिंक्यपद कामगिरी करत १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.

भारताच्या विजयाच्या लाटेवर स्वार होऊन, हिमांशू ढिल्लन आणि शांभवी क्षीरसागरने करणी सिंग रेंजेस येथे झालेल्या याच स्पर्धेत कनिष्ठ गटात सुवर्णपदक जिंकले.

शनिवारी महिला एअर रायफलमध्ये सुवर्णपदक जिंकणारी एलावेनिलने चार संघांच्या अंतिम फेरीत २४ शॉट्समध्ये २५३.४ गुणांची नोंद केली, तर बाबुताने पदक फेरीत सुरुवातीच्या अडचणीतून सावरत २५१.६ गुणांसह आपले सुवर्णपदक जिंकले. एलावेनिल आणि बाबुता यांच्या एकत्रित ५०५.० गुणांमुळे त्यांना दक्षिण कोरियाच्या युंजी क्वोन आणि किम वुरिम यांच्यावर चार गुणांची स्पष्ट आघाडी मिळाली, ज्यांनी ५०१.० गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर जपानच्या मिसाकी नोबाता आणि नाओया ओकाडा यांनी ४३७.१ गुणांसह कांस्यपदक पटकावले. भारतीय जोडीने पात्रता फेरीतही आपला दबदबा कायम ठेवला होता आणि ६३२.८ गुणांसह अव्वल स्थान पटकावले होते. हिमांशू आणि शांभवी यांनी शनिवारी त्यांच्या वैयक्तिक विजयांमध्ये मिश्र सांघिक सुवर्णपदक मिळवले आणि अंतिम फेरीत ५०२.४ गुणांसह कमांडिंग एकूण गुण नोंदवले, जो आशियाई ज्युनियर विक्रम होता. अंतिम फेरीत वर्चस्व गाजवताना, भारतीय जोडीने कझाकस्तानच्या अलिना सत्पायेवा आणि तामेर्लान काबुलोव्ह (४८८.६) यांच्यापेक्षा १३.८ गुणांनी पुढे राहून सुवर्णपदक पटकावले. (वृत्तसंस्था)

# चांगली सुरुवात करण्याचे लक्ष्य : मार्कराम



एडन मार्कराम



दिलप्रीत बाजवा

**अहमदाबाद, ८ फेब्रुवारी**

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्कराम सोमवारी टी-२० विश्वचषकातील सलामीच्या सामन्यात कॅनडा संघाला कमी लेखण्याच्या मनःस्थितीत नाही. आम्ही आपल्या मोहिमेची सकारात्मक सुरुवात करण्याच्याच प्रयत्नात आहे, असे त्याने सांगितले. हे दोन्ही संघ गट ब मधील आपल्या पहिल्या सामन्यात एकमेकांविरुद्ध खेळतील.

त्यांना संभाव्य विजेत्यांपैकी एक मानले जात असले तरी, मार्कराम म्हणाला की गत दोन दिवसांतील चुरशीच्या सामन्यांनी आधीच हे दाखवून दिले आहे की कोणताही संघ कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला कमी लेखू शकत नाही. कोणताही सामना एकतर्फी किंवा सोपा असेल असे वाटत नाही, पण मला आमच्या संघावर विश्वास आहे. जर आम्ही खरोखरच चांगला क्रिकेटचा खेळ केला, तर आमचा विजय निश्चित आहे, असे मार्कराम रविवारी सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत म्हणाला. अशा स्पर्धेत चांगली सुरुवात करायची असते व ती गती पुढे कायम ठेवायची असते. त्यामुळे एक संघ म्हणून आमचे बरेच लक्ष त्यावरच केंद्रित आहे. आम्ही खूप चांगली कामगिरी करू, सा आम्हाला विश्वास आहे, असेही तो म्हणाला.

कॅनडा हा आमच्यासाठी तुलनेने एक अपरिचित संघ असला तरी, त्यांनी आपला गृहपाठ केला आहे, असे तो म्हणाला.

### आजचे सामने

**इटली वि. स्कॉलंड**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

**ओमान वि. झिम्बाब्वे**
**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**कॅनडा वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### इटली मोहिमेची सुरुवात स्कॉटलंडविरुद्ध करणार

**कोलकाता** : फुटबॉलमधील बलाढ्य संघ इटलीला सोमवारी येथे स्कॉटलंडविरुद्धच्या ऐतिहासिक आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या पदार्पणाच्या सामन्यात क्रिकेटच्या सर्वात मोठ्या मंचावर आपली छाप सोडण्याची संधी मिळेल. चार फिफा विश्वचषकांचा विजेता असलेला अझ्झुरी संघ आता ग्ली अझ्झुरी संघाला मार्ग मोकळा करून देईल, त्यांनी गेल्या जुलैमध्ये युरोपियन प्रादेशिक पात्रता फेरीतून २० संघांच्या विस्तारित स्पर्धेत स्थान मिळवून एक अनपेक्षित क्रिकेट अध्याय लिहिला आहे. इटली आणि चॅनल आयलँडर्स जर्सी, त्यांनी स्कॉटलंडला पराभूत केले होते, त्यांनी प्रत्येकी पाच गुण मिळवले, परंतु इटालियन संघाने नेदरलॅण्डच्या मागे चांगल्या नेट रन रेटच्या आधारावर दुसरे स्थान मिळवून या जागतिक स्पर्धेत आपले पहिलेवहिले स्थान निश्चित केले. (वृत्तसंस्था)

# सिफर्ट, फिलिप्सची जबरदस्त खेळी

### न्यूझीलंडचा अफगाणिस्तानवर ५ गड्यांनी विजय

**चेन्नई, ८ फेब्रुवारी**

टिम सिफर्टच्या संयमी पण आक्रमक फलंदाजीच्या जोरावर, न्यूझीलंडने १८३ धावांचे लक्ष्य १५ चेंडू शिल्लक ठेवून पूर्ण करत पाच गडी राखून विजय मिळवला आणि रविवारी एम.ए. चिदम्बरम् स्टेडियमवर आपल्या टी-२० विश्वचषक मोहिमेची शानदार सुरुवात केली. या विजयाबरोबरच न्यूझीलंडने स्पर्धेच्या गत हंगामात अफगाणिस्तानकडून झालेल्या पराभवाचा बदला घेतला आणि गट ड च्या पहिल्या सामन्यात पहिले दोन गुण मिळवले. ४२ चेंडूंत ६५ धावांची खेळी व दोन झेल पकडणारा टिम सिफर्ट सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.




अफगाणिस्तानला ६ बाद १८२ धावांवर रोखल्यानंतर न्यूझीलंडने विजयासाठी आवश्यक १८३ धावा १७.५ षटकांत ५ गडी गमावित गाठले.

लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात अडखळत झाली, कारण अफगाणिस्तानच्या फिरकी गोलंदाजांनी सुरुवातीलाच धक्के दिले. फिन ॲलन १ धावेवर बाद झाला, आणि रचिन रवींद्र शून्यावर बाद झाला, या दोघांनाही मुजीब उर रहमानने बाद केले, ज्यामुळे दोन षटकांच्या आत न्यूझीलंडची अवस्था २ बाद १४ अशी झाली होती. अफगाणिस्तानला विजयाची संधी दिसू लागली होती, परंतु सिफर्टने डाव सावरला.

सिफर्टने आत्मविश्वासाने प्रतिहल्ला केला, त्याने जोरदार फटकेबाजी व चतुराईने चेंडू योग्य ठिकाणी खेळण्याचा मिलाफ साधला. त्याच्या ४२ चेंडूंतील ६५ धावांच्या खेळीत ७ चौकार व ३ षट्कारांचा समावेश आहे. त्याने अफगाणिस्तानकडून सामन्याची गती पुन्हा आपल्या बाजूने वळवली व लक्ष्याचा पाठलाग स्थिर केला. त्याला ग्लेन फिलिप्सच्या रूपात एक आदर्श साथीदार मिळाला. फिलिप्सने २५ चेंडूंमध्ये ४२ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्यांच्या ७४ धावांच्या भागीदारीमुळे न्यूझीलंड आवश्यक धावगतीच्या पुढे गेले. रशीद खानने फिलिप्सला बाद केले व नंतर मार्क चॅपमनला (१७ चेंडूत २८) बाद केले. १३ व्या षटकात ४ बाद १२४ धावसंख्येवर सिफर्ट बाद झाल्याने सामना रोमांचक राहिला, पण तोपर्यंत न्यूझीलंडला प्रति षटक आठपेक्षा कमी धावांची गरज होती. सामन्याचा शेवट निर्णायक होता. डॅरिल मिचेल (१४ चेंडूत नाबाद २५) व कर्णधार मिचेल सॅण्टनरने (८ चेंडूत नाबाद १७) कोणतीही अडचण येणार नाही याची खात्री केली, आणि शेवटच्या षटकांमध्ये निर्णायकपणे वेग वाढवत १७.५ षटकांत ५ बाद १८३ धावा करून विजय निश्चित केला. सॅण्टनरने २०० पेक्षा जास्तच्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. (वृत्तसंस्था)

# भारताने जिंकली नऊ सुवर्णपदके

### बॉक्सम एलिटम

**ला नुसिया (स्पेन), ८ फेब्रुवारी**

ऑलिम्पिक पदक विजेती लवलिना बोर्गोहेन आणि माजी युवा विश्वविजेती अरुंधती चौधरीने आघाडी घेत भारताने बॉक्सम एलिट आंतरराष्ट्रीय २०२६ मुष्टियुद्ध स्पर्धेत वर्चस्वपूर्ण कामगिरी करत ९ सुवर्णपदके जिंकून स्पर्धेची यशस्वी सांगता केली. एका उल्लेखनीय कामगिरीमध्ये, शनिवारी झालेल्या सात एलिट महिलांच्या अंतिम सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व होते, यात ५४ किलो वजनी गटातील सर्व-भारतीय विजेतेपदाच्या लढतीचा समावेश होता आणि त्या सर्वांमध्ये भारताने सुवर्णपदक जिंकले.

बॉक्सम एलिट २०२६ स्पर्धेत २० देशांतील २०० हून अधिक मुष्टियोद्ध्यांनी भाग घेतला होता, त्यामुळे हंगामाच्या सुरुवातीलाच उच्च-गुणवत्तेची आंतरराष्ट्रीय परीक्षा मिळाली. भारताने नऊ सुवर्ण, तीन रौप्य आणि सात कांस्य पदकांसह स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ म्हणून स्थान मिळवले.

भारतीय महिलांनी अंतिम दिवशी एक नवा आदर्श घालून दिला. मंजू राणी (४८ किलो) आणि नीतू (५१ किलो) यांनी अनुक्रमे स्पेनच्या मार्टा लोपेझ आणि नोएलिया गुटिरेझ यांच्यावर एकतर्फी विजय मिळवून सुरुवात केली, त्यानंतर पूनमने (५४ किलो) एका चुरशीच्या सर्व-भारतीय अंतिम सामन्यात सहकारी खेळाडू प्रीतीवर मात केली.

प्रिया (६० किलो) आणि अरुंधती (७० किलो) यांनी युक्रेनियन प्रतिस्पर्ध्यांवर ५:० अशा फरकाने विजय मिळवला, तर लव्हलिनाने (७५ किलो) आपला वैशिष्ट्यपूर्ण संयम आणि नियंत्रण दाखवत इंग्लंडच्या मेरी-केट स्मिथला ४:१ ने पराभूत केले. नैना (८० किलो) ने युक्रेनच्या रायसा पिस्कुनवर नियंत्रित विजय मिळवून विजयाची मालिका पूर्ण केली.

पुरुषांच्या अंतिम फेरीत, सचिनने (६० किलो) दिवसातील सर्वात रोमांचक कामगिरीपैकी एक केली. (वृत्तसंस्था)

# आयसीसीचे उपाध्यक्ष लाहोरला रवाना

### बहिष्काराच्या मुद्द्यावरून तोडगा काढण्याचा प्रयत्न

**कराची, ८ फेब्रुवारी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) उपाध्यक्ष इम्रान ख्वाजा हे पाकिस्तानच्या भारतविरुद्धच्या महत्त्वाच्या टी-२० विश्वचषक सामन्यावर प्रस्तावित बहिष्कारावरून निर्माण झालेला तिढा सोडवण्याच्या प्रयत्नांना वेग आल्याने, पीसीबी अधिकाऱ्यांशी भेटण्यासाठी लाहोरला रवाना झाले आहेत.

आयसीसीमध्ये सिंगापूरचे प्रतिनिधित्व करणारे ख्वाजा हे जागतिक नियामक मंडळात एक प्रभावशाली व्यक्ती आहेत आणि सहयोगी सदस्य संचालक म्हणून त्यांना मंडळावर मतदानाचा अधिकार आहे.

पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) जवळच्या एका सूत्राने दुजोरा दिला की, ख्वाजा यांना आयसीसी बोर्डाने या वादग्रस्त विषयावर मध्यस्थ म्हणून नामांकित केले आहे.

**बीसीबी प्रमुख लाहोरमध्ये दाखल**

पाकिस्तानने भारतासोबतच्या टी-२० विश्वचषक सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या प्रस्तावावरून निर्माण झालेला तिढा सोडवण्याच्या प्रयत्नांदरम्यान, बांगलादेश क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष अमीन उल इस्लाम हे पीसीबी व आयसीसी यांच्यातील आभासी बैठकीपूर्वी लाहोरमध्ये दाखल झाले आहेत.

माजी कसोटीपटू असलेल्या अमीन उल इस्लाम यांनी लाहोरमध्ये पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांची भेट घेतली व १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या विश्व टी-२० चषक सामन्यात भारतासोबत न खेळण्याच्या पाकिस्तानच्या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी आयोजित केलेल्या आभासी चर्चेत ते सहभागी होण्याची शक्यता आहे.

भारत सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या सरकारच्या निर्देशांवर नक्वी यांनी फारशी प्रतिक्रिया दिलेली नाही, परंतु एका विश्वसनीय सूत्राने सांगितले की, श्रीलंकेच्या क्रिकेट मंडळाने पीसीबीला एक ई-मेल पाठवून बहिष्कार मागे घेण्याची विनंती केल्यानंतर परिस्थिती बदलली आहे. (वृत्तसंस्था)

### भारत-पाकिस्तान सामना होण्याची ९९ टक्के शक्यता : सूत्रांची माहिती

**नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

टी-२० विश्वचषकातील बहुप्रतिक्षित भारत-पाकिस्तान सामना १५ फेब्रुवारी रोजी खेळवला जाण्याची शक्यता जवळपास निश्चित आहे, आणि सध्या व्यवस्थांना अंतिम रूप देण्यासाठी बैठका सुरू आहेत.पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) सूत्रांनी सुरू असलेल्या बैठकीबद्दल दुजोरा दिला आहे, आणि हा सामना कोलंबोमध्ये खेळवला जाण्याची दाट शक्यता आहे. बैठका सुरू आहेत, आणि भारत-पाकिस्तान सामना १५ फेब्रुवारी रोजी होण्याची ९९ टक्के शक्यता आहे, असे पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या सूत्रांनी सांगितले. पीसीबी आपल्या देशातील क्रिकेटसाठी महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन परिणामांचा विचार करेल अशी आयसीसीला आशा आहे, कारण पीसीबी स्वतः एक सदस्य आणि लाभार्थी आहे, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# १९ वर्षांखालील विश्वचषक संघात सूर्यवंशीची निवड

**दुबई, ८ फेब्रुवारी**

फलंदाजीतील तरणाबांड खेळाडू वैभव सूर्यवंशीसह तीन भारतीय खेळाडूंची रविवारी आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेच्या सर्वोत्कृष्ट संघात निवड करण्यात आली.

१४ वर्षीय सूर्यवंशीने इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात ८० चेंडूत शानदार १७५ धावा केल्या होत्या व त्यानंतर त्याला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून गौरवण्यात आले होते. या १२ सदस्यीय संघात त्याच्यासोबत त्याचे सहकारी कनिष्क चौहान आणि हेनिल पटेल यांचाही समावेश आहे. भारताने विक्रमी सहाव्यांदा हे विश्वविजेतेपद पटकावले.

चौहानने फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीमध्ये सातत्याने मौल्यवान योगदान दिले, तर पटेलने ११ बळी घेतले, यात अमेरिकेविरुद्ध १६ धावांत पाच बळींच्या उत्कृष्ट कामगिरीचा समावेश आहे.

उपविजेत्या इंग्लंडचेही तीन खेळाडू या संघात आहेत, यात थॉमस रेवला कर्णधार व यष्टिरक्षक म्हणून निवडण्यात आले आहे.

रेवने सरासरी ६६ च्या सरासरीने ३३० धावा केल्या, यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध उपांत्य फेरीत सामना जिंकून देणाऱ्या शतकाचा समावेश आहे.

स्पर्धेतील सर्वाधिक १६ बळी टिपणारा मॅनी लम्सडेन व स्पर्धेतील सर्वाधिक ४४४ धावा करणारा बेन मेयस हे रेवसोबत संघात सहभागी झाले आहेत.

मेयस १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषकातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येच्या सर्वकालीन विक्रमाची बरोबरी करण्यापासून केवळ एक धाव दूर होता. हा विक्रम चार दिवसांपूर्वी श्रीलंकेच्या विरान चामुदिथाने रचला होता. त्याची १९२ धावांची ऐतिहासिक खेळी जपानविरुद्ध होती, यात २६ चौकार व एका षट्काराचा समावेश आहे. विरानचीही या संघात निवड झाली आहे.

अफगाणिस्तानचे फैसल खान शिनोझादा आणि नुरिस्तानी ओमरझाई या दोघांचीही निवड झाली आहे.

फैसलने आयर्लण्ड व भारताविरुद्ध सलग शतके झळकावून स्पर्धेचा शेवट केला, तर नुरिस्तानीने १४ बळी घेतले, यात त्याने टांझानियाविरुद्ध ९ धावांत पाच बळी टिपण्याची सर्वोत्तम कामगिरी केली.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार ऑलिव्हर पीक यानेही दोन शतके झळकावली. पाकिस्तानचा अली रझा व वेस्ट इंडीजचा विटेल लॉज यांच्या निवडीने हा संघ पूर्ण होतो. जमैकन डावखुरा फिरकी गोलंदाज लॉजने त्याच्या पाच सामन्यांमध्ये १० बळी मिळवले.

निवड समितीमध्ये इयान बिशप (संयोजक), लिडिया ग्रीनवे, अँडी फ्लॉवर, टेलफोर्ड व्हाइस यांचा समावेश होता. (वृत्तसंस्था)



### आयसीसी १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषक स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट संघ

वैभव सूर्यवंशी (भारत), विरान चामुदिथा (श्रीलंका), फैसल खान शिनोझादा (अफगाणिस्तान), थॉमस रेव यष्टिरक्षक, कर्णधार (इंग्लंड), ऑलिव्हर पीक (ऑस्ट्रेलिया), बेन मेस (इंग्लंड), कनिष्क चौहान (भारत), नुरिस्तानी ओमरझाई (अफगाणिस्तान), विटेल लॉज (वेस्ट इंडीज), अली रझा (पाकिस्तान), मॅनी लम्सडेन (इंग्लंड), हेनिल पटेल (भारत).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### विचारक्रांती संस्थेतर्फे त्यागमूर्ती माता रमाईस अभिवादन

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सिद्धार्थ हौसिंग सोसायटी येथील विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८व्या जयंती निमित्त रमाई व बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर प्रमुख उपस्थितांनी मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमास जयश्री जगधने, सुवर्णा शिवशरण, रत्नाबाई दुपारगुडे, लक्ष्मी शिवशरण, पौर्णिमा गायकवाड, वंदना शिंदे, सत्यभामा शिरसे, कुसुम दुपारगुडे, शांताबाई, संस्थेचे संस्थापक सुरज जगधने, साहिल गायकवाड,सागर दुपारगुडे व इतर सभासद उपस्थित होते. मल्लिकार्जुन ब्लड बँक व विचारक्रांतीच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम यशस्वी पार पडला. सूत्रसंचालन संस्थेचे सचिव राहुल शिवशरण यांनी केले. मनीष शिवशरण यांनी आभार मानले.

### बेशुद्ध अवस्थेत आढळली महिला, उपचारापूर्वी मृत्यू

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

अनोळखी महिला या एडवेंचर पार्क भकालो नर्सरी येथे अशक्त व बेशुद्ध अवस्थेत आढळल्याने त्यांना शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबात अधिक माहिती अशी की, अनोळखी महिला वय ६० ते ६५ वर्ष या दि. ८ फेब्रुवारी रोजी एडवेंचर पार्क, सार्वजनिक रोडवरील फूटपाथवर लोखंडी खोक्यात बकालो नर्सरी, पासपोर्ट कार्यालय जवळ अशक्त व बेशुद्ध अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचारासाठी फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस कॉन्स्टेबल व्ही. एस. घोडनवरू यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे

### बार्शीतील जि.प. व पं.स.ची मतमोजणी उपळाई रोडवरील शासकीय गोदामात

**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषदेच्या ६ व पंचायत समिती १२ जागेसाठीची मतमोजणी शासकीय धान्य गोदाम उपळाई रोड, बार्शी येथे आज सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता सुरु होईल. मतमोजणीकरिता २४ तर टपालीकरिता २ टेबलची व्यवस्था केली



असून १२ फेऱ्यांमध्ये सर्व निकाल घोषित होईल. प्रत्येक फेरीमध्ये पूर्ण एका गणाची मतमोजणी पूर्ण होईल. मतमोजणीकरिता १२० लोकांची नियुक्ती करण्यात आली आहे, असे सहा. निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार एफ.आर. शेख यांनी दिली आहे. मतमोजणी ठिकाणी पोलीस बंदोबस्तही चोख ठेवण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकल यांनी सांगितले.

### ब्राह्मण वधू-वर पुस्तिकेचे उद्या प्रकाशन

**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

येथील ब्रह्म प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही ब्राह्मण वधू-वरांची पुस्तिका प्रकाशन करण्यात येत आहे. याचे प्रकाशन मंगळवारी दि.१० फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता विजापूर रोड परिसरातील नविन आरटीओ जवळील चौडेश्वरी मंगल कार्यालयात होणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुहास देशपांडे यांनी दिली. यावेळी उपस्थित गरजू पालक व वधू-वर यांना पुस्तिका वाटप करण्यात येणार आहे. समाजातील सर्वांनी सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्षा सुजाता देशपांडे व सचिव संजय गोखले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सुहास देशपांडे (मो.७७०९०८०७२१) किंवा सुजाता देशपांडे ( मो.८२०८२१४३०९) यांच्याशी संपर्क साधावा.



## निधन वृत्त...

### सुधाकर मारडकर



**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

सुधाकर नरहरी मारडकर (वय ६४) यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. ॲड.लक्ष्मण मारडकर यांचे ज्येष्ठ बंधू तसेच दिपक अमृतकर यांचे ते सासरे होत.

### निवृत्ती उर्फ तात्या पवार



**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

धरमशी लाईन येथील निवृत्ती उर्फ तात्या दगडू पवार (वय-७२) यांचे वृध्दापकाळाने रविवारी (दि.८) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रसचे शहर-जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांचे ते चुलते होत.

### विजया गरड



**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील रहिवासी विजया विठ्ठल गरड यांचे रविवार (दि. ८) सकाळी दोंदे नगर जुळे सोलापूर येथे हृदयविकाराच्या त्रीव झटक्याने निधन झाले. त्या निवृत्त जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षिका होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा दोन मुली, नातवंड, जावई असा परिवार आहे.

# तामिळनाडूचे ५९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची रामेश्वर, पंढरपूर ते वाराणसी परिक्रमा

## पंढरपुरात रविवारी घेतले विठुरायाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.८ फेब्रुवारी -**

गावाकडच्या जमीनीसंदर्भात न्यायालयात दाखल केलेल्या केसचा सुमारे ७० वर्षांनी निकाल लागला. त्याप्रित्यर्थ भगवंतांचे आशीर्वाद घेण्यासाठी पेशाने पोस्टमास्तर असलेल्या ५९ वर्षीय एका ज्येष्ठ नागरिकाने तामिळनाडू राज्यातील होसुर (ता. सोलागिरी, जि.कृष्णागिरी) येथून चक्क सायकलवरुन परिक्रमेस सुरुवात केली आहे. विश्वास बसणार नाही असा त्यांचा या वयात थक्क करणारा सायकल प्रवास आहे. कारण सोलगिरी या आपल्या गावापासून त्यांनी आपल्या परिक्रमेस सुरुवात केली असून ते रामेश्वरम येथे दर्शन घेवून रविवारी पंढरपूरात दाखल झाले. त्यांची परिक्रमा ऐवढ्यावरच थांबणार नसून पंढरपूरातून दुपारी परिक्रमेच्या शेवटच्या ठिकाण असलेल्या वाराणसीकडे ते चक्क सायकलवरुन रवाना झाले.

या ज्येष्ठ नागरिकाचे श्रीनिवासराव असे नाव असून तामिळनाडू राज्यातील होसूर (ता. सोलागिरी,जि. कृष्णागिरी ) गावचे ते रहिवासी आहेत. पेशाने ते पोस्टमास्तर असून त्यांचे (वय-५९ वर्षे) इतके आहे. आज-कालच्या तरुणांना धावण्याचा देखील सराव नाही. मात्र श्रीनिवासराव हे ५९ वर्षांचे तरुण ज्येष्ठ नागरिक चक्क सायकलवरुन आपली परिक्रमा पुर्ण करीत आहेत.

दरम्यान परिक्रमेबद्दलचे कारण विचारले असता श्रीनिवासराव सांगतात की, १९५५ पासूनच्या होसूर येथील जागेच्या केसचा निकाल सुमारे ७० वर्षांनी २०२५ मध्ये लागला. त्याप्रित्यर्थ सोलागिरी ते रामेश्वरम ६०० किलोमीटर आणि रामेश्वरम ते पंढरपूर १ हजार ७०० किलोमीटर तसेच पंढरपूर ते वाराणसी १ हजार ४५० किलोमीटर अशा सायकलवरुन एकट्याने परिक्रमेचा निश्चय केला.

आपल्या निश्चय पुर्ततेसाठी २१ जानेवारी २०२६ सोलागिरी येथून रामेश्वरम कडे निघालो. २५ जानेवारी रोजी रामेश्वरम येथे पोहचलो. त्या ठिकाणी समुद्रस्नान, जगविख्यात रामेश्वर येथे भगवंताचे दर्शन करुन २६ जानेवारी २०२६ पंढरपूरच्या प्रवासासाठी मार्गस्थ झाल्याची माहिती श्रीनिवासराव यांनी दिली.

पंढरपूर येथे रविवारी ८ फेब्रुवारी रोजी दुपारी एकच्या दरम्यान ते दाखल झाले. येथे पोहचल्यावर विठुरायाचे दर्शन करून आता ते नागपूर मार्गे वाराणसी येथे निघालेले आहेत. पंढरपूर येथे मंदिर समितीने त्यांचे दर्शन घडविले. ज्या ज्या ठिकाणी ते पोहोचतात, त्याठिकाणी पोस्टऑफीस मधून ते त्याठिकाणी पोहोचल्याचे प्रमाणपत्र लिहून घेतात. या प्रमाणेच रामेश्वरम येथील पोस्ट ऑफिसमधून त्यांनी प्रमाणपत्र घेतले आहे.

दरम्यान आज रविवार असल्याने पंढरपूर पोस्ट ऑफिस बंद होते म्हणून त्यांनी पंढरपूर नगरपरिषदेचे नगरसेवक ओंकार जोशी यांच्याशी संपर्क साधला. यावेळी नगरसेवक जोशी यांनी त्यांचे यथोचित स्वागत करुन आपल्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र दिले. त्यामुळे पंढरपूरातून आता वाराणसीच्या प्रवासासाठी त्यांचे प्रस्थान झाले आहे. सुमारे १५ ते २० दिवसांनी वाराणसी येथे श्रीनिवासराव हे पोहोचतील असेही यावेळी त्यांनी दैनिक तरुण भारत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.





### वाराणसी येथे श्रीनिवासरावांची मुक्कामाची झाली सोय

एवढ्यावरच संगीतकार विनोद शेंडगे थांबले नाहीत. त्यांनी त्वरीत काशी येथील जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचेशी देखील संपर्क साधला. शिवाचार्य महाराजांना श्रीनिवासराव यांच्या परिक्रमेविषयी त्यांनी माहिती दिली. त्यानंतर शंकराचार्यांनी श्रीनिवासराव यांच्या १५ दिवसानंतर वाराणसी येथे पोहचल्यानंतर तेथील मुक्कामात सर्वतोपरी त्यांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिल्याचे विनोद शेंडगे यांनी सांगितले.

### दिवसभराचा असा आहे दिनक्रम

श्रीनिवासराव हे दररोज पहाटे चार ते साडेचार वाजता उठतात. पुजा, पाठ करुन पहाटे ते सायकल प्रवासास सुरुवात करतात. संध्याकाळी सहा वाजता कुठलेही गाव लागले तर त्या ठिकाणी त्यांचा मुक्काम असतो. मुक्काम जे गाव लागेल त्या गावातील मंदिरात,धर्मशाळेत तर काही वेळेस ग्रामस्थांच्या घरातील अंगणात देखील मुक्काम करतात. लोक प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करतात. त्यानंतर पुढच्या प्रवासासाठी ते मार्गस्थ होतात.

### पांडुरंगाने तुमच्या मार्फत दर्शनाची व्यवस्था केली

येथील ख्यातनाम संगीतकार विनोद शेंडगे यांच्या विठ्ठल मंदिरा जवळील घराजवळ श्रीनिवासराव यांनी स्वत:ची सायकल ठेवलेली होती. त्यामुळे शेंडगे यांना ते दिसले. शेंडगे यांनी त्यांच्याकडे विचारपूस केली. तेंव्हा श्रीनिवासराव यांनी आपल्या परिक्रमे विषयीची माहिती शेंडगे यांना दिली. त्यानंतर शेंडगे यांनी त्यांच्या संदर्भातील माहिती विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला देखील कळविली. विठ्ठल मंदिरात दर्शन झाल्यावर श्रीनिवासराव म्हणाले की, चंद्रभागे मध्ये स्नान करताना विचार केला. आता पांडुरंगाचे दर्शन कोण करवून देणार. कारण सुट्यांमुळे दर्शनासाठी एवढी मोठी दर्शन रांग आहे. मग तुम्ही भेटला आणि पांडुरंगाने तुमच्या मार्फत दर्शनाची व्यवस्था केल्याचे सांगून श्रीनिवासराव यांनी आपले आभार मानल्याचे विनोद शेंडगें यांनी सांगितले.





## मतमोजणीसाठी माळशिरस प्रशासन सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ८ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी सोमवार दि. ९ रोजी शासकीय धान्य गोडाऊन माळशिरस याठिकाणी होणार आहे. एकावेळी एका गटाची व त्या गटातील दोन गणाची व टपाली मतदानाची मतमोजणी करण्यात येणार आहे. ही मतमोजणी २४ टेबलावर करण्यात येणार असून प्रत्येक टेबल साठी एक सुपरवायझर, दोन सहाय्यक, एक शिपाई यांची नेमणूक करण्यात आली आहे. टपाली मतदानासाठी प्रत्येक गटाला एक, दोन गणना दोन असे स्वतंत्र कर्मचारी नेमण्यात आले आहेत. संगणक, सिलिंग, रिपोर्टिंग यासह मतदान प्रक्रीयेसाठी २०१ कर्मचारी याची नेमणूक करण्यात आली आहे.

# सांगोल्यात २० टेबलवर मतमोजणी

### पोस्टल व ईव्हीएम साठी स्वतंत्र व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.८ फेब्रुवारी -**

जि.प व पं.स सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत आज सोमवार दि.९ फेब्रुवारी रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे होणाऱ्या मतमोजणीसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून पोस्टल मतदान मतमोजणी ३ टेबलवर स्वतंत्र ठेवलेली असून २० टेबलवर ईव्हीएम द्वारे झालेल्या मतांची मतमोजणी होणार आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली.

स.८ वा. कर्मचारी मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. मतमोजणी करण्या अगोदर पोस्टल मतमोजणी होईल. त्यानंतर २० टेबल वरती पहिली फेरी स.१० वा. सुरू करण्यात येईल. मतमोजणी पहिले दोन फेऱ्या जि.प महुद गट व गणाची, तिसरी-चौथी फेरी जि.प एखतपुर गट व गणाची, पाचवी-सहावी-सातवी फेरी जि.प जवळा गट व गणाची, आठवी- नववी-दहावी फेरी जि.प कडलास गट व गणाची, अकरावी व बारावी फेरी जि.प चोपडी गट व गणाची, तेरावी-चौदावी-पंधरावी फेरी जि.प कोळा गट व गणाची, सोळावी-सतरावी-आठरावी फेरी जि.प घेरडी गट व गणाची होईल. याप्रमाणे एकूण १८ फेऱ्या घेतल्या जातील अशी माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली. मतमोजणीसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आवश्यक असून एकूण १४० अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

### मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा

मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. उमेदवाराचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी यांना नियमानुसार प्रवेश देण्यात येणार आहे. संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेवर काटेकोर लक्ष राहणार असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कडक सुरक्षा, पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**-बी.आर.माळी,**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख मोहसीन तांबोळीसह सदस्य एक वर्षाकरिता हद्दपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सोलापूर ग्रामीण पोलिसांनी बार्शी येथील सराईत गुन्हेगार टोळीस १ वर्षाकरीता हददपार केले आहे.

पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयास महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ५५ अन्वये ''मोहसिन साबीर तांबोळी'' व त्याच्या टोळीतील सदस्यांविरुध्द पोलीस निरीक्षक, बार्शी शहर पोलीस ठाणे यांनी प्रस्ताव सादर केला होता. या टोळीमध्ये टोळी प्रमुख मोहसिन साबीर तांबोळी, टोळी सदस्य शहाबाज जहाँगीर शेख, इब्राहिम राजअहमद शेख, अखिल इब्राहिम सय्यद सर्व रा.बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर असे सदस्य आहेत. टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांनी सोलापूर जिल्हयात तसेच बार्शी तालुक्यात दहशत माजवुन खंडणी मागणे, घातक हत्याराचा वापर करून जबर इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे, महिलेची छेडछाड करणे, जातीवाचक शिवीगाळी करणे, शिवीगाळी दमदाटी करून जिवे ठार मारण्याची धमकी देणे तसेच इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे टोळीसह तर कधी टोळीचा सदस्य म्हणुन केले होते.टोळीने संघटीतरित्या एकत्र येवून तर कधी टोळीचा सदस्य म्हणुन स्वतंत्ररित्या गुन्हे करून सामाजीक स्वास्थ बिघवडत होते व टोळीची दहशत निर्माण करत होते. टोळीतील सदस्य इब्राहिम जहाँगीर शेख यास यापुर्वी हददपार करण्यात आले होते, तसेच इतराविरूध्द प्रतिबंध कारवाई करून देखील त्यांच्यात सुधारणा होत नव्हती. त्यांच्या



गुन्हेगारी कृत्यास आळा घालण्यासाठी प्रकरणाची सुनावणी अतुल कुलकर्णी हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांचे समक्ष होवून टोळीस सोलापूर जिल्हयातुन एक वर्ष करीता हद्दपार करण्यात आले आहे.

ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल वि. कुलकर्णी यांच्या आदेशान्वये करण्यात आली. अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी विभाग अशोक सायकर, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजय जगताप, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे, इतर अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केली.

# भक्ती म्हणजे एक मूल्यनिष्ठ जीवनशैली : कुलकर्णी-उत्पात

### मोहोळमध्ये श्रीरामदास नवमी प्रवचन सप्ताहात प्रभावी निरूपण

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.८ फेब्रुवारी-**

भक्ती म्हणजे केवळ देवपूजा अथवा कर्मकांड नव्हे, तर ती संपूर्ण जीवन व्यापणारी एक मूल्यनिष्ठ जीवनशैली असल्याचे प्रतिपादन हभप विनया कुलकर्णी-उत्पात यांनी केले.

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने श्रीरामदास नवमीनिमित्त आयोजीत प्रवचानात त्या बोलत होत्या. येथील व्यंकटेश मंदिरात या प्रवचन सोहळ्याच्या तिसऱ्या दिवशी त्यांनी भक्ती पंथेची जावे या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण, भावस्पर्शी आणि अंतर्मुख करणारे निरूपण सादर केले. संत परंपरेतील विचारांचे संदर्भ, नामस्मरणाचे अनन्य साधारण महत्त्व, अहंकाराचा त्याग आणि ईश्वर प्राप्तीचा साधा पण सखोल मार्ग त्यांनी विविध उदाहरणांच्या आधारे उलगडून दाखवला. त्यांच्या शब्दसाधनेतून भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. या भावपूर्ण निरूपणामुळे सर्वजण भक्तिरसात न्हाऊन निघाले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष प्रा. बाजीराव जोशी यांच्यासह प्रा. आराध्ये, दत्तात्रय कुलकर्णी, दिलीप देशपांडे, दीपक देशपांडे, ॲड. अमोल देशपांडे, उमेश पुराणिक, दत्तात्रय देशपांडे, म्हमाणे, कोळेकर, राजन घाडगे, हेमंत कुलकर्णी, भारती देशपांडे, जानकी कुलकर्णी, अलकनंदा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नम्रता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अंजली देशपांडे यांनी आभार मानले.



# गाईने दिला चक्क चार वासरांना जन्म

### सटवाईवाडीत आनंदाचे वातावरण

**वाशी, दि. ८ फेब्रुवारी-**

वाशी तालुक्यातील सटवाईवाडी येथील प्रदीप फरताडे यांच्या गाईने चक्क चार वासरांना जन्म दिल्याची दुर्मीळ आणि आनंददायी घटना घडली आहे. ग्रामीण भागात अत्यंत क्वचित घडणाऱ्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे. जन्मलेल्या सर्व चारही वासरांची प्रकृती उत्तम असून गाईची तब्येतही स्थिर असल्याची माहिती पशुवैद्यकीय डॉक्टरांनी दिली आहे. वासरांना पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली असून ही घटना शुभ मानली जात आहे. शेतकरी वर्गासाठी ही घटना आशेचा आणि आनंदाचा संदेश देणारी असून सटवाईवाडी गावात सध्या या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे.



# मसाप निवडणूक : एकाधिकारशाही विरोधात संघर्ष तीव्र करणार

### संरक्षण कृती समितीचा पत्रकार परिषदेत इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र साहित्य परिषद ही कोणत्याही व्यक्तीची मक्तेदारी नसून मराठी साहित्यप्रेमींची सामूहिक संस्था आहे. बेकायदेशीर व दबाव तंत्राविरोधात लढा कायम राहील, असा इशारा संरक्षण कृती समितीचे कार्याध्यक्ष प्रा. डी. के. कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विविध पदांसाठी २०२६ सालच्या निवडणुका जाहीर होताच वातावरण तापले असून विद्यमान कार्यकारिणीवर गंभीर आरोपांची सरबत्ती करण्यात आली आहे. मसाप संरक्षण कृती समितीने पत्रकार परिषद घेऊन परिषदेमध्ये गेल्या काही वर्षांपासून एकाधिकारशाही, दबावतंत्र आणि गैरव्यवहार सुरू असल्याचा आरोप करत या विरोधात सर्व स्तरावर संघर्ष छेडण्याचा इशारा दिला.

कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यमान कार्यकारिणी सदस्यांवर निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विरोधी उमेदवारांवर दबाव आणणे, मतदार याद्या सदोष ठेवणे, दुबार व मृत मतदारांचा समावेश करणे, तसेच संस्थेची घटना अनधिकृतरीत्या दुरुस्त करून निवडणूक जाहीर केल्याचा आरोप केला. सामान्य मराठी साहित्यप्रेमींना सभासदत्व नाकारून आपल्या परिचयातील व्यक्तींनाच सभासद करून घेतल्याचा आरोपही त्यांनी केला. साहित्य परिषद भवनाचा वापर निवडणूक कार्यालयाप्रमाणे केला जात असल्याचेही समितीने स्पष्ट केले आहे. या पत्रकार परिषदेस निमंत्रक शशांक महाजन , सदस्य विजय शेंडगे आदी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# व्हायोलिन, बासरी, तबल्याची जुगलबंदी; देवकी पंडित यांच्या गायनात रमले सोलापूरकर

**११ व्या संगीत महोत्सवाचा दिमाखदार समारोप**

## प्रिसिजन संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी अनुभवली संस्मरणीय सायंकाळ





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

रविवारची सायंकाळ सोलापूरकरांसाठी संस्मरणीय अशीच ठरली. जेन-झीच्या गळ्यातील ताईत असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरीवादक एस. आकाश, प्रसिद्ध व्हायोलिनवादक यज्ञेश रायकर आणि तबल्याचे जादुगार ईशान घोष या तिघांच्या अफलातून जुगलबंदीने प्रिसिजन संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशीची समा बांधला. प्रसिद्ध गायिका देवकी पंडित यांच्या गायनाने सोलापूरकरांना स्वत्व विसरायला भाग पाडले.

पहिल्या सत्रात राग मारु बिहागमध्ये विलंबित एकतालातली 'पिया नही आए, तडपत रैना दिन' या बंदिशीतून जुगलबंदीला सुरुवात झाली. बासरीचा निर्मळ स्वर, भावनांना साद घालणारे व्हायोलिनचे सूर आणि त्याच्या साथीला तबल्याच्या तालावर हळुवार फिरणारी ईशान घोष यांची बोटं, या साऱ्यांनी प्रिसिजन संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात रसिकांना रुंजी घातली. टाळ्यांचा प्रचंड कडकडाटात आणि वन्स मोअरची मागणी करत रसिकांनी या त्रयींना स्टँडिंग ओव्हिएशन दिले.

दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध गायिका देवकी पंडित यांनी गायन सादर केले. त्यांनी रागेश्री रागाने कार्यक्रमाची सुरुवात केली. रागाचा विस्तार करताना सूर आणि शब्दात रसिक हरवून गेले होते. त्यानंतर त्यांनी राग सोहनी सादर केला. देवकी पंडित यांना हार्मोनियमवर अभिषेक शिनकर, तबल्यावर प्रशांत पांडव तर तानपुऱ्यावर मीरा निलाखे यांनी साथसंगत केली.

कार्यक्रमाचा शेवट राग भैरवीने झाला. भैरवीतील ओळखीचे सूर आणि बंदिशीने मैफिल पूर्णत्वाला गेली. शेवटचा सूर थांबताच टाळ्यांचा कडकडाट झाला. बासरी, व्हायोलिन, तबल्याची जुगलबंदी आणि त्यानंतरचे गायन या दोन्ही सत्रांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रिसिजन कॅमशाफ्ट्सचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा, प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रिसिजनचे कार्यकारी संचालक करण शहा, मयुरा शहा यांनी कलाकारांचे स्वागत केले. सूत्रसंचलन प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी केले.

# ईव्हीएम मशीन आढळल्याने एकच खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.८ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतची प्रक्रिया शांतपणे पार पाडल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास २ ईव्हीएम मशीन जवळ आढळल्याने मोहोळ तालुक्यात एकच खळबळ उडाली .

शनिवारी जिल्हा परिषद व पंचायत समिती साठीमतदान प्रक्रिया शांततेमध्ये पार पडली . रात्री अकरा वाजल्यानंतर द २ मतदान नियंत्रण मशीन धाब्यावर असल्याचे लक्षात आल्यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाची जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील त्यांच्या कार्यकर्त्यासह घटनास्थळी दाखल झाले . तालुक्यामध्ये फोनाफोनी झाली . जवळपासच्या गावातील कार्यकर्त्यांनी या ठिकाणी एकच गर्दी केली. पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे तसेच निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर याही घटनास्थळी दाखल झाल्या. याबाबत उमेश पाटील यांनी या प्रकरणाचा प्रशासनाला जाब विचारण्यास सुरुवात केली शासकीय मालमत्ता आहे ही धाब्यापर्यंत आलीच कशी ?या प्रकरणाची चौकशी झालीच पाहिजे असे म्हणत ठिय्या मांडला कार्यकर्त्यांनी गराडा घातला. रात्री साडेबारा पावणे एक वाजेपर्यंत हा गोंधळ सुरू होता. जवळजवळ दोन तासाच्या गोंधळामध्ये अनेक गाड्या आणि कार्यकर्ते घटनास्थळाजवळ दाखल झाले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी या ठिकाणी आल्याशिवाय व या प्रकरणाची शहानिशा झाल्याशिवाय तेथून हलणार नसल्याची भूमिका उमेश पाटील यांच्यासह ठिय्या मांडलेल्या कार्यकर्त्यांनी घेतली . प्रशासन आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये संघर्ष वाढू लागला होता शेवटी या मशीन ह्या निवडणुकीच्या काळामध्ये वापरण्यात आलेल्या नाहीत त्या राखीव मशीन आहेत असा दावा प्रशिक्षणाच्या अधिकाऱ्यांनी केला .अधिकाऱ्याकडून तसेच सांगण्यात आले त्यानंतर काही वेळाने उमेश पाटील यांना अधिकाऱ्यासमवेत पोलीस ठाण्याकडे घेऊन जाण्यात आले

दरम्यान रविवारी त्या ईव्हीएम मशीन धाब्याकडे घेऊन जाणाऱ्या वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक प्रक्रिया करिता निवडणूक निर्णय अधिकारी मोहोळ यांनी दिलेल्या आदेशानुसार फिर्यादी यांची निवडणूक करावी नियुक्ती करण्यात आलेली होती . त्या अनुषंगाने फिर्यादी यांचे सोबत ईरटीका क्रमांक एम एस १३ - इ एस ५९२९ आरोपी चालक दिनेश संजय भांगे यास फिर्यादी व त्याच्या सोबतच्या पथकाच्या परवानगीशिवाय सदर वाहन कोठेही घेऊन जाऊ नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या तथापि सदरचे वाहनांमध्ये ईव्हीएम मशीन असल्याची पूर्ण कल्पना असताना देखील आरोपी चालक दिनेश संजय भांगे यांनी फिर्यादी यांच्या संमतीशिवाय परस्पर मोहोळ येथील स्ट्राँग रूम मधून सदर वाहन काढून वाहन मालक अभय गव्हाणे यांचे स्वराज्य पान शॉप स्वराज हॉटेल समोर उभे केले यानंतर फिर्यादी यांनी सदर वाहन तात्काळ मोहोळ स्ट्राँग रूम येथील परत आणण्याची आदेश दिली असता आरोपीने टाळाटाळ केली परिणाम ठिकाणी लोकांचा जमा जमा होत कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊन दंगल सदस्य परिस्थिती उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण पाटील हे करीत आहेत याबाबतची फिर्याद प्रसाद माणिकराव पाटील नोकरी कनिष्ठ अभियंता जिल्हा परिषद उपविभाग मोहोळ राहणार आष्टी यांनी दाखल केली आहे .



# स्व.महेश कोठे यांचे वीरशैव कन्नड भवनाचे स्वप्न पूर्ण करणार

### नूतन महापौर विनायक कोंड्याल यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानतर्फे आयोजित अकराव्या वधू-वर परिचय मेळाव्याच्या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा रविवारी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी कार्यालय, सिद्धेश्वर मंदिर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी स्व.महेशअण्णा कोठे यांचे वीरशैव सांस्कृतिक कन्नड भवन उभारण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महापौर कोंड्याल यांच्या हस्ते वधू-वर परिचय पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे उपाध्यक्ष सिद्धेश्वर बमनी, सचिव नीलकंठ कोनापुरे, विश्वस्त विश्वनाथ लब्बा, बाळासाहेब भोगडे, प्रभुराज मैंदर्गी, रतन रिक्के, प्रकाश बिराजदार तसेच नगरसेवक राजशेखर पाटील, सुधीर खरटमल, सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, सुदीप चाकोते, डॉ. प्रकाश घटूळे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी शुभाशीर्वाद देत प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी व वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानतर्फे महापौर कोंड्याल यांचा शाल, हार व सिद्धरामेश्वर यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापूरे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गुरुनाथ निंबाळे यांनी केले. आभार शशिकांत बिराजदार यांनी मानले.

## डॉ. आंबेडकरांचा अनुल्लेख; संबंधित मंत्र्यावर कारवाई करा

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी त्यांचं संपूर्ण जाहीर भाषण संपेपर्यंत भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांवाचा उल्लेख टाळला. हा प्रकार निषेधार्ह तितकाच संतापजनक आहे. याप्रकरणी कारवाई करावी अशी मागणी शाक्य'' सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी सामाजिक बहुउद्देशिय संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी अध्यक्ष अगंद मुके, अशोककुमार दिलपाक, शेखर वाघमारे, गोपीचंद कांबळे, अशोक सोनवणे, अंबादास सोनवणे, व्यंकटेश सोनवणे, शशिकांत बाबरे, शांताराम वाघमारे, श्रीमंत गायकवाड, नागेश गायकवाड, श्रीमंत कोरे यांची उपस्थिती होती.



# अक्कलकोटमध्ये दक्षिणमुखी हनुमान मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना

### हुबळीचे मठाधिपती राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी, बसवलिंग महास्वामीजी यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ फेब्रुवारी-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरातील कोहिनूर मंगल कार्यालय परिसरातील दिशा विहार मध्ये नव्याने भरण्यात आलेल्या श्री दक्षिणमुखी हनुमान मूर्तीची वेदमूर्ती गुड्डय्या स्वामी यांच्या विविध मंत्रोच्चारात हुबळी मठाचे मठाधिपती श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी व श्री बसवलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते विधीवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. शहरासह लोकमंगल विहार परिसरातील हजारो भाविक यावेळी उपस्थित होते.

लोकमंगल विहार परिसरात श्री स्वामी समर्थ महाराज व श्री मंगलदास आश्रम असून, येथे नियमितपणे विविध धार्मिक उपक्रम होतात. वेदमूर्ती श्री रुद्रय्या स्वामी महाराज यांच्या पुढाकाराने सदरची मंदिर लोकवर्गणीतून अवघ्या दहा महिन्यात उभारण्यात आले असून, येथे श्री हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. यानिमित्त मागील आठवडाभरापासून विविध धार्मिक कार्यक्रम येथे उत्साहात झाले. या परिसरातून श्री हनुमान मूर्तीची व कळसारोहण शोभायात्राही काढण्यात आली होती. शोभायात्रेत पुरवंत यांचे खेळ सादर करण्यात आले होते. ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी व फुलांच्या वर्षावाने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. विविध भक्तीगीते सादर केली गेली. मिरवणुकीत सहभागी असलेले हनुमान मूर्ती व कळसारोहण यांना फुलांच्या माळा घालून भाविकांनी दर्शन घेतले. दोन तास निघालेल्या शोभायात्रेचे या परिसरात मुख्य रस्त्यावरून मार्गक्रमण होवून दक्षिणमुखी हनुमान मंदिराजवळ समारोप झाला.

दुसऱ्या दिवशी मूर्ती प्रतिष्ठापना व कळसारोहण उत्सव विधिवत होमहवनाने झाला. त्यानंतर श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी महास्वामीजी यांची धर्मसभा संपन्न झाली. उपस्थित हजारो भाविकांना उद्योगपती सिध्दाराम टाके यांच्या लोकमान्य सुपर बझारतर्फे खिरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, सचिव श्याम मोरे, श्री स्वयंभू गणेश मंदिराचे ओंकार ग्रामोपाध्ये, उद्योगपती विलास कोरे, एजाज मुत्तवली, भिमाशंकर कुंभार, प्रथमेश इंगळे, सुनील गोरे, उरुजपाशा पिरजादे, शिवाजी लोखंडे, विक्रम हर्डीकर, सचिन स्वामी, इंजिनियर महेश शेडम व गुरु पोतदार, उषा हंचाटे, नगरसेविका भागुबाई कुंभार, अमृता शिंदे, नगरसेवक अविनाश मडिखांबे, नन्नु कोरबू, लक्ष्मीकांत धनशेट्टी, आनंद चौगुले, अशोक जाधव, रुद्रय्या स्वामी, निनाद डांगे उपस्थित होते. सूत्रसंचालन विरुपाक्ष कुंभार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी करेप्पा रोवली, रमेश शिंदे, गुरुशांत कुंभार, नागराज व बसवराज कुंभार, शांतविरप्पा दसले, दिगंबर साळुंखे, अविनाश कोरे, वेदेश गुरव, गुरु कुंभार, सुनिल आळंद, मल्लिकार्जुन पाटील, सचिन डिग्गे, सचिन जरीपटके, सुनिल जमादार, बसवराज अगरखेड, अनिल शिंदे, प्रणव शेटे, शंकर माळी, विरेश कुंभार व मंदिर पंच कमिटीने परिश्रम घेतले. श्री वटवृक्ष दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या उभारणीसाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात देणगी दिली आहे. विशेष म्हणजे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले महाराज यांनी लाखो रुपयांची श्री हनुमान मूर्ती भेट दिली आहे. तर कळस सेवा माजी सैनिक अनिल हत्ते यांनी केले आहे. यामुळे परिसरातील नागरिकांतून कौतुक व्यक्त होत आहे.

# ४ वर्षांची प्रशासकीय राजवट संपली; आता लोकप्रतिनिधींचे राज्य

### महापालिकेचा वर्षाकाठी ५५ ते ६० कोटींचा अतिरिक्त खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

सोलापूर महापालिकेत सार्वत्रिक निवडणुकीनंतर तब्बल चार वर्षांची प्रशासकीय राजवट अखेर संपुष्टात आली आहे. महापौर निवडीनंतर नव्या लोकप्रतिनिधींची महापालिकेत वर्दळ सुरू होत असून, त्यांच्यावरील विविध खर्चामुळे महापालिकेच्या तिजोरीवर दरवर्षी सुमारे ५५ ते ६० कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. दुसरीकडे हा वाढीव खर्च नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनालाही आता कसरत करावी लागणार आहे.

राज्यातील १८ महापालिकांप्रमाणेच सोलापूर महापालिकेची मुदत ८ फेब्रुवारी २०२२ रोजी संपली होती. ओबीसी आरक्षण आणि न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका जवळपास ३ वर्षे ११ महिने प्रलंबित राहिल्या. या कालावधीत प्रशासकीय राजवट लागू होती. पदाधिकारी व नगरसेवकांविना प्रशासनाने कारभार हाती घेतला होता. सोलापूर महापालिकेतील ही तिसरी प्रशासकीय राजवट ठरली.या काळात अनावश्यक खर्चांवर नियंत्रण ठेवण्यात आले. या आर्थिक वर्षात मिळकत करासह उत्पन्नात वाढ झाली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नियोजनबद्ध आर्थिक व्यवस्थापन करून प्रलंबित देणी फेडली तसेच विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला.मात्र नव्या टर्मसह महापालिका स्थापन झाल्याने विविध खर्च पुन्हा वाढणार आहेत. सदस्यांचे मानधन, सभेचे भत्ते, पदाधिकाऱ्यांचे कार्यालयीन व ऐच्छिक खर्च, वाहनांसाठी इंधन व दुरुस्ती, नवीन वाहन खरेदी, तसेच भांडवली आणि वॉर्डवाईज निधी या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून वर्षाकाठी सुमारे ५५ ते ६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. महापालिका बॉडी अस्तित्वात नसताना या प्रकारांवरील खर्च वाचत होता. मात्र आता वार्षिक सदस्य मानधन व सभाभत्त्यांवर सुमारे दीड कोटी रुपये, पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयीन खर्चावर दीड ते दोन कोटी रुपये, वाहन खर्च सुमारे ५० लाख रुपये आणि भांडवली व वॉर्डवाईज निधीसाठी तब्बल ४० ते ५० कोटी रुपये खर्च होणार आहेत.या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून खर्चावर मर्यादा आणण्याचे प्रयत्न सुरू राहतील. शाही थाटावरील खर्च टाळत काटकसरीची भूमिका घेणे हे प्रशासनासमोरचे मोठे आव्हान ठरणार आहे.



### २५ कोटींच्या ३३२ कामांची यादी रद्द

सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात २५ कोटी रुपयांच्या ३३२ कामांना सभागृहाने मान्यता दिली होती. मुदत संपताच प्रशासनाने ही यादी रद्द केली. त्याऐवजी प्रशासकीय अंदाजपत्रकातून १७ रस्त्यांची २५ कोटींची कामे हाती घेण्यात आली. पदाधिकारी व सदस्यांच्या निधीतील २५ कोटी आणि चालू वर्षातील निधी खर्च न झाल्याने एकूण सुमारे ५० कोटी रुपयांची बचत झाली.

### असा होणार वार्षिक खर्च

* १० स्वीकृतसह ११२ नगरसेवकांचे दरमहा १० हजार प्रमाणे वार्षिक मानधन १ कोटी ३४ लाख रुपये,
* ११२ नगरसेवकांना सभेचा १०० रुपये भत्ता (महिन्याला अधिकाधिक ४०० रुपये) ५ लाख ३८ हजार रुपये,
* महापौरांसह पदाधिकाऱ्यांचा वार्षिक कार्यालयीन खर्च ५० लाख रुपये,
* पदाधिकाऱ्यांचा ऐच्छिक मदत खर्च २५ लाख रुपये,
* नवीन वाहन, दुरुस्ती व पेट्रोल खर्च ५० लाख रुपये,
* ११२ नगरसेवकांना वार्षिक भांडवली निधी ४७ कोटी रुपये,१० स्वीकृत नगरसेवकांना मागणीप्रमाणे निधी सुमारे ५ कोटी रुपये, ११२ नगरसेवकांना वार्षिक ६ लाख रुपयेप्रमाणे वॉर्डवाईज निधी ६ कोटी ७२ लाख रुपये

### अंदाजपत्रकाची तयारी लवकरच सुरु होणार

२०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या बजेटची तयारी लवकरच सुरू होणार आहे. नगर सचिव कार्यालयाकडून पदाधिकारी व सदस्यांच्या खर्चाचा तपशील मागविण्यात आला आहे. मात्र अर्थसंकल्पीय सभेत भांडवली निधी आणि सदस्यांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# ‘काँग्रेस’मधील अंतर्गत वादाचे कारण ‘वेगळे’च?

## विशिष्ट शक्ती ‘हात’ धुवुन लागले मागे

## एकेकाळी ‘सत्ताधारी’ आता ‘केवळ दोन’ नगरसेवक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर काँग्रेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून उद्‌भवलेल्या अंतर्गत वादाचे कारण केवळ शहराध्यक्ष बदलाचे नाही तर अन्य काही वेगळेच कारण असल्याची चर्चा दस्तुरखुद्द काँग्रेसजनांमधून केली जात आहे. विशिष्ट शक्ती ‘हात’ धुवुन मागे लागल्याने काँग्रेस पक्ष दिवसागणिक रसातळाला जात असल्याचेही दबक्या आवाजात बोलले जात आहे.

सोलापूर शहर-जिल्हा ‘काँग्रेस’चा बालेकिल्ला मानला जायचा. पक्षातंर्गत कुरघोडी, हेवेदावे, गटतट यांसह राजकीय पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने शतकोत्तर वर्षांची परंपरा लाभलेला काँग्रेस पार्टी आज मरणासन्न अवस्थेत आहे. एकेकाळी ‘सत्ताधारी’ म्हणून



गणल्या जाणाऱ्या काँग्रेसला यंदा केवळ दोन नगरसेवकांवर समाधान मानावे लागले.

यंदाच्या सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १५ मध्ये उमेदवारी बदलाबदलीचा ‘सिलसिला’ सुरु होता. या प्रभागातून शहराध्यक्ष चेतन नरोटे वगळता काँग्रेसच्या अन्य तिघा उमेदवारांना पराभव चाखावा लागला. शहराध्यक्ष या नात्याने चेतन नरोटे यांनी अन्य प्रभागाकडे साफ दुर्लक्ष केल्याने या निवडणुकीत काँग्रेसला भुईसपाट व्हावे लागले, अशीही चर्चा होत आहे.

काँग्रेसचे माजी आमदार विश्वनाथ चाकोते, माजी महापौर आरिफ शेख यांनी नुकताच प्रसारमाध्यमांशी बोलताना शहराध्यक्ष तथा नगरसेवक चेतन नरोटे यांनी विरोधकांशी कशी हातमिळवणी केली होती? याबाबत पुरावे गोळा करीत असल्याचे सांगत ‘शाब्दिक हल्ला’ चढविला. त्यावर चेतन नरोटे यांनी ‘आपल्या स्टाईल’ने उत्तर द्यायला मागेपुढे पाहिले नव्हते, याकडेही लक्ष वेधले जात आहे.शहर काँग्रेसमध्ये सुरु असलेल्या अंतर्गत वादाविषयी उदाहरण देताना एका निष्ठावंत कार्यकर्त्याने नांव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, आपल्या घरात आग लागली तर ती आग फक्त आपलेच घर जाळते असे नाही तर शेजाऱ्याच्याही घराला नुकसान पोहचू शकते. आपल्याबरोबर आपल्याच पक्षातील इतरांना याचा फटका बसतो. यात विरोधी पक्षाचा फायदा होतो.

## प्रा.करजगीकर, नल्लामंदू यांना फख्रे-मिल्लत पुरस्कार





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

उर्दू मराठीचे लेखक व ज्येष्ठ साहित्यिक व एसएसए उर्दू हायस्कूल व ज्यु. कॉलेजचे निवृत प्राध्यपक बाबूलाल हुसेन साब करजगीकर ऊर्फ बीएच करजगीकर आणि उर्दू मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार अय्यूब अहमद नल्लामंदू यांना पुणेच्या संदन साहित्य मंडळ व बीएचएस नोबल सेवा फौंडेशनच्या वतीने फख्रे-मिल्लत जीवन गैरव पुरस्कार जाहिर करण्यात आले आहे. पुरस्कार १५ फेब्रुवारी पुणे येथे होणाऱ्या तिसरे स्पंदन बहुभाषिक साहित्य संमेलनात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती फौंडेशनच्या वतीने अनिसा सिकंदर शेख , इंतेखाब फराश, बशीर काजी यांनी दिली आहे व वेलकम गार्डन कोंढवा यथे होणारे तिसरे स्पंदन बहुभाषिक साहित्य संमेलनात सर्वांनी उपस्थित रहावे.

## डॉ.एस.राजशेखर यांनी स्वीकारले अक्कलकोटचे निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ फेब्रुवारी -**

जगविख्यात ऑर्थोपेडिक सर्जन आणि शल्य संशोधक डॉक्टर एस राजशेखरन हे लवकरच श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोट येथे येण्याची शक्यता आहे.

जागतिक शल्य विशारद आणि आर्थोपेडिक सर्जन मधील पहिल्या दहा क्रमवारीतील डॉ. एस राजशेखरन हे सर्जन असून ते कोईमतूर येथील गंगा हॉस्पिटलचे प्रमुख संचालक आहेत. नुकतेच त्यांना पुणे येथे लता - वैद्यक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री जन्मेजयराजे राजे विजयसिंह राजे भोसले यांनी त्यांना अक्कलकोट येथील स्वामी समर्थांचे मंदिर त्यांचे आध्यात्मिक अनुभूती , सांप्रदाय आणि अन्नछत्र मंडळाचे कार्य याबद्दल थोडक्यात माहिती दिली आणि अक्कलकोटला येण्याचे निमंत्रण दिले.

एस राजशेखर यांनी या



अध्यात्मिक आणि सामाजिक सेवेबद्दल अतिव आनंद व्यक्त केला आणि अक्कलकोटला येऊन हे सर्व काही प्रत्यक्ष पाहण्याचे निमंत्रण स्वीकारले.

यावेळी लता मंगेशकर चारिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष आणि ज्यष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर , डॉ. धनंजय केळकर , एमआयटीचे प्रमुख प्रा .विश्वनाथ कराड, पंडित सुरेश तळवलकर , पंडित शंकर अभ्यंकर आदी मान्यवर उपस्थित होते. अक्कलकोट अन्नछत्र मंडळाच्या वतीने या सर्वांचा स्वामींचे महा वस्त्र , छत्रपती शिवरायांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

> लता वैद्यक पुरस्काराच्या व्यासपीठावरून राजशेखरन यांनी,’ नव्या हॉस्पिटल्सना केवळ पंचतारांकित सुविधा म्हणून न पाहता सर्वसामान्य गरीब लोकांकरिता अत्यंत कमी शुल्का मधील सुविधा केंद्र म्हणून तयार करावे’, असे आवाहन केले होते. त्या कार्यक्रमाला मी एक प्रमुख निमंत्रित होतो. मला त्यांचे विचार आवडले आणि अशा पद्धतीच्या डॉक्टरांची, संशोधकांची सर्वसामान्य स्वामी भक्तांच्या आरोग्य अनुभूतीसाठी जरुरी आहे. म्हणून मी त्यांना अक्कलकोटचे निमंत्रण दिले. भविष्यामध्ये राज्यभरातील स्वामी भक्तांसाठी डॉ. राजशेखर यांच्या माध्यमातून काही मोठे संकल्प आम्ही सोडले आहे
>
> **- जन्मेजयराजे राजे विजयसिंह राजे भोसले**
> **संस्थापक अध्यक्ष, अन्नछत्र मंडळ . अक्कलकोट**

## इस्त्राईल येथील शेती अभ्यास दौऱ्यासाठी बिराजदार यांची निवड

**दक्षिण सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**



निंबर्गी येथील प्रगतशील शेतकरी गंगाधर प्रफुल्लचंद्र बिराजदार यांची महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने आयोजित इस्त्राईल आंतरराष्ट्रीय शेती अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. ९ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत १० दिवसाचा हा दौरा असणार आहे. महाराष्ट्रातून १७ शेतकरी व ३ कृषी अधिकारी असे २० जणांचा या दौऱ्यात समावेश आहे. या दौऱ्यातंर्गत तेल अविव, होल्कॅनिक सेंटर, रिशोन लेझीऑन, मशाव आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र, डेड सी, ऋखछ्ज गॅलोली येथे रोबोटीक शेती, रमत निगेव येथील अत्याधुनिक ड्रीपसिंचन प्रणाली आदी तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

# तांदळाच्या बाजाराला सुगीचे दिवस

## विक्रमी आवक; प्रति किलो ४ ते ५ रुपयांची वाढ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

यंदाचा तांदळाचा हंगाम बाजारासाठी उत्साहवर्धक ठरत आहे. विक्रमी उत्पादन आणि मोठ्या प्रमाणातील आवक असूनही निर्यातीत झालेल्या वाढीमुळे तांदळाच्या दरात प्रति किलो ४ ते ५ रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे. विशेषतः सुगंधी तांदळाला देशांतर्गत व परदेशी बाजारातून वाढती मागणी असल्याने या प्रकारातील दर आधीच तेजीत आहेत. चालू वर्षी तांदळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले असून, देशांतर्गत वापरासोबत आफ्रिका, युरोप तसेच आशियाई देशांकडे निर्यात वाढली आहे. परिणामी बाजारात दर स्थिर राहताना अल्पशी वाढ झाल्याचे चित्र आहे. यंदा पहिल्यांदाच निर्यातदारांकडून थेट तांदळाच्या उपलब्धतेबाबत चौकशी सुरू झाल्याने बाजारातील व्यवहारांना गती मिळाली आहे. कोलम तांदळाच्या विविध प्रकारांची रेलचेल बाजार समितीमध्ये उपलब्ध झाली आहे. वाडा व लचकारी कोलम हे स्टीम, अब्बाहुजूर, नूरजहान अशा



विविध व्यापारी नावांखाली विक्रीस उपलब्ध आहेत. घरगुती वापरासाठी वार्षिक खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी बाजारात भरपूर पर्याय उपलब्ध झाले आहेत. यंदा आवक भरपूर आहे, पण निर्यात वाढल्याने दर टिकून आहेत. ग्राहकांसाठी अनेक प्रकार उपलब्ध झाले आहेत, असे तांदळाचे व्यापारी कमलेश संकलेचा यांनी सांगितले.

**पारंपरिक बासमती दुर्मिळ**

सुगंधी तांदळाच्या बाबतीत मात्र पारंपरिक बासमती तांदूळ दुर्मिळ होत चालला आहे. त्याऐवजी ११२१, १५०९, १४०१, १७१८ हे संशोधित वाण मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाले आहेत. हे वाण दिसायला लांबट व आकर्षक असले, तरी पारंपरिक बासमतीचा नैसर्गिक सुगंध त्यामध्ये तुलनेने कमी असल्याचे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे शुद्ध, पारंपरिक सुगंधी बासमती मिळणे ग्राहकांसाठी आव्हानात्मक ठरत आहे.

**तांदूळ महोत्सवाची अपेक्षा**

मार्केट यार्डात विविध प्रकारची आवक वाढल्याने तांदूळ महोत्सव आयोजित करण्याची अपेक्षा नागरिक व व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. बाजार समितीचे सभापती तथा माजी आमदार दिलीप माने यांनी यापूर्वी आंबा महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले होते. त्याच धर्तीवर नागरिकांना विविध प्रकार प्रत्यक्ष पाहून तांदूळ खरेदी करता यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

**शेतकरी-व्यापाऱ्यांना दिलासा**

आवक भरपूर असतानाही दरात झालेली मर्यादित वाढ शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी दिलासादायक ठरली आहे. पाडव्यापर्यंत तांदूळ खरेदीचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

| तांदळाचे दर (प्रति किलो रुपये) | |
|---|---|
| आंबे मोहोर | ११५ ते १२० |
| वाडा, लचकारी कोलम | ५५ ते ६० |
| एचएमटी | ५० ते ५५ |
| बासमती | ७५ ते ८५ |
| इंद्रायणी | ५५ ते ६५ |

# ‘गण गण गणात बोते’चा गजर; सोरेगावमध्ये भक्तीचा महोत्सव

## श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

सोरेगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरात महाराजांचा १४८ वा प्रकट दिन सोहळा भक्तिभावात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मंदिर परिसरात गेल्या तीन दिवसांपासून विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून परिसर भक्तीमय झालेला दिसून आला आहे. यावेळी आकर्षक आणि सुवासिक फुलांनी मंदिर परिसर सजावट केल्याने चैतन्याचे आणि प्रसन्नतेचे वातावरण पसरले होते.

दरम्यान, प्रकट दिनानिमित्त तीन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात श्री गजानन विजय ग्रंथाचे अखंड पारायण, पालखी प्रदक्षिणा, स्वरसंध्या तसेच भजन-कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता. यावेळी पहाटेपासूनच मंदिरात भक्तांची गर्दी पाहायला मिळत असून महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. प्रकट दिनाच्या दिवशी पहाटे तीन वाजता मंगलवाद्यांच्या गजरात कार्यक्रमांना सुरुवात





झाली. यानंतर भूपाळी, काकड आरती, अभिषेक व गुलाल कार्यक्रम भक्तिभावात पार पडला.

सकाळच्या आरतीनंतर भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दिवसभर मंदिरात धार्मिक विधी सुरू असून वातावरण भक्तिरसाने ओथंबले आहे. सायंकाळी ५.३० वाजता श्री गजानन महाराजांची भव्य पालखी प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. फुलांनी सजवलेली पालखी, ढोल-ताशांचा गजर आणि भाविकांचा सहभाग यामुळे प्रदक्षिणेला विशेष शोभा येणार आहे. या पालखी प्रदक्षिणेसाठी परिसरात विशेष तयारी करण्यात आली आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत मंदिर समितीच्या वतीने सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक तरुणांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून हा उपक्रम भाविकांकडून कौतुकास पात्र ठरत आहे.

या सोहळ्यानिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते. सर्व भाविकांनी धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाचा लाभ घेतल्याचे मंदिर समितीचे अध्यक्ष गुरुलिंग कान्नूरकर यांनी सांगितले. शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षिततेसाठी स्वयंसेवक व समिती सदस्य परिश्रम घेतले. श्री गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रकट दिनानिमित्त सोरेगावमध्ये साजरा होणारा हा सोहळा भक्ती, सेवा आणि सामाजिक जाणीवेचे सुंदर दर्शन घडवत असून भाविकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरत आहे.

## महत्वाचे...

### गावात थांबले असता दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

गावात थांबले असता एकास दगडाने मारहाण केल्याची घटना घडली. संगप्पा कलप्पा पुजारी (वय-४०, रा.नवदगिरी, ता.अक्कलकोट) असे यातील जखमीचे नाव आहे. संगप्पा पुजारी हे दि.७ फेब्रुवारी रोजी गावातील लिंगराज मंदिराजवळ थांबले असता जेटप्पा पुजारी यांनी दगडाने मारहाण केल्याने त्यांना डोक्यास जखम झाले. अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी त्यांचा भाऊ यल्लप्पा पुजारी यांनी सोलापुरातील शासकीय रुणालयात त्यांना दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत याची नोंद करण्यात आली

### राहत्या घराजवळ केली मारहाण

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

राहत्या घराजवळ एकास चार जणांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. अंकुश रामसिंग रोशीनवाले (वय-३०, रा.लोधी गल्ली, सोलापूर) हे घराजवळ थांबले असता अज्ञात चार जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याने त्यांना सर्वांगास मुकामार लागल्याने ते स्वतः उपचारासाठी शासकीय रुणालय सोलापूर येथे दाखल झाले. याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकीवरील व्यक्ती ट्रकच्या चाकाखाली गेल्याने गंभीर जखमी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

दुचाकीवर डबलशीट जात असताना कंटेनर ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने एका व्यक्ती ट्रकच्या चाकाखाली गेल्याने उजव्या हातास व उजव्या पायास गंभीर जखम झाली. उमेश श्रीमंत जोडमोटे (वय-३५, रा.शिवाजीनगर, बाळे, सोलापूर) हे दि.८ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथून शिवाजीनगर बाळेकडे दुचाकी वाहनाने डबलशीट जात असताना जुना पुना नाका येथील ब्रिजवर २२ चाकी कंटेनर ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने त्यात ट्रकच्या चाकाखाली गेल्याने उजव्या हातात व उजव्या पायास गंभीर जखम झाली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुणालय येथे मुलगा शिवराज जोडमोटे यांनी दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत याची नोंद करण्यात आली.

### पैसे देण्याघेण्यावरुन मारहाण

**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

पैसे देण्याघेण्याच्या कारणावरुन दोघांना कोयत्याने, लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. नागनाथ वैरागकर यांनी केलेल्या या मारहाणीत सुधाकर शिवराज कुंभार (वय-३५), नीलाबाई शिवराम कुंभार (वय-५५) हे जखमी झाले असून त्यांच्यावर नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यांना मधुकर गायकवाड यांनी सोलापुरातील सिव्हील हॉस्पीटल येथे पुढील उपचारासाठी दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत याची नोंद करण्यात आली.

### खाद्यतेल फसवणूक प्रकरणी महिलेस अटकपूर्व जामीन

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

पैसे देवूनही खाद्यतेल न पुरविता फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या एका महिलेला सोलापूर जिल्हा प्रमुख न्यायाधीश मनोज शर्मा यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. मुंबई येथील डीजी एंटरप्राइजेसच्या प्रोप्राईटर गीता देविदास गडकरी (वय-५६, ता.चांदगड, जि.कोल्हापूर) असे त्या महिलेचे नाव आहे. अक्कलकोट येथील व्यापारी विनीत जयप्रकाश राठोड यांनी डीजी एंटरप्राइजेस मुंबई यांच्याकडून कमी दरात तेल मिळविण्यासाठी ब्रोकर यांच्यामार्फत १५ लाख रुपये खात्यामध्ये भरले होते. मात्र पैसे देऊनही खाद्यतेल दिले गेले नाही. याबाबत राठोड यांनी अक्कलकोट ग्रामीण उत्तर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. आरोपीच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन जिल्हा न्यायाधीश यांनी त्या महिलेस १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर आणि पोलिस ठाण्यात हजेरीच्या अटीवर अटकपूर्व जामीन मंजूर केला. यात सरकार पक्षातर्फे अ‍ॅड. आनंद कुर्डुकर तर आरोपीतर्फे अ‍ॅड.सचिन इंगळगी, अ‍ॅड. जी.एस.बिराजदार यांनी काम पाहिले.

### वृध्दास लाथाबुक्क्याने, काठीने मारहाण

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

राहत्या घराजवळ एका वृध्दास काठीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा येथे घडली. गंगाराम जयराम जंबाले वय ७० राहणार सलगर खुर्द, मंगळवेढा सोलापूर याला ७ फेब्रुवारी रोजी राहत्या घराजवळ विनाकारण बाबुराव जंबाले यांनी काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याने त्यांना डोक्यात, सर्वांगास मुका मार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना मंगळवेढा येथे दाखल करण्यात आले होते तेथून शिफारशीने पुढील उपचारासाठी दि.८ फेब्रुवारी रोजी शासकीय रुणालय सोलापूर येथे नातू स्वप्नील जंबाले यांनी दाखल केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# रस्ता अनुदानाला जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता

## महापालिका व नगरपरिषद निधीसाठी जिल्हास्तरीय समिती पुनर्गठित

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

राज्यातील महापालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींना देण्यात येणाऱ्या मोटार वाहन कराच्या अभिहस्तांकीत रक्कमेतून मंजूर होणाऱ्या रस्ता अनुदान योजनेंतर्गत विकास कामांना आता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडून प्रशासकीय मान्यता दिली जाणार आहे. निधी उपलब्धतेचे नियोजन, निर्णय प्रक्रियेत सुसूत्रता व गती येण्यासाठी शासनाने संबंधित समितीचे पुनर्गठन केले आहे.

यापूर्वी महापालिकांच्या हद्दीतील कामांसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती कार्यरत होती, तर नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रातील कामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती होती. आता मात्र महापालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींमधील सर्व रस्ता अनुदान कामांसाठी एकाच जिल्हास्तरीय समितीची रचना करण्यात आली आहे.या बदलामुळे रस्ता विकास कामांना वेळेत मान्यता मिळून प्रत्यक्ष कामे लवकर सुरू होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**समितीची रचना**

या नव्याने पुनर्गठित समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असणार आहेत. कार्यान्वयन यंत्रणेचा सक्षम अधिकारी समितीचा सदस्य असणार असून, संबंधित महापालिकेचे आयुक्त किंवा नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. या समितीमार्फत तांत्रिक मान्यता मिळालेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येणार आहे.

**रस्ता अनुदानाची योजना**

मागील आर्थिक वर्षात राज्यात संकलित झालेल्या मोटार वाहन कराच्या दहा टक्के रक्कम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना रस्ता विकासासाठी वितरित केली जाते. ही रक्कम 'सर्वसाधारण रस्ता अनुदान' व 'विशेष रस्ता अनुदान' अशा दोन प्रकारांत दिली जाते. या निधीतून शहरांतील रस्ते, अंतर्गत दळणवळण सुधारणा, डांबरीकरण, कॉंक्रिटीकरण आदी विकास कामे केली जातात.

**निर्णय प्रक्रियेला गती**

महापालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींच्या हद्दीतील विकास कामांना शासनाकडून निधी मंजूर होऊन तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यासाठी यापूर्वी वेगवेगळ्या समित्यांमुळे विलंब होत होता. आता एकाच जिल्हास्तरीय समितीमुळे निर्णय प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व गतिमान होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी १३५१

**जैसा घरीं आपुलां । वानिवसें वन्ही लागला ।**
**तो आणिकांही प्रज्वळिला । जाळूनि घाली ।।**

वाईट हे फक्त ज्यांनी वाईट केले त्यांच्यासाठी व ज्यांचे वाईट झाले त्यांच्यासाठीच वाईट असते असे नाही तर त्यांच्या सहवासात येणाऱ्यांसाठी सुध्दा ते वाईटच असते. युध्दात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांचीच हानी होते असे नाही तर त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचीही हानी होते. त्यामुळे हे युध्दच नको या विचारा पर्यन्त अर्जुन येऊन पोहोचला आहे. एखाद्याला वाटते की मी वाटेट्ल ते करीन, ईतरांना माझ्याशी काय देणे घेणे आहे किंवा आम्ही वाट्टेल तसे वागू तुम्हाला आमच्याशी काय देणे घेणे आहे. असे म्हणून चालत नाही. आपण समाजाचे एक अविभाज्य घटक आहोत. आपल्या चांगल्या-वाईट वागण्याचा समाजावर किंवा आपल्या सहवासात येणाऱ्यांवर चांगला-वाईट परिणाम होत असतो. म्हणून वाट्टेल तसे वागण्याचा अधिकार कोणालाही नसतो. आपल्या वर्तनाचा ईतरांवर दुष्परिणाम होणार नाही याची जबाबदारी आपण पाळलीच पाहिजे. आपल्या घरातील वादाचा, तंटयाचा, दुष्कृत्याचा विपरीत परीणाम शेजाऱ्यावर सुध्दा होऊ शकतो. म्हणून आपण आपल्या घरात वागत असतांना ईतरांचाही विचार केला पाहिजे.




या युध्दाचा विपरित परीणाम केवळ कौरव-पांडवावर होणार नाही तर तो ईतरावरही मोठया प्रमाणावर होईल. हे युध्द घरातल्या घरात असले तरी शेजाऱ्यांनाही त्याच्या दुष्परिणामाला सामोरे जावे लागणार आहे. हे सांगतांना अर्जुन म्हणतो, अचानकपणे आपल्या घरात आग लागली तर ती आग फक्त आपलेच घर जाळते असे नाही तर शेजाऱ्याच्याही घराला नुकसान पोहचू शकते. म्हणून या युध्दाची आग आपल्याही घरात नको व त्याची झळ शेजाऱ्यांनाही नको. याकरिता हे युध्दच नको असे अर्जुन म्हणतो. अनेक लोक घरात मोठयाने टेप, टि.व्ही. लावतात, धिंगाना, गोंधळ घालतात, घरात मोठयाने वाद करतात. याचा विपरीत परीणाम शेजाऱ्यांवर होत असेल याचा विचार त्यांच्या मनात येत नाही. नवरा-बायकोंची, सासू सुनेची, भावाभावांची भांडणे अनेक घरात ईतक्या मोठयाने होतात की शेजाऱ्यांना जीवन जगणे कठीण होते. आपल्या घरात सुध्दा आपण बेजबाबदारपणे वागणे आपल्यासाठीही हितावह नसते व शेजाऱ्यांसाठी सुध्दा हितावह नसते. म्हणून आपण आपल्या वर्तनाचा विचार करायलाच हवा. मला काय करायचे कोणावरुन, इतरांचे कांहीही होऊ जा, असे म्हणणे चुकीचे असते. शेजाऱ्यांना, आपल्या सहवासातील लोकांना आपले वर्तन आवडले पाहिजे. आपल्याकडून ते काही घेऊ शकतील व आपणही त्यांच्याकडून काही घेऊ शकू असे वर्तन असावे. आपले वर्तन आवडले नाही, तर किमान छी कसेतरीच वागतात, असे कोणावर म्हणण्याची वेळ येणार नाही, असे तरी वागावे. अशा वर्तनासाठी धनाची नाही तर केवळ सकारात्मक मनाची आवश्यकता असते. या ओव्यांच्या माध्यमातून आपण माऊलींच्या सहवासात राहिलो तर निश्चित आपले वर्तन सर्वांसाठी आनंदलहरी निर्माण होण्यास मदतीचे होईल, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## मद्रेजवळ भीषण अपघात; मोबाईल कॉलवरून मृताची ओळख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मद्रे-आहेरवाडी मार्गावरील कोरे वस्ती परिसरात शुक्रवारी दि. ७ फेब्रुवारी रोजी पहाटे झालेल्या भीषण दुचाकी अपघातात २५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सोमनाथ हिरू चव्हाण वय २५ (रा. मद्रे, ता. दक्षिण सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे.



सोमनाथ चव्हाण हे गुरुवारी रात्री दुचाकीवरून घरी परतत होते. दरम्यान मद्रे-आहेरवाडी रस्त्यावरील धोकादायक वळणावर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने त्यांचा भीषण अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अपघात इतका गंभीर होता की मृत तरुणाचा चेहरा पूर्णपणे विद्रूप झाल्याने सुरुवातीला त्यांची ओळख पटविणे कठीण झाले. दरम्यान, मृताच्या खिशात असलेल्या मोबाईलवर आलेल्या कॉलमुळे ओळख पटण्यास मदत झाली. मद्रे गावचे पोलीस पाटील अनिल हक्के यांनी मोबाईलवर संपर्क साधून खात्री केल्यानंतर मृताची ओळख सोमनाथ चव्हाण अशी निश्चित करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल एस. व्ही. कुवर व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी अवस्थेत सोमनाथ यांना सोलापूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्यांना मृत घोषित केले. सोमनाथ चव्हाण यांच्या पश्चात आई-वडील, बहीण व भाऊ असा परिवार असून त्यांच्या अकाली मृत्यूने मद्रे गावावर शोककळा पसरली आहे.

## ज्ञानप्रबोधिनीतर्फे वीरव्रत साहस दौरा

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

युवकांमध्ये धैर्य, आत्मविश्वास, निर्णयक्षमता व नेतृत्वगुण घडविण्याच्या उद्देशाने ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने युवकांसाठी विशेष 'वीरव्रत' साहस दौरा आयोजित केला आहे. या १० दिवसांच्या दौऱ्यात शिमला येथे आयोजित साहस शिबिरात युवकांना रॉक क्लाइंबिंग, रिव्हर क्रॉसिंग, रॅपेलिंग, ट्रेकिंग व रॉक स्क्रॅम्बलिंगचे प्रशिक्षण दिले जाईल. युवकांना शिमला, दिल्ली, मथुरा व आग्रा शहरास भेट देता येईल. तसेच नवीन संसद भवन, इंडिया गेट, लोटस टेंपल, श्रीकृष्ण जन्म स्थळ व ताजमहालला भेट देता येईल. हा साहस दौरा २१ ते ३० एप्रिल दरम्यान होईल. त्यासाठी मंगळवार (ता.१०) पर्यंत करता येईल. रेल्वे आरक्षण मर्यादित असल्याने इच्छुक युवकांनी तत्काळ नोंदणी करावी. त्यासाठी श्रेयस जहागीरदार (९४०५६४२२०३) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## चित्रकला इंटरमिजिएट व एलिमेंट्री परीक्षेत बिटला प्रशालेचा १०० टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित विडी घरकुल भागातील मातोश्री जनाबाई बिटला प्रशालेतील विद्यार्थ्यांनी चित्रकला इंटरमिजिएट व एलिमेंट्री परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली.

महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एलिमेंट्री व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत प्रशालेतील एकूण २७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामध्ये निहारिका अंकम, नेहारिका मादगुंडी, श्रावणी मादास, वेनेला चिंताकिंदी, प्रसन्ना मामड्याल व श्रद्धा आडम या विद्यार्थिनीं नी ए श्रेणी घेऊन परीक्षेत यश संपादन केले.

तर इतर विद्यार्थ्यांनी बी श्रेणी घेऊन या परीक्षेत यश मिळविले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, मुख्याध्यापिका शारदा गोरट्याल व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६

विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७

संवत्सर - विश्वावसु

मास - पौष. अष्टमी

ऋतु - हेमंत ।

नक्षत्र- विशाखा (अहोरात्र)

योग - वृध्दि (२४.५०)

करण - बालव (१८.११)

राहू काल : सोमवार : स. ७.३० ते ९.००

दिनविशेष : कालाष्टमी.

१७१४: छत्रपती शाहू महाराज (सातारा) आणि सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यात वळवंड (लोणावळा) येथे तह झाला

१९३१: महादेव विठ्ठल काळे यांनी 'आत्मोद्धार' नावाचे पाक्षिक सुरू केले

१८८०: सत्यशोधक समाजाच्या संस्काराने लावलेली लग्ने कायदेशीर असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला, ज्यात ब्राह्मणतर पौरोहित्य मान्य झाले.

## बुरुड समाजातील नूतन नगरसेविकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर बुरुड समाज व महिला आघाडीच्यावतीने समाजातील नूतन नगसेविकांचा व विविध मान्यवरांचा सत्कार समारंभ शिवस्मारक सभागृह येथे पार पडला.

कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती नूतन नगरसेविका, महिला बालकल्याण विकास समिती सभापती तुळजापूरचे ज्योति सावंत, महाराष्ट्रातून बुरुड समाजातील कमी वयातील पहिली नगरसेविका मृदूला सूर्यवंशी, अकलूज व सोलापूर शहरामधून पहिली महिला डॉक्टर होण्याचा बहुमान मिळविलेल्या डॉ. स्नेहा वडतिले आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सोलापूर शहर बुरुड समाज नूतन महिला आघाडी पदाधिकाऱ्यांच्या देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या बेळगांव्या नगरसेविका तथा अनुसूचित जमाती विकास महामंडळ कर्नाटक, सदस्या मेणका कोरडे तर कार्याक्रमाचे अध्यक्षस्थानी सोलापूर शहर बुरुड समाजाचे अध्यक्ष सुर्यकांत शेंद्रे व ज्योती वडतिले हे होते. याप्रसंगी समाजाचे अध्यक्ष सुर्यकांत शेंद्रे, उपाध्यक्ष विठ्ठल साळुंके, सरचिटणीस नवनाथ सुरवसे व अकलूज बुरुड समाजाचे शहर अध्यक्ष महेश सूर्यवंशी आदिंनी विचार व्यक्त केले.



सूत्रसंचालन स्नेहा साळुंके, पाहुण्यांचे स्वागत दिपाली सूर्यवंशी, प्रास्ताविक माधुरी सुरवसे यांनी केले व शेवटी आभार सुरेखा शेंद्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजाचे पदाधिकारी शिवाजी जतकर, अमर सुरवसे, पंडीत वडतिले, अरुण साळुंके, दरिबा वडतिले, कृष्णकुमार कुकडे, विष्णू साळुंके, मारुती साळुंके, नितीन वडतिले, युवराज सुरवसे, योगेश वडतिले, संतोष वडतिले, सागर रोहिटे, सदाशिव वडतिले, प्रगती शेंद्रे, रेणुका शेंद्रे, बायडा वडतिले, पूजा रोहिटे, कविता वडतिले, शोभा वडतिले, लक्ष्मी वडतिले, सायली वडतिले, सुनिता वडतिले मोनिका रोहिटे, संजना रोहिटे, अमृता सुरवसे, कांचना सुरवसे आदी पदाधिकाऱ्यांना परिश्रम घेतले.



## जामगांव येथे एकता महिला मंचच्या वतीने रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**वैराग, दि. ८ फेब्रुवारी-**

जामगांव (ता. बार्शी): येथील एकता महिला मंचच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. एकता महिला मंचच्या सदस्यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. पल्लवी भालेराव, मानसी भालेराव, मिलन भालेराव, विजया गायकवाड, कांता गायकवाड,लक्ष्मी भालेराव, वंदना पाचकुडवे, सरस्वती पाचकुडवे यांसह गावातील इतर महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## विहिरीत पडलेल्या दोन घोणस सापांना मिळाले जीवदान

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

३० फूट खोल विहिरीमध्ये दोन घोणस साप साधारण तीन महिन्यापूर्वी कामती येथील जामगाव बुद्रुक येथे पडले होते. येथील शेतकरी तानाजी बेलछेत्रे यांच्या शेतात असलेल्या विहिरीत दोन साप पडले होते. तानाजी यांचे चुलत बंधू विजयकुमार बेलछेत्रे यांच्याशी संपर्क केला. विजयकुमार यांनी WCS चे सदस्य संतोष धाकपाडे यांना फोन करून माहिती दिली.



बुधवार दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास WCS चे सदस्य पोहचल्यानंतर त्या विहिरीमध्ये सदस्यांना ते साप दिसून आले. विहीर साधारण ३० फूट खोल आणि ५० फूट रुंद होती. साधारण तीन तासाच्या अथक प्रयत्नानंतर त्या दोन घोणस प्रजाती सापांना विहिरी मधून बाहेर काढले. त्या दोन सापांना बाहेर काढल्यानंतर तानाजी बेलछेत्रे यांनी डब्ल्यूसीएएस टीमचे आभार मानले. या बचाव कार्यात तानाजी बेलछेत्रे, संदीप बेलछेत्रे, तसेच डब्ल्यूसीएएसचे विकी चराटे, प्रवीण गावडे, सुरेश क्षीरसागर आणि संतोष धाकपाडे यांनी सहकार्य केले.

## राजेंद्र भोसले यांना ललित साहित्य पुरस्कार जाहीर

### २६ एप्रिल २०२६ रोजी भुसावळ येथे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

स्मृतिशेष डी. एस. घोडेस्वार यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या परिवाराकडून दिला जाणारा आशादिप राज्यस्तरीय उत्कृष्ट राज्यस्तरीय ललित साहित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार - २०२६ सोलापूरचे लेखक राजेंद्र भोसले यांच्या 'घालू गवसणी आकाशाला' या ललितलेख संग्रहास जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी भुसावळ येथे होत आहे.


या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जळगावचे प्रा. जतीन मेढे, मिलिंद बागुल, एरंडोलचे प्रा. वा. ना. आंधळे, पाचोराचे प्रा. व. सु. वले, आनंदा पाटील उपस्थित राहणार आहेत. यावेळी बाप या विषयावर राज्यस्तरीय कवीसंमेलनही होणार आहे. हे पुरस्कार दरवर्षी कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, आत्मचरित्र, ललित/वैचारिक, संपादन अशा विविध साहित्यप्रकारांतील साहित्यकृतींना देण्यात येते. सर्व साहित्यप्रकारांत ६५ साहित्यकृती प्राप्त झाल्या होत्या. सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन पुरस्कारप्राप्त साहित्यिकांना यावेळी गौरविण्यात येणार आहे. राजेंद्र भोसले यांचा 'घालू गवसणी आकाशाला' हा पहिलाच ललिलिलेख संग्रह असून त्यांचे हे १५ वे पुस्तक आहे. यापूर्वी त्यांची कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, संपादन, नाटक अशा विविध वाङ्मयप्रकारांत पुस्तके प्रकाशित आहेत. यापूर्वी त्यांना २० राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## सृष्टी नगरात विघ्नहर्ता गणेश मंदिराची उभारणी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील अक्कलकोट रोडवरील सृष्टी नगरात विघ्नहर्ता गणेश मंदिराचा कळसारोहण सोहळा आणि गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम पडित विष्णुमुदर्शना जिल्हा यांच्या नेतृत्वाखाली झाला.

यानिमित्त ध्वजारोहण, देवता स्थापन, अखंडदीप आराधना. होम हवन. महाभोग. महाआरती असे विविध कार्यक्रम पार पडले. यावेळी झालेल्या विविध धार्मिक कार्यक्रमास रघुनंदन कटारे, प्रवीण मुनकमपल्ली, भाग्येश उपाध्ये, उल्हास आडकी, प्रमोद जटला, अनिलकुमार घनाते, लक्ष्मीनारायण दंडगल, अंबादास दंडगल हे सपत्नीक उपस्थित होते.



## गोरक्षकांवर हल्ला; खाटीकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

गोरक्षकावर खाटीकाने थेट पोलिसांच्या समोर काठी व दगडांनी हल्ला केल्याची गंभीर घटना मोहोळ तालुक्यात घडली असून या प्रकरणी अखिल भारत कृषी गोसेवा संघ व गोरक्षकांच्या वतीने सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रीतम यावालकर यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

गाई व बैल कत्तलीसाठी आणून बांधून ठेवल्याची माहिती गोरक्षकांना मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ पोलिस ठाण्यात जाऊन पोलिसांच्या मदतीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र घटनास्थळी पोहोचताच संबंधित खाटीकाने (कसाई) गोरक्षकांवर काठी व दगडांनी प्राणघातक हल्ला केला. याच वेळी गोरक्षकांची गाडीही फोडण्यात आली. हे सर्व प्रकार पोलिसांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत घडले असताना देखील पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय घटनास्थळी कोणतेही गाई-बैल नव्हते, असा खोटा अहवाल पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांनी वरिष्ठांना दिल्याचा आरोप करत त्यांच्या निलंबनाची मागणीही करण्यात आली. या संपूर्ण प्रकारामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित कसाईविरुद्ध सरकारी कामात अडथळा कलम ३५३ अंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सदर प्रकरणात त्वरित व कठोर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी अखिल भारत कृषी गोसेवा संघाचे महाराष्ट्र सचिव सुधीर बहिरवाडे, गोसेवक अमित राऊत, शहर संघटक प्रसाद झेडंगे, गोरक्षक लतेश हिरवे, रुपेश बेलेराव व प्रमोद कारंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## 'ई-नाम'मधून मिळणार बाजार समित्यांना 30 लाखांचे अनुदान

### ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवरून होणार व्यवहार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी-**

शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी देशपातळीवर 'एक देश, एक बाजार' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. येत्या काळात राज्यातील सर्व निवडलेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील व्यवहार पूर्णपणे ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मद्वारे केले जाणार असून, यासाठी पणन विभागाने मार्गदर्शन सूचना जारी केल्या आहेत.

ई-नाम योजनेंतर्गत बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक नोंद, गुणवत्तेची शास्त्रशुद्ध तपासणी (असेईंग), ई-लिलाव प्रक्रिया, वजन, बिले तयार करणे, तसेच शेतकरी, व्यापारी व आडत्यांना देय रकमेचे ई-पेमेंट अशा सर्व प्रक्रिया डिजिटल पद्धतीने केल्या जातात. यामुळे व्यवहार अधिक पारदर्शक, वेगवान व विश्वासार्ह होणार आहेत. प्रति बाजार समितीस ३० लाखांचे अनुदान मिळणार आहे. ई-नामची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक संगणक साहित्य, असेईंग उपकरणे, वाय-फायसह इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाकडून प्रति बाजार समिती ३० लाख रुपये अनुदान दिले जाते. महाराष्ट्रातील १३३ कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा चार टप्प्यांत ई-नाममध्ये समावेश करण्यात आला असून, आणखी ४८ बाजार समित्यांचा समावेश करण्याचा प्रस्ताव २०२५ मध्ये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

**ई-नामसाठी आवश्यक अटी**

ई-नाम योजनेत सहभागी होण्यासाठी बाजार समितीची आर्थिक स्थिती चांगली असणे आवश्यक आहे. समिती तोट्यात नसावी, वार्षिक किमान ५ हजार मेट्रिक टनांपेक्षा अधिक शेतमालाची आवक असावी, तसेच बाजार समितीच्या आवारात जाहीर लिलाव पद्धतीने शेतमालाची विक्री होत असणे गरजेचे आहे

**शेतकऱ्यांना होणारे फायदे**

ई-नाममुळे शेतकऱ्यांना अनेक पातळ्यांवर लाभ होणार आहेत. शेतमालाचा लिलाव ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने स्पर्धात्मक दर मिळण्यास मदत होईल. शेतमालाची आवक व जावक नोंद, वजनाची बिले, तसेच देयकांची गणना ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. शेतमालाच्या गुणवत्तेची शास्त्रशुद्ध तपासणी होणार असल्याने योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकरी, व्यापारी व आडत्यांना ई-पेमेंटद्वारे थेट व वेळेत रक्कम मिळणार आहे.

**नोंदणीसाठी विशेष मोहीम**

ई-नाम योजनेची माहिती अधिकाधिक शेतकरी, व्यापारी, आडते, शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे. तसेच या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त घटकांची नोंदणी व्हावी, यासाठी ठोस कार्यवाही केली जाणार असल्याचे पणन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. ई-नाममुळे बाजार समित्यांचे कामकाज आधुनिक, पारदर्शक आणि शेतकरीकेंद्रित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बार्शीत शिवजयंतीनिमित्त घुमणार स्त्रीशक्तीचा हुंकार

## १९ फेब्रुवारीला 'एकता महिला मंच'ची बाईक रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.८ फेब्रुवारी-**

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बार्शी शहरात यंदाही 'एकता महिला मंच'च्या वतीने भव्य 'महिला बाईक रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी निघणाऱ्या या रॅलीतून महिला सक्षमीकरणाचा आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला जाणार असल्याची माहिती मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी दिली आहे.

**पारंपारिक वेशभूषा आणि भगवा माहोल**

दरवर्षीप्रमाणे यंदाही ही रॅली शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहे. रॅलीचा प्रारंभ शिवाजी कॉलेज येथून होऊन पांडे चौक येथे समारोप होईल. रॅलीचे मुख्य आकर्षण म्हणजे सहभागी महिलांचा पारंपारिक पोशाख असणार आहे. कपाळावर चंद्रकोर, डोक्याला फेटा आणि हातात भगवा झेंडा घेऊन शेकडो महिला दुचाकीवर स्वार होऊन शिवरायांच्या विचारांचा जागर करणार आहेत.

**मंचतर्फे विशेष सोय**

सहभागी होणाऱ्या सर्व महिला भगिनींसाठी एकता महिला मंचच्या वतीने फेटे बांधण्याची तसेच अल्पोपहाराची विशेष सोय करण्यात आली आहे. रॅलीमध्ये शिस्त राखली जावी आणि नियोजन अचूक व्हावे यासाठी काही नियमही आखून दिले आहेत. सहभागी महिलांनी स्वतःची दुचाकी आणणे आणि ती भगव्या ध्वजाने सुशोभित करणे अपेक्षित आहे.

**प्रमुख संदेश : महिला सुरक्षा आणि सामाजिक सक्षमीकरण**

या रॅलीच्या माध्यमातून केवळ शिवजयंती साजरी करणे हाच उद्देश नसून, समाजात महिलांचे स्थान आणि त्यांची शक्ती अधोरेखित करणे हा महत्त्वाचा उद्देश आहे. महिला आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत; त्या आत्मविश्वासाने आणि निर्भयपणे समाजाचे नेतृत्व करू शकतात, हा ठाम संदेश या रॅलीद्वारे संपूर्ण बार्शी तालुक्यात पोहोचवला जाणार आहे.नाव नोंदणीचे आवाहन: या भव्य रॅलीच्या नियोजनासाठी इच्छुकांनी आपली नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. बार्शी तालुक्यातील एकता महिला मंचच्या सर्व प्रमुख पदाधिकारी आणि सदस्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे.



नाव नोंदणीसाठी प्रभाकर क्षीरसागर यांच्या ७२१८३३८००९ या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## महत्वाचे...



### बहुजन शिक्षक महासंघाच्यावतीने त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्यावतीने त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी झाली. कार्यकामाच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर राज्य कोषाध्यक्ष नीलकंठ शिंगे, जिल्हा अध्यक्ष प्रा.युवराज भोसले, रामन्ना गायकवाड, राजेंद्र सोरटे, पाटील (वांगी), प्रफुल्ल जानराव, प्रिया कदम, महानंदा शिंदे, इत्यादीनी रमाईंच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस समाजभूषण रवी देवकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रफुल्ल जानराव यांनी केले तर स्वप्नजा कसबे यांनी आभार मानले. यावेळी महासंघाचे पुणे विभाग संपर्क प्रमुख दाऊत आतार, राष्ट्रीय चित्रकार विठ्ठल मोरे, आगतराव बनसोडे, सिद्धेश्वर भुरले, जी डी पाटील, शुभम इंगळे, भागवत देवकुळे, दादासाहेब कांबळे, नारायण काकेकर, ॲड. जितेंद्र राजगुरू, रोहित गायकवाड,एकोराम चौगुले, शिवानंद चौगुले, विजयकुमार गायकवाड, नीलकंठ अय्यर, सुनिल स्वामी, कविता कदम, पृथ्वी शिंदे, पिस्कीला गायकवाड, बसवराज गब्बूर उपस्थित होते.



### श्री सिद्धेश्वर देवस्थानच्यावतीने नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या वतीने आज सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचा औपचारिक सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष शिद्रामप्पा बमणे यांच्या हस्ते सिद्धरामेश्वरांची प्रतिमा देऊन महापौरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी देवस्थानचे इस्टेट सेक्रेटरी बाळासाहेब भोगडे, ऑफिस सेक्रेटरी नीलकंठप्पा कोनापुरे, अकाउंटंट सेक्रेटरी विश्वनाथ लब्बा तसेच विश्वस्त प्रभुराज महेंद्रग्रीकर उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना महापौर विनायक कोंड्याल यांनी श्री सिद्धेश्वर देवस्थानाशी संबंधित सर्व प्रलंबित व आवश्यक कामे प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी ग्वाही दिली.



### भावसार व्हिजनतर्फे गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त फळ वाटप

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

सोरेगाव येथील परमपूज्य संत श्री गजानन महाराज यांच्या पावन प्रकट दिनाचे औचित्य साधून भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलच्या माध्यमातून स संस्थेचे सचिव सागर पुकाळे यांचा सौजन्यातून सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी जपत फळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी अध्यक्ष सुशील महिंद्रकर, प्रभाकर कुसुमकर, आरती खमीतकर, किरण रणसुबे, दिपा उपरे, ज्योती झिंगाडे, ज्योती क्षीरसागर, द्वारकाधीश क्षीरसागर, अश्विन डोईजोडे, राजेश झिंगाडे, विलास कंकाळ, रवि वायचळ प्रकाश जवळकर, गणेश क्षीरसागर उपस्थित होते.



## आदर्श सैनिक स्कूलच्या नवीन इमारतीचा लोकार्पण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील आदर्श सैनिक स्कूलमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य, सुसज्ज व आधुनिक शैक्षणिक इमारतीचा लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.हा सोहळा शाळेच्या प्रगतीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून या इमारतीमुळे विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार, सुरक्षित व प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे.

याचे उद्घाटन पद्मश्री डॉ. प्रकाश बाबा आमटे व पद्मश्री डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षण, समाजसेवा व मानवतेसाठी केलेल्या त्यांच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना लाभावी, या हेतूने त्यांना या सोहळ्यास आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी विशेष आमंत्रित म्हणून डॉ. सोमनाथ रोडे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे व व्यवस्थापकीय संचालिका पूजा सुरवसे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन करण्यात आले व त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनावर आधारित रेखाटणे करून भेट स्वरूप दिले. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त, देशभक्ती आणि समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## वाणेवाडी शिवारात १२ वर्षीय विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या

### कुटुंबावर शोककळा, कारण अस्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यातील वाणेवाडी गावच्या शिवारात एका १२ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि. ०६ फेब्रुवारी २०२६) दुपारी उघडकीस आली. समर्थ नानासाहेब काळे (वय १२, रा. कुसळंब, ता. बार्शी) असे मृत बालकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समर्थ हा कुसळंब येथील शाळेत सहावीच्या वर्गात शिक्षण घेत होता. दि. ०६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास वाणेवाडी येथील शिवारात सुभाष सुब्राव लावंड यांच्या शेती गट क्रमांक १६१/१ मधील कडुलिंबाच्या झाडाला काळ्या-पांढऱ्या रंगाच्या सुती दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती नातेवाईकांकडून मिळताच कुटुंबीय घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, या प्रकरणी मृत मुलाचा काका भारत साधु काळे (वय ५२, रा. घारगाव, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात खबरी जबाब दिला आहे. समर्थ याने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेमुळे काळे कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

## सोरेगाव येथील एसआरपी कॅम्पमध्ये 'दक्षिण'ची मतमोजणी


### १९ फेऱ्यांमधून निकाल जाहीर होणार

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

दक्षिणमध्ये चुरशीने ५८ टक्के मतदान झाले असून त्याची मतमोजणी सोरेगाव येथील एसआरपी कॅम्प येथील शहीद राहुल शिंदे सभागृहात सकाळी १० वाजता सुरू होणार असून दुपारी ४ वाजेपर्यंत प्रत्येक जिल्हा परिषद गटासाठी तीन फेरीत मतमोजणी होणार असल्याची माहीती दक्षिणचे तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किरण जमदाडे यांनी दिली

सकाळी वाजता सकाळी १० वाजता बोरामणी जिल्हा परिषद गट गण व कासेगाव गणाची मोजणी करण्यात येणार आहे. १६ टेबलद्वारे १९ फेऱ्यांमधून निकाल जाहीर होणार आहे. कुंभारी जिल्हा परिषद गट, गण व धोत्री गणाची मोजणी ११ वाजता तीन फेरीत होणार आहे. बोरामणी गट, गण व होटगी गणासाठी सकाळी १२ वाजता चार फेऱ्यांमध्ये मोजणी करण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता हत्तूर गट,गण व औराद गणाची मोजणी तीन फेरीत होणार आहे.

सकाळी १० वाजता जिल्हा परिषद गटाचे तीन फेरीत मतमोजणी करून निकाल जाहीर होणार आहे. मतमोजणी प्रतिनिधींनी सकाळी १० वाजेपर्यंत सोरेगाव येथील मतमोजणी केंद्रावर उपस्थित राहावे. दुपारी ४ वाजेपर्यंत दक्षिणच्या सर्व जिल्हा परिषद गटांचे निकाल जाहीर करण्यात येणार आहे.



मंद्रूप जिल्हा परिषद गटासाठी दुपारी २ वाजता गट, गण व कंदलगाव गणाची मोजणी तीन टप्प्यात करण्यात होणार आहे. भंडारकवठे गट, गण व निंबर्गी गणासाठी दुपारी ३ वाजता मोजणा करण्यात येणार आहे.

## वृत्तपत्रातील पत्रलेखन हे लोकशाहीचे व्यासपीठ

### डॉ. श्रीकांत येळेगावकर; जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचाच्या वतीने दोन पुस्तकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

वृत्तपत्रातील संपादकीय लेख विचारांचा पाया घालतात, तर वाचकांचा पत्रव्यवहार हा समाजाशी थेट संवाद साधतो. पत्रलेखकांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाज जागृती करावी, कारण वृत्तपत्रातील विविध सदरे समाजातील प्रत्येक घटकासाठी अर्थपूर्ण योगदान देत असतात,असे प्रतिपादन डॉ.श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचच्या वतीने आयोजित फैय्याज शेख लिखित 'जनमत' आणि अरुण धुमाळ लिखित 'पत्र प्रबोधन' या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा लोकमान्य टिळक सभागृह येथे संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. येळेगावकर बोलत होते. कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी होते

यावेळी डॉ. सूर्यप्रकाश कोठे, महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख पद्माकर कुलकर्णी, वृत्तपत्र लेखक मंचचे कार्यवाह सुनील पुजारी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लेखक फैय्याज शेख व अरुण धुमाळ यांनी आपल्या मनोगतातून पुस्तकाच्या निर्मितीमागची भूमिका आणि पत्रलेखनाचा आपला प्रवास उपस्थितांसमोर मांडला. प्रास्ताविक कार्यवाह सुनील पुजारी यांनी केले, सूत्रसंचालन प्रेमचंद मेने यांनी तर आभार अशोक म्हमाने यांनी केले. या कार्यक्रमाला उद्योजक दत्ता सुरवसे, वसंत सावंत, प्रा. नरेंद्र काटीकर, कवी मारुती कटकधोड, राजेंद्र भोसले, प्रा. शिवाजी शिंदे, प्रा. शिवाजीराव देशमुख, डॉ.सचिन पुराणिक, ॲड. रफिक बागबान, ॲड. धनंजय माने, उस्मान जमादार,रियाज खैरदी, कवी गोविंद काळे, अय्युब नलाबंदु, वंदना कुलकर्णी, प्रा. धनंजय शहा, बाबा शेख उपस्थित होते.

## 'सिंहगड' मध्ये इन्व्हेस्टमेंट व व्हेंचर कॅपिटल फंडिंग संधींवर मार्गदर्शन सत्र

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एस.के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) येथील उद्योजकता विकास कक्ष व इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने एंजेल इन्व्हेस्टमेंट व व्हेंचर कॅपिटल फंडिंग संधी या विषयावर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन रोजी करण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून नंदकुमार दुपडे (प्रेरणादायी वक्ते व माजी तज्ज्ञ, एमसीइडी) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप संकल्पना, उद्योग उभारणीसाठी आवश्यक भांडवल, एंजेल गुंतवणूकदार व व्हेंचर कॅपिटल फंडिंग मिळविण्याच्या प्रक्रिया, तसेच व्यवसायातील संधी व आव्हाने याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत त्यांना उद्योजकतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य व आयआयसी अध्यक्ष, डॉ. स्वानंद जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. दत्तात्रय कोरके आयआयसी उपाध्यक्ष तसेच प्रा. महेश झाडे, प्रा. लक्ष्मीकांत जोशी व प्रा.प्रदीप व्यवहारे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्रीया जोशी व रियान बागवान यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी हे मार्गदर्शन सत्र यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले.

# संघसंस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म शके १८११, चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा रविवार दि. १ एप्रिल १८८९ रोजी रेवतीबाई व बळीराम या मात्या पित्याच्या पोटी आंध्र व महाराष्ट्र यांच्या सीमेवर असणाऱ्या निजामाबाद जिल्ह्यातील बोधन तालुक्यातील कंदकुर्ती या गावी झाला. मोगलाईत हिंदूंची होणारी उपेक्षा, छळवणूक व दारिद्र्य या तीन कारणांमुळे तेलंगणातून अनेक कुटुंबे नागपूरच्या आश्रयाला आली त्यातीलच एक कुटुंब म्हणजे हेडगेवार यांचे कुटुंब.**

केशव हा जन्मजात देशभक्त होता. अत्यंत संस्कारी वातावरणामध्ये केशवची जडण-घडण होत होती. केशवच्या परिवारामध्ये तसेच परिसरातील इतर व्यक्तींच्या संपर्कात देखील केशववर देशभक्तीचे संस्कार घडून येत होते, म्हणूनच व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहनाला ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर शाळेमध्ये वाटलेली मिठाई २२ जून १८९७ या दिवशी अवघ्या ८ वर्षाच्या केशवने कचऱ्यात फेकून दिली व देशभक्तीचा प्रत्यय आणून दिला.

छोट्या केशवच्या मनामध्ये इंग्रजांबद्दल प्रचंड राग होता व इंग्रजांना या देशातून आपण हाकलून दिले पाहिजे यासाठी काहीही करायची तयारी आपण ठेवली पाहिजे असे केशव म्हणत असत. राजा एडवर्डच्या राज्यारोहणाच्या प्रसंगी नागपूरमध्ये शोभेचे दारूकाम करण्यात येणार होते, ते पाहण्यासाठी संपूर्ण नागपूर लोटले होते. परंतु या छोट्या केशवने मात्र दारूकाम पाहिला जायचे नाही असे ठरविले व तो गेला नाही. सन १९०१ मध्ये खांडव्याजवळ पंधाना या गावी मामांकडे गेल्यानंतर मामांनी जेव्हा भाच्याला तुला काय आणू? असे विचारले असता मामा मला बंदूक आणून द्या, मी या बंदुकीने इंग्रजांना ठार करतो. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी हातात बंदूक घेऊन इंग्रजांविरुद्ध लढाई करण्याची मनीषा बाळगून असणारा हा केशव मित्रपरिवारालाही जमवून निरनिराळे उपक्रम करत असत.

आपल्या पाठ्यपुस्तकातील महापुरुषांची तसेच इतिहासाच्या पुस्तकातील चित्रे कापून एका वहीत चिटकवण्याचा केशवला छंद होता. एका पानावर त्याने शिवरायांच्या पायाखाली औरंगजेबाचे चित्र चिटकावले, अशा छोट्या प्रसंगातूनही त्याची मनीषा लक्षात येत होती. सन १९०२ मध्ये वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी वझे गुरुजींच्या अभ्यासाच्या खोलीतून नागपूरच्या सीताबर्डीच्या किल्ल्यावर असणारा इंग्रजांचा युनियन जॅक खाली खेचून तेथे भगवा ध्वज फडकवण्यासाठी भुयार खोदण्यास सुरुवात केली होती. एवढ्या लहान वयात अशा प्रकारचे धाडस केवळ देशभक्तीच्या भावनेतूनच तयार होत असते. ज्या शाळेत केशव शिकत होता, त्या शाळेमध्ये इंग्रज अधिकाऱ्यांचे स्वागत वंदे मातरमने करावे असा विचार केशवच्या मनात आला व त्याने प्रत्येक वर्गात असणाऱ्या आपल्या मित्रांना असे करण्याबाबत सुचविले व प्रोत्साहन दिले. त्यामुळे सन १९०८ यावर्षी शाळा तपासणीला आलेल्या इंग्रज अधिकाऱ्याचे प्रत्येक वर्गात वंदे मातरम या घोषणेने स्वागत झाले. इंग्रज अधिकारी चिडले, मुख्याध्यापकांना जाब विचारला. मुख्याध्यापकांनी वंदे मातरमचा घोष करणाऱ्या सर्वांना शाळेतून काढून टाकले, त्यामध्ये केशवदेखील होता. जी मुले माफी मागतील त्यांना शाळेत परत घेण्यात आले, केशवने मात्र शेवटपर्यंत माफी मागितली नाही व त्याला शेवटी शाळा सोडावी लागली. अशा प्रकारे जन्मजात देशभक्त असणाऱ्या

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग -२०**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

केशवने वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षापर्यंत अनेक प्रसंगातून देशभक्तीचे दर्शन घडविले.

डॉ.हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते. अगदी बालवयातच अनेक प्रसंगातून याचे दर्शन घडते, हे आपण पाहिले आहे. शालेय शिक्षण घेत असतानाच निर्माण झालेला क्रांतिकार्याचा स्वभाव उच्च शिक्षणासाठी कोलकत्ता येथे गेल्यानंतर आणखी बहरत गेला. तेथील क्रांतिकार्यामध्ये कोकेन या टोपण नावाने त्यांनी कार्य केले. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये ते अत्यंत सक्रिय होते, हे आपण मागच्या लेखांमध्ये पाहिले आहे. राष्ट्रीय सभा अर्थात काँग्रेस पक्षाचे काम करत असताना अनेक प्रसंगांनी डॉक्टरांना चिंतन करण्यास भाग पाडले. या देशाला स्वातंत्र्य आज ना उद्या मिळेल परंतु मिळालेले स्वातंत्र्य अखंडित ठेवण्यासाठी व या स्वराज्याचे सुराज्य बनविण्यासाठी हिंदू समाजाचे संघटन करणे गरजेचे असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले व त्यांनी २७ सप्टेंबर १९२५ विजयादशमी या दिवशी छोट्या - छोट्या बाल स्वयंसेवकांना एकत्र करून नागपूर येथील मोहिते वाड्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. संघाची स्थापना तर झाली, परंतु संघाला सर्व दूर पसरवण्यासाठी डॉक्टरांना अत्यंत परिश्रम करावे लागले. एक वेळ बेडकाचे वजन करणे सोपे होते, परंतु हिंदू संघटन करणे अवघड होते अशा कालखंडामध्ये डॉ. हेडगेवार यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सुरुवातीला नागपूर व नागपूर शहराच्या जवळच्या भागांमध्ये संघाचा विचार नेण्याचे काम केले. विदर्भातील काही जिल्हे, पुणे, मुंबई, कोल्हापूर अशी मोठी शहरे यामध्ये संघाचे काम विस्तारत गेले. डॉ.हेडगेवार हे अत्यंत कुशल संघटक होते व तेवढेच ते कल्पकही होते, त्यामुळे त्यांनी नागपूर व परिसरातील शाखेत नित्य येणाऱ्या तरुणांना उच्च शिक्षणासाठी भारताच्या वेगवेगळ्या भागात पाठविले व तेथे संघाच्या कामाला सुरुवात केली. डॉ.हेडगेवार स्वतः संपूर्ण देशभर सातत्याने प्रवास करत होते, अनेक मान्यवरांच्या - विचारवंतांच्या - देशभक्तांच्या भेटी घेत होते, संघ स्थापनेचे उद्दिष्ट समाजाला समजावून सांगत होते, यातूनच अखंड हिंदुस्तानभर संघाचे काम कोणत्या ना कोणत्या स्वरूपात जाऊन पोहोचले. सन१९२५ मध्ये सुरू केलेल्या संघाचे काम डॉक्टरांच्या अविश्रांत परिश्रमामुळे १९४० पर्यंत देशभर जाऊन पोहोचले. डॉ हेडगेवार यांनी संघाच्या विस्ताराचे केवळ काम केले नाही तर संघ कार्याला आकार देण्यासाठी सातत्याने अभ्यास केला, मनन - चिंतन केले व एक शिस्त निर्माण करून दिली. डॉक्टरांच्या दूरदृष्टीने संघामध्ये अनेक गोष्टी सुरू झाल्या व त्या पुढच्या काळात रूढ झाल्या. आज संघाचे जे रूप आपण पाहतो ते घडविण्यामध्ये डॉक्टरांचा सिंहाचा वाटा आहे, नव्हे, हे सारे डॉक्टरांनीच केले आहे. प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून सातत्याने समाजाला संघटित करण्याचा ध्यास घेऊन डॉ.हेडगेवार यांनी अखेरच्या श्वासापर्यंत काम केले. २१ जून १९४० मध्ये नागपूर येथे डॉ.हेडगेवार यांचे निधन झाले. रावळपिंडीपासून कोईमतूरपर्यंत व कराचीपासून कोलकत्यापर्यंत संघाचे काम सर्वदूर पोहोचविणाऱ्या डॉ.हेडगेवार यांच्या स्मृतीस आदरांजली वाहताना स्वा. विनायक दामोदर सावरकर हे श्रद्धांजली सभेत डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे युगप्रवर्तक - शककर्ते होते. अशा भावना व्यक्त करतात. खऱ्या अर्थाने डॉ.हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करून नव्या युगाला सुरुवात केली होती व या युगामध्ये भारताचा स्वातंत्र्यापासून भारताच्या परमवैभवापर्यंतचा प्रवास आपल्या सर्वांच्या साक्षीने घडत आहे. डॉ.हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते याचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक कृतीतून सातत्याने दिसून आला आहे. आयुष्यभर अविवाहित राहून भारतमातेची सेवा करणारा हा सच्चा पुत्र होता.

आपला जिल्हा

जिल्हा परिषद व पंचायत समितीची रणधुमाळी

सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६







# पंढरपुरात मतमोजणीसाठी १६ टेबल अन्‌ १९ फेऱ्या

### १२० अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती; सकाळी १० वाजता सुरु होणार मोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ फेब्रुवारी -**

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी शनिवारी (दि.७) ३०९ मतदान केंद्रावर मतदान पार पडले. या निवडणूकीत एक लाख ९८ हजार ४६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणी शासकीय धान्य गोदाम येथे सकाळी १० वाजता सुरु होणार आहे. मोजणीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून प्रशासन सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ८ गटासाठी व पंचायत समितीच्या १६ गणासाठी ६९.४४ टक्के इतके मतदान झाले असून, निवडणूकीत एक लाख ५ हजार ६५७ पुरुष तर ९२ हजार ८१० स्त्री अशा एकूण एक लाख ९८ हजार ४६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तसेच आतापर्यंत ६६३ टपाली मतदान झाले आहे. मतमोजणी १६ टेबलवर होणार असून दोन राखीव टेबल ठेवण्यात आले आहे. तर टपाली मतमोजणी गटासाठी एक टेबल व गणासाठी दोन अशा एकूण तीन टेबलवर होणार आहे. मतमोजणी प्रक्रीयेसाठी १२० अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल घेवून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवेशद्वारावर याबाबतची तपासणी करूनच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. पोलिसांकडून प्रत्येक व्यक्तीची तपासणी केली जाणार असून अधिकृत पास असल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रसार माध्यम प्रतिनिधींना सुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल अशा सूचनाही निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी दिल्या.



प्रत्येक टेबलवरील मतमोजणी व्हिडीओ चित्रीकरण करण्यासाठी सी.सी. टिव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली असून, मतमोजणी केंद्रात व्हिडीओ चित्रीकरण करणारे फिरते पथकेही कार्यरत राहणार आहेत. मतमोजणी प्रक्रिया शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथे सोमवार दि. ०९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता सुरू होणार आहे. मतमोजणी व्यवस्था, निकाल संकलनासाठी आवश्यक व्यवस्था, स्ट्रॉगरुमवर देखरेख, संकलन आदीबाबतचे निवडणुक नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

---

# मंगळवेढ्यात ११ फेऱ्यात होणार मतमोजणी

### मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.८ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकसाठीची मतमोजणी सोमवार दि. ९ रोजी होणार असून त्यासाठी मंगळवेढा प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे.तालुक्यात शनिवार दि.७ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी मतदान झाले. सुमारे ६५.५२ टक्के मतदान झाले असून या निवडणुकीची मतमोजणी शासकीय धान्य गोदाम मंगळवेढा येथे होणार आहे.

सोमवारी सकाळी १० वा. मतमोजणी सुरू होणार असून तत्पूर्वी उमेदवार व प्रतिनिधी यांच्या समक्ष सुरक्षा कक्ष उघडण्यात येईल. ९.४५ वाजता मतमोजणी साठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना गोपनीयतेची शपथ देण्यात येईल व त्यानंतर १० वाजता



प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात होणार आहे. सर्वप्रथम टपाली मतमोजणी होऊन त्यानंतर लगेच मशिनवरील मतमोजणी केली जाणार आहे. मशीनवरील मतमोजणीसाठी २० टेबल व टपाली मतमोजणी साठी ४ असे एकूण २४ टेबलवर एकाच वेळी मतमोजणी सुरू होणार आहे. मतमोजणीच्या एकूण ११ फेऱ्या होणार असून प्रथम संत दामाजीनगर व त्यातील संत दामाजीनगर व बोराळे गण यांची मतमोजणी होईल. त्यानंतर हुलजंती गट व त्यातील हुलजंती व मरवडे गण, त्यानंतर लक्ष्मी दहिवडी गट व त्यातील संत चोखामेळानगर व लक्ष्मी दहिवडी गण तसेच सर्वात शेवटी भोसे गट व त्यातील भोसे व रड्डे गण याप्रमाणे संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईल. एका गटाचे व त्यातील गणांचे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी एकदा मतमोजणी कक्षात गेल्यानंतर त्या गटाची पूर्ण मतमोजणी झाल्यानंतरच त्यांना बाहेर येता येणार आहे. सकाळी १० ते साधारण दुपारी २ वाजेपर्यंत सर्व गट व गणांचे निकाल हाती येण्याची शक्यता आहे. मतमोजणी साठी एकूण १६८ अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून ४ रो ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आली आहे. मत मोजणी साठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवार व प्रतिनिधींना ओळखपत्र देण्यात आले असून मतमोजणी कक्षात मोबाईल घेऊन जाता येणार नाही. मतमोजणी केंद्र परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

मतमोजणी केंद्राच्या परिसरात मीडिया कक्ष तयार करण्यात आला असून माध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती देण्यासाठी १ नायब तहसीलदार व ३ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोमवारी होणाऱ्या मतमोजणी साठी प्रशासनाची संपूर्ण तयारी झालेली असून मतमोजणी प्रकिया शांततेत पूर्ण केली जाईल अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ओसवाल व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी दिली.

---

# माढ्यात २० टेबलवर १६ फेऱ्यात मतमोजणी

### दोन टेबलवर पोस्टल मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.८ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यात ७ गट व १४ गणासाठी शनिवारी सरासरी ६६.१४ टक्के मतदान झाले. सोमवारी सकाळी दहा वाजता अकुलगाव येथील वखार महामंडळाच्या गोदामात मतमोजणी होणार आहे. मतमोजणी २२ टेबलवर १६ फेऱ्यांमध्ये गट व गणाची एकत्रित होणार तर दोन टेबलवर पोस्टल मतमोजणी असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी जयश्री आव्हाड व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ठोकडे यांनी सांगितले.

प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. एकूण दोन लाख ५८ हजार ७३४ पैकी एक लाख ७१ हजार १३० मतदान झाले. दुपारी एक



वाजेपर्यंत मतमोजणीचे चित्र स्पष्ट होणार आहे. अनेक ठिकाणी झालेल्या चुरशीच्या लढतीत कुणाचा विजय व कोणाचा पराजय होणार व कोणत्या उमेदवाराच्या अंगावर गुलाल पडणार हे देखील कळणार आहे.

---

# माळशिरसमध्ये अनेकांनी ठेवले देव पाण्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ८ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यात ९ जिल्हा परिषद गटासाठी तर १८ पंचायत समितीसाठी मतदान संपन्न झाले. माळशिरस तालुक्यात भाजपा विरुद्ध म ाळशिरस आघाडी विशेषत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातच चुरशीच्या लढती झाल्या.



भाजपकडून पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी विजयासाठी जोरदार प्रचार यंत्रणा राबविली तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडुन खा. धैर्यशील मोहीते-पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांनी जोरदार प्रचार यंत्रणा राबविली. तालुक्यात माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते व आमदार उत्तमराव जानकर यांचे चिरंजीव जिवन जानकर यांच्यात लक्षवेधी लढत होत आहे. या निवडणुकीत अर्जुनसिह मोहीते ,वैष्णवीदेवी मोहीते पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या पत्नी विमल जानकर तसेच गौतम माने व बाबा माने यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून मैदानात उतरविले आहे.तर निमगाव जिल्हा परिषद गट शिंदें शिवसेनेला सोडण्यात आला आहे. अनेक जिल्हा परिषद व पंचायत समिती गटात व गणात दुरंगी व तिरंगी लढती होत आहेत. तालुक्यात भाजपा विरुद्ध सर्व पक्ष अशी परिस्थीती तालुक्यात आहे. यात कोण बाजी मारणार याकडे लक्ष लागले आहे.

---

# बोगस आधार कार्डद्वारे मतदान करणाऱ्यास चोप

### कारीतील घटना; बार्शीमध्ये सरासरी ६७.७८ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.८ फेब्रुवारी,**

पांगरी (ता.बार्शी) जिल्हा परिषद मतदारसंघातील कारी गावातील मतदान केंद्रावर मयत मतदाराच्या नावाने बोगस आधार कार्ड तयार करून बोगस म तदान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीस आमदार दिलीप सोपल गटाच्या कार्यकर्त्यांनी पकडून चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना घडली. या घटनेने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, किरकोळ घटना वगळता तालुक्यात कुठेही गंभीर अनुचित प्रकार घडला नसून संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पडली. निवडणूक निर्णय प्रशासन, महसूल विभाग व पोलीस प्रशासनाने योग्य नियोजन, चोख बंदोबस्त व दक्षता घेतल्यामुळे ही निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडल्याचे समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी, दि.७ फेब्रुवारी रोजी अत्यंत चुरशीच्या वातावरणात मतदान पार पडले. जिल्हा परिषदेच्या ६ जागा व पंचायत समितीच्या १२ जागांसाठी सायंकाळी उशिरापर्यंत काही मतदान केंद्रांवर मतदान सुरू होते. सरासरी ६७.७९ टक्के मतदान झाल्याची माहिती प्रशासनाने




अशा मतदारांनीही मतदानाचा हक्क निर्भयपणे बजावला. तहसील कार्यालयामार्फत दर दोन तासांनी मतदानाची अधिकृतपणे आकडेवारी जाहीर करण्यात येत होती. सकाळी साडेसात ते साडेनऊ या पहिल्या दोन तासांत सरासरी ९ टक्के मतदान झाले. त्यानंतर साडेनऊ ते साडेअकरा या कालावधीत मतदानाची टक्केवारी वाढून २२ टक्क्यांवर पोहोचली. साडेअकरा ते दीड या वेळेत ही टक्केवारी ३८ टक्क्यांपर्यंत गेली. दुपारच्या सत्रात दीड ते साडेतीन या वेळेत ५१.५७ टक्के मतदानाची नोंद झाली, तर मतदानाच्या अखेरच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर म तदार बाहेर पडल्याने अंतिम टक्केवारी ६८ टक्क्यांपर्यंत वाढली. जिल्हा परिषदेच्या उपळाई (ठोंगे) गटात ७१.७८ टक्के मतदान झाले. तर पंचायत समितीच्या उपळाई (ठोंगे) गणात ७५.९ टक्के व आगळगांव गणात ६७.५७ टक्के मतदान झाले. जिल्हा परिषदेच्या पांगरी गटात ६७.१९ टक्के मतदान झाले. तर पंचायत समितीच्या पांगरी गणात ६४.२९ टक्के व कारी गणात ७०.१२ टक्के मतदान झाले. उपळे दुमाला गटात ६७.५२टक्के मतदान झाले. तर पंचायत समितीच्या उपळे दुमाला गणात ६६.६९ टक्के व गौडगाव गणात ६८.२५टक्के मतदान झाले.

पानगांव गटात ६८.२४टक्के मतदान झाले. तर बावी गणात ६७.१५ टक्के व पानगांव गणात ६९.३७ टक्के मतदान झाले. मारवाडी गटात ६६ टक्के मतदान झाले. तर पंचायत समितीच्या मालवंडी गणात ६९.०६टक्के व सासूरे गणात ६३.०२टक्के मतदान झाले. जिल्हा परिषदेच्या शेळगांव (आर) गटात ६६.५३टक्के मतदान झाले. तर पंचायत समितीच्या मानेगाव गणात ६७.८४ व शेळगांव (आर)पंचायत समिती गणात ६५.३७ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत आम दार दिलीप सोपल यांची प्रतिष्ठा व माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या अस्तित्वाचा प्रश्न केंद्रस्थानी राहिला. तसेच तालुक्यातील अनेक प्रमुख ग्रामीण नेते, पदाधिकारी व पुढाऱ्यांची आपापल्या गावांतील राजकीय पकड आणि प्रभाव या निवडणुकीच्या माध्यमातून कसोटीला लागलेला दिसून आला. यामध्ये पंचायत समितीचे माजी सभापती अनिल डिसले (ज्योतिबाची वाडी), माजी सभापती युवराज काटे (खामगाव), बाजार समितीचे सभापती विजय गरड (पांगरी), उपसभापती बाबासाहेब गायकवाड (शेळगांव आर), माजी जिल्हा परिषद सदस्य मदन दराडे (भालगांव) आदींचा समावेश आहे.

वैराग भागाचे नेते संतोष निंबाळकर व वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांचा अनेक गावांवरील प्रभावही या निवडणुकीत स्पष्ट होणार आहे. मात्र, वैराग भागात शैक्षणिक संस्थांचे जाळे असलेल्या कै. बप्पासाहेब कोरके यांचे पुत्र डॉ. कपिल कोरके व यांचा गट या निवडणुकीपासून अलिप्त राहिल्याचे चित्र दिसून आले. ग्रामीण निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वैराग भागात निंबाळकर, भूमकर, डिसले व कोरके हे चार गट नेहमीच निर्णायक भूमिका बजावत असल्याचे वास्तव पुन्हा अधोरेखित झाले.

---

# मंगळवेढ्यात निवडणुकीला गालबोट १६ जणांवर गुन्हा

### संवेदनशील मुढवी मतदान केंद्राजवळ मारहाण

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.८ फेब्रुवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील मुढवी मतदान केंद्राजवळ संवेदनशील ठिकाण असूनही अतिरिक्त पोलीस बंदोबस्त असताना दुपारी २ वाजता मोठ्या गटाने मतदाराला आणि हस्तक्षेप करणाऱ्यांना लाठाबुकड्या आणि दगड-सळईने मारहाण केली. या घटनेत उमेश दत्तात्रय ठेंगील (वय-३२) आणि ब्रह्मदेव चांगदेव क्षिरसागर हे जखमी झाले असून, पोलिसांनी १६ आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना निवडणूक प्रक्रियेला गालबोट घालणारी असून, स्थानिक राजकारणातील वैरभावना भडकावली असल्याचे फिर्यादीने सांगितले.फिर्यादी उमेश दत्तात्रय ठेंगील हे ठेंगील वस्ती, मुढवी तालुका मंगळवेढा येथील शेतकरी आहेत. त्यांच्या फिर्यादीनुसार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता ते मतदान करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मौजे मुढवी येथील मतदान केंद्राकडे जात असताना आरोपींनी त्यांना अडवले. यापूर्वी नवनाथ मारुती रोकडे याने ठेंगील यांना राजकारणात मध्यस्थी करत असल्याबद्दल धमकी दिली होती. या वेळी नवनाथने पुन्हा त्यांना अडवून, तु राजकारणात लई मध्येमध्ये करतोस, तुला मतदान करू देणार नाही अशी दमदाटी केली. त्यावर चंद्रकांत सखाराम कदम याने शिवीगाळ केली. तत्पूर्वीच संतप्त झालेल्या १६ आरोपींनी ठेंगील यांना तुला लई माज आला आहे का? म्हणत लाठाबुकड्यांनी मारहाण सुरू केली.मारहाणीदरम्यान नवनाथने जवळ पडलेला दगड उचलून ठेंगील यांच्या कपाळावर डोक्यात म ारला, ज्यामुळे त्यांना गंभीर जखम झाली. याचवेळी ब्रह्मदेव चांगदेव क्षिरसागर हे ठेंगील यांना आरोपींच्या तावडीतून सोडवण्यासाठी धावले, तेव्हा अमोल विजय रोकडे याने हातातील लोखंडी सळईने त्यांच्या डोक्यात मारहाण केली. ब्रह्मदेव देखील जखमी झाले. या भांडणाला पायस ठेवण्यासाठी आप्पा शिवाजी कोळेकर, प्रशांत श्रीकांत ठेंगील, अतुल सुभाष ठेंगील आणि खंडू सिद्धेश्वर माने हे घटनास्थळी धावले. मात्र, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून लाठाबुकड्यांनी मारहाण केली आणि तुला जिवंत ठेवणार नाही अशी जीवघेण्याची धमकी दिली.

मुढवी मतदान केंद्र हे संवेदनशील असल्याने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात होता, तरीही ही घटना घडली. फिर्याद नोंद दि.८ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजून २९ मिन्यांपासून झाली. गुन्हा गु.र.नं. ८३/२०२६ अंतर्गत मंगळवेढा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून, तपास पोसटॉई/बनकर सो. हे करीत आहेत. दाखल पोहेकॉ/२२० मुसळे.

निवडणूक हिंसाचाराचा धक्का ही घटना मंगळवेढा तालुक्यातील निवडणूक वातावरणाला काळोख टाकणारी आहे. स्थानिक पातळीवर राजकीय वैरभावना आणि मतदारांना धमकावण्याचे प्रकार वाढत असल्याचे दिसून येते. मुढवीसारख्या संवेदनशील केंद्रात पोलीस बंदोबस्त असूनही हिंसा घडणे हे गंभीर आहे. जखमींची वैद्यकीय तपासणी झाली असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र, स्थानिक नागरिकांम ध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिक राजकारणातील वैरफिर्यादी उमेश ठेंगील हे स्थानिक राजकारणात

| आरोपींची यादी याप्रमाणे... |
|---|
| नवनाथ मारुती रोकडे |
| चंद्रकांत सखाराम कदम |
| अमोल विजय रोकडे |
| आनंद उर्फ पिंटू साहेबराव भोसले, |
| करण औदुंबर रोकडे |
| सिद्धेश्वर दत्तात्रय कदम |
| सुमित साईनाथ कदम |
| दीपक भाऊसो कदम |
| संतोष विलास रोकडे |
| दगडू उत्तम कदम |
| नागेश अशोक रोकडे |
| बापू रावसाहेब कदम |
| अतुल हनुमत रोकडे |
| रामा धर्मा रोकडे |
| अनिकेत तानाजी रोकडे |
| सिद्धेश्वर ज्ञानेश्वर रोकडे |
| सर्व आरोपी मुढवी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील रहिवासी आहेत. |

सक्रिय असल्याचे आरोपींनी म्हटल्याने वैरभावनेचा संशय आहे. नवनाथ रोकडे आणि इतर आरोपी हे मुढवी गावातीलच असल्याने गावांतर्गत राजकीय भांडण निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भडकले आहे. ब्रह्मदेव क्षिरसागर आणि इतर हस्तक्षेपकर्त्यांना धमकी देणे हे गुन्ह्याचे गांभीर्य वाढवणारे आहे. जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे.पोलिसांचा तपास सुरू असुन

तपास अधिकारी बनकर यांनी सांगितले, की घटनास्थळाची पाहणी झाली असून, साक्षीदारांची चौकशी सुरू आहे. आरोपींना लवकर अटक करून न्यायालयात हजर करणार आहोत. हत्यार म्हणून दगड आणि लोखंडी सळई वापरल्याने गुन्हा भारी आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार संवेदनशील केंद्रांवर बंदोबस्त वाढवण्यात येईल. नागरिकांची खंत अशी की मुढवी गावातील नागरिक म्हणतात, मतदानाच्या दिवशी हिंसा होणे हे लोकशाहीला धक्का आहे. पोलीस उपस्थित असताना सुद्धा आरोपींना पळवून नेण्यात आले. प्रशासनाने कारवाई करावी. जखमी ठेंगील यांनी सांगितले, मी फक्त मतदान करायला जात होतो, पण राजकीय वैरामुळे ही मारहाण झाली. इतर मतदारांना धमकी देऊ नये म्हणून न्याय मागतोय.निवडणूक प्रक्रियेला आव्हान आहे कि मंगळवेढा तालुक्यातील ग्रामपंचायत किंवा स्थानिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडली आहे. पूर्वीही मुढवी भागात राजकीय तणाव असल्याचे ऐकण्यात येते. जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलीस आयुक्तालयाने या प्रकरणात विशेष तपासाची गरज आहे. अन्यथा, मतदारांचा विश्वास उडून जाईल.या घटनेमुळे मंगळवेढा तालुक्यातील शांततेला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून आरोपींना शिक्षा द्यावी, अशी मागणी होत आहे. तपासात महत्त्वाची माहिती समोर येणे गरजेचे आहे.

---



# मोहोळमध्ये १३ फेऱ्यात होणार मतमोजणी

### नरखेडची ३ फेऱ्यात तर अन्य ५ गटात प्रत्येकी २ फेऱ्यात होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. ८ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या मतमोजणीची तयारी पूर्ण झाली असून एकूण १३ फेऱ्यात सर्व गटाचे व गणाचे निकाल हाती येणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली

मतमोजणी उद्या सोमवार दि. ९ रोजी सकाळी १० वाजता सुरू होणार आहे. यासाठी एकूण २० टेबल ठेवण्यात आले असून त्यासाठी एकूण १०२ कर्मचारी नियुक्त केले आहेत. एका वेळी एक जिल्हा परिषद व दोन पंचायत समिती गण यांची मतमोजणी सुरू होणार आहे.

नरखेड जिल्हा परिषद गटात ३ फेऱ्यात मतमोजणी होणार आहे.तर अन्य ५ गटात प्रत्येकी २ फेऱ्यात मतमोजणी होणार आहे. पोस्टल मत मोजणीसाठी वेगळे ४ टेबल ठेवण्यात आले असल्याचे तहसीलदार मुळीक यांनी सांगितले. कुठल्याही प्रकारचा गोंधळ होऊ नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त तैनात केल्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी सांगितले.